॥ डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी ॥



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व [illegible]कीय चळवळी

MR
891.468
Am 16 M

MR
891.468
Am 16M

श्री. कृष्णा मेणसे

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी

कृष्णा मेणसे

लोकवाङ्मय गृह

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी / कृष्णा मेणसे
Dr. Babasaheb Ambedkaranchya Samajik Ani Rajkiya Chalvali
Krishna Menase

Library IIAS, Shimla
MR 891.468 Am 16 M
00124313

म / ९१९
© कृष्णा मेणसे
दुसरी आवृत्ती : मार्च १९९८
तिसरी आवृत्ती (I) : नोव्हेंबर २०००
चौथी आवृत्ती (I) : मे २००३
पाचवी आवृत्ती (I) : एप्रिल २००६

मुखपृष्ठ : कमल शेडगे

MR
891.468
Am 16 M

मूल्य : ३० रुपये
ISBN 81-86995-94-3

124313
31.3.08

मुद्रक/प्रकाशक :
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिशताब्दीनिमित्त त्यांच्या मूलभूत विचारांवर पुस्तकरूपाने ऊहापोह करणारा उपक्रम करावा असे आमच्या मनात आले. तसे डॉ. आंबेडकरांच्या विचारांविषयी व त्यांनी केलेल्या समाजक्रांतीच्या अग्रदूताची भूमिका लक्षात घेऊन खूप लिखाणही झालेले आहे. तरीही त्यातील विविध बाजूंचे पैलू उरतातच व नव्या प्राप्त परिस्थितीत त्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्नही होत राहतो. क्रियाशील विचारवंत हा कोणा एकाचा न राहता तो नेहमी सर्वांचा असतो. कारण त्यातील एकूण विचार हा मानवी कल्याणाचाच असतो. म्हणून वैचारिक संघर्षात गुंतलेल्या आपणा सर्वांना त्यातील विविध कंगोरे आणि गांभीर्य कळले तर सामाजिक क्रांतीची चळवळ अधिक वस्तुनिष्ठ व भक्कमपणे उभी राहते, असा अनुभव आहे.*

*ह्या पुस्तक-मालिकेत लेखन करणारी ही सर्व विचारवंत मंडळी स्वत:चा प्रागतिक वारसा सांगणारी व वैज्ञानिक दृष्टिकोनाने उपस्थित समस्यांची उकल करू पाहणारी आणि वस्तुनिष्ठ भूमिकेने समाजप्रबोधनाच्या सर्वव्यापी चळवळीत गुंतलेली आहेत. ह्या मालिकेचे संपादक डॉ. अशोक चौसाळकर यांचे आम्हाला खूपच सहकार्य लाभले आहे. त्यांचे आम्ही आभार मानतो.*

*वाचक आणि कार्यकर्ते महात्मा जोतीराव फुले ह्यांच्या कार्याविषयी आम्ही प्रकाशित केलेल्या पुस्तक-मालिके इतकेच याही मालिकेचे स्वागत करतील असा पूर्ण भरवसा आहे.*

*— प्रकाशक*

# प्रस्तावना

म. जोतीराव फुले यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त त्यांच्या कार्याचे क्रांतिकारक स्वरूप स्पष्ट करणाऱ्या काही पुस्तिका लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केल्या. या पुस्तिकांचे चांगले स्वागत झाले. इ. स. १९९१ हे वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निर्मित्त डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्याची आणि विचारसंपदेची माहिती करून देणारी काही पुस्तिकांची माला लोकवाङ्मय गृहातर्फे प्रकाशित करण्याचे आम्ही ठरवले आहे.

भारतीय समाजक्रांतीच्या वाटचालीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान महत्त्वाचे आहे. जागृती आणि प्रगती संघर्षजन्य असते असे त्यांचे मत होते. आज देशभर सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी, साधनसंपत्तीच्या समाज वाटपासाठी आणि नव्या संस्कृतीच्या निर्मितीसाठी पददलित, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अभावग्रस्त वर्ग प्रस्थापितांशी जारीने संघर्ष करीत आहेत. या संघर्षांना वैचारिकदृष्ट्या जास्त टोकदार बनविण्यासाठी, त्यांना क्रांतिकारक आणि प्रगतीशील घाट देण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांची नव्याने मांडणी करणे अगत्याचे बनत चालले आहे. त्यातूनच विचारांना भारतीय संदर्भात नेमकेपणा येण्याची शक्यता आहे.

प्रस्तुत पुस्तिकेत साम्यवादी चळवळीतील एक नेते आणि सिद्धहस्त लेखक व पत्रकार कॉ. कृष्णा मेणसे, बेळगाव यांनी बाबासाहेबांच्या वेगवेगळ्या सामाजिक आणि राजकीय चळवळींचा परामर्श घेतला आहे. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांची भीमशक्ती जागृत केली. त्यांना त्यांच्या अधिकारांबाबत माहिती दिली आणि आंदोलनासाठी उभे केले. त्यातूनच महाड, काळाराम, पर्वती सारख्या अस्पृश्यांच्या चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळींवरून अस्पृश्यांच्या गुलामगिरीचा प्रश्न डॉ. बाबासाहेबांनी सर्वांसमोर आणला आणि राष्ट्रीय चळवळ करणाऱ्यांना बजावले की अस्पृश्यांच्या मुक्तीचा प्रश्न महत्त्वाचा आहे, त्याकडे आता काणाडोळा करता येणार नाही.

डॉ. आंबेडकरांनी पुणे करार करून म. गांधींचे प्राण वाचवले. पण स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव जागा स्वीकारल्यामुळे दलितांत स्वाभिमानी राजकीय प्रतिनिधी निर्माण झाले नाहीत. कॉ. मेणसे यांनी त्यांच्या पुस्तिकेत स्वतंत्र मजूर पक्षाबाबत अत्यंत उद्‌बोधक माहिती दिली आहे. डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या राजकारणाला येथील कामगारांनी साथ दिली असती आणि कम्युनिस्ट आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आघाडी टिकली असती, तर त्या काळातील घटनांना एकं वेगळेच ऐतिहासिक महत्त्वाचे वळण लागले असते हे

कॉ. मेणसे यांचे मत मननीय आहे.

मजूर पक्षाच्या विसर्जनानंतर डॉ. आंबेडकर त्या काळातील गुंतागुंतीच्या राजकारणात ओढले गेले. या काळात दलितांचे हितरक्षण आणि हितसंवर्धन करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. शेकाफेच्या पराभवानंतर त्यांनी रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा संकल्प केला. त्याचप्रमाणे आपल्या मृत्यूच्या काही दिवस आधी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. 'सुमारे २५०० वर्षानंतर बुद्ध विचारांना चालना देणारा महापुरुष' अशा शब्दांत त्यांचा कॉ. मेणसे यांनी गौरव केला आहे.

'डॉ. आंबेडकरांनंतर पुढे काय ?' हे या पुस्तिकेतील शेवटचे प्रकरण. सध्याची परिस्थिती अंध:कारमय आहे. कारण सर्वच चळवळींची धार आता बोथट झाली आहे. धर्मांतरामुळे दलितांचा मोठाच लाभ झाला पण चळवळींचा फायदा शहरांतील सुशिक्षितांना मिळाला. खेडेगावातील दलितांची स्थिती दयनीय आहे. त्यांची व इतर दलितांची परिस्थिती सुधारण्यासाठी दलित समाज व अन्य समाज-घटकातील श्रमजीवींना बरोबर घेऊन चळवळीची व्यापक बांधणी झाली पाहिजे आणि समानतेसाठी, न्यायासाठी, माणुसकीसाठी शोषणाविरुद्ध चालू असलेल्या लढ्यात एकजुटीने सर्वांनी उडी घेतली पाहिजे. त्याशिवाय समताधिष्ठित नवभारत निर्माण होणार नाही.

**डॉ. अशोक चौसाळकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | भीमशक्ती जागी झाली | १ |
| २. | महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह | ९ |
| ३. | मनुस्मृतीचे दहन | १५ |
| ४. | काळाराम मंदिर सत्याग्रह | १९ |
| ५. | म. गांधी, डॉ. आंबेडकर आणि पुणे करार | २३ |
| ६. | स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना | २९ |
| ७. | शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन | ३६ |
| ८. | पुन्हा नवा पक्ष - रिपब्लिकन पक्ष | ४१ |
| ९. | बौद्ध धर्माचा स्वीकार | ४५ |
| १०. | डॉ. आंबेडकरांनंतर पुढे काय? | ५० |

# १.

# भीमशक्ती जागी झाली

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन एका उफाळलेल्या महासागरासारखे होते. आपल्या हयातीत त्यांनी अनेक वेळा आपल्या प्रतिस्पर्ध्यांची आव्हाने स्वीकारली आणि अनेक वेळा त्यांनी आपल्या विरोधकांना आव्हाने दिली. त्यांच्या महानिर्वाणाला छत्तीस वर्षांचा काळ लोटला आहे; पण आजही त्यांचे विचार वादळी ठरत आहेत. आता तर त्यांचे जन्मशताब्दि वर्ष चालू झालेले आहे. त्या निमित्ताने त्यांच्या पुस्तकांचे पुनर्मुद्रण होत आहे, काही नवी पुस्तके लिहीली जात आहेत ही चांगली घटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय आणि सामाजिक आंदोलनावर प्रकाश टाकणारी जेवढी पुस्तके लिहिली जातील तेवढे ते स्वागतार्ह आहे. आपल्या देशाच्या दृष्टीने विचार करता, आंबेडकर विचारधारेचा मागोवा घेणे अत्यंत जरुरीचे आहे. भारतीय राजकारणाचा, समाजकारणाचा विचार करताना आंबेडकरांचे कार्य आणि तत्त्वज्ञान यांचा सखोल आणि गंभीरपणे विचार करणे अटळ आहे.

आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. सोविएत युनियनमध्ये समाजवादाची पिछेहाट झाल्याने जागतिक राजकारणात अमेरिकेला प्रतिस्पर्धी कोणी राहिलेला नाही. या घटनेचे विकसनशील देशावर फार अनिष्टि परिणाम घडून येत आहेत. भारतही याला अपवाद नाही ! आपल्या देशात जातीयवादी, फुटीर आणि आतंकवादी शक्ती डोके वर काढीत आहेत. आत्मनिर्भर आर्थिक व्यवस्था कोलमडून जात असून, भाववाढ आणि बेकारीचे फार मोठे संकट सामान्य जनतेवर कोसळत आहे. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी फुले-आंबेडकरांचे विचार समजावून घेऊन, सामाजिक आणि आर्थिक समतेचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खूप लिहून ठेवले आहे आणि त्यांच्या जीवनावर अन्य लेखकांनी विविध दृष्टिकोणातून खूप लिहिलेलेही आहे. या सर्व लिखाणांचा जेव्हा आपण अभ्यास करू लागतो, त्या वेळी त्यांनी जिंकलेली आंदोलनाची शिखरे एकामागून एक स्पष्ट दिसू लागतात आणि त्या शिखरांच्या उत्तुंगपणाची जाणीव होऊ लागते. त्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे द्रष्टेपणही समजून येते. म्हणून आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी कशा होत्या त्या समजून घेणे आवश्यक आहे !

डॉ. आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. त्यांचे वडील बडोदा संस्थानच्या लष्करात सुभेदार पदावर होते. १४ वर्षे नॉर्मल शाळेत त्यांनी हेडमास्तर म्हणून काम केले होते. त्यामुळे शिक्षणाची परंपरा यांच्या घराण्यात होती. वडिलांची दुर्दम्य इच्छा होती की आपल्या मुलाने खूप शिकावे, खूप मोठे व्हावे. त्यासाठी त्यांनी आंबेडकरांच्या शिक्षणासाठी खूप परिश्रम घेतले. निवृत्तीनंतर अल्पशी पेन्शन मिळे. त्यामुळे गरिबीला तोंड देत आंबेडकर-कुटुंबाला संसाराचा गाडा ओढावा लागे. अस्पृशाची मुले त्या वेळी शाळेला अगदी अभावानेच जात असत. एक म्हणजे शाळेत प्रवेश मिळणेच कठीण असायचे. सवर्ण हिंदू मुले आणि अनेक प्रसंगी शिक्षक देखील अस्पृश्य मुलांचा विटाळ मानीत. त्यामुळे शाळेत येणाऱ्या अस्पृश्य मुलांची अतिशय कुचंबणा होत असे. डॉ. आंबेडकरांना याबद्दलचे अनेक कटू प्रसंग सोसावे लागले आहेत. त्याचबरोबर त्यांना प्रोत्साहन देणारे शिक्षकही भेटले. त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे कौतुक करून अनेक शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन केलेले आहे.

१८५४ साली म. फुले यांनी पुण्याजवळील भोकरवाडी येथे अस्पृश्यांसाठी शाळा सुरू करून नव्या युगाचा प्रारंभ केला होता. पाच हजार वर्षांच्या भारतीय संस्कृतीत अस्पृश्यांना साक्षर करण्याचा कोणी प्रयत्न केला नव्हता, तो म. फुले यांनी केला होता. याचा परिणाम म्हणून दलित समाजात जागृतीचे नवे वारे वाहू लागले होते. डॉ. आंबेडकरांच्या जन्मानंतर या वाऱ्याचे वादळात रूपांतर झाले ! वडील रामजी यांच्या कडक शिस्तीखाली भीमराव आंबेडकरांच्या शिक्षणात प्रगती होत गेली. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून ते बी. ए.ची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले. शिक्षणाच्या क्षेत्रात त्या काळात एका अस्पृश्य तरुणाची ही झेप खरे म्हणजे गरुडझेपच होती. पदवी घेतल्यावर भीमराव आंबेडकर नोकरीसाठी बडोद्याला गेले. पण तेथील वातावरणाने त्यांना गुदमरून टाकले. शेवटी नाइलाजास्तव ते परत मुंबईस आले. तेवढ्यात त्यांच्या वडिलांचे आजारपणात निधन झाले. लहानपणी आई वारली. आता वडिलांच्या आशीर्वादाचे छत्रही नाहीसे झालेले. त्यामुळे त्यांच्यावर मोठा कठीण प्रसंग ओढवला. वडील गेले तरी एक मोठा वारसा ते भीमरावांसाठी ठेवून गेले. रामजी पूर्ण निर्व्यसनी होते. आयुष्यात त्यांनी दारूच्या थेंबाला स्पर्श केला नाही. ते कबीर पंथाचे अनुयायी होते, भक्त होते. त्यामुळे त्यांनी मांसाहार केला नाही. एक शिस्तप्रिय आणि सज्जन गृहस्थ म्हणून त्यांचा लौकिक होता. आपल्या मुलाने खूप खूप शिकावे ही मनात जिद्द बाळगून त्याप्रमाणे त्यांनी प्रयत्न केला होता. भीमराव यांच्यावर वडिलांचे सुसंस्कार झाले होते. म्हणून तर त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मार्ग काढीत शिक्षण घेतले. बडोद्याहून आल्यानंतर त्यांनी सडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी केली. कारण उच्च शिक्षणासाठी त्यांना परदेशात जावयाचे होते व त्यासाठी काही पैसेही उभे करावयाचे होते.

शेवटी बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची भेट झाल्यावर संस्थानची स्कॉलरशिप मंजूर झाली आणि भीमराव आंबेडकर यांचा परदेशाला जाण्याचा मार्ग मोकळा झाला. २१ जुलै १९१३ रोजी भीमराव आंबेडकर न्यूयार्कला पोहोचले. तेथून ते पुढे कोलंबिया विश्वविद्यालयात दाखल झाले. त्यावेळी ते २२ वर्षांचे तरुण होते. बुकर टी. वॉशिंग्टनच्या देशात ते आले आणि त्यांनी चिकाटीने अभ्यास केला. उत्तम प्राध्यापकांचे मार्गदर्शनही त्यांना लाभले. ४ वर्षे ते अमेरिकेत राहिले. तेथे त्यांनी नवा देश पाहिला, नवी संस्कृती पाहिली, नवे ज्ञान अनुभवले, माणसा-माणसातील संबंधाची जाण त्यांना आली. आपल्या भारतीय परिस्थितीशी तुलना करण्यासाठी त्यांना नवे साधन गवसले. स्पृश्य-अस्पृश्य अशी कृत्रिम बंधने नसलेला मुक्त समाज त्यांनी पाहिला. नवे जग पाहून ते भारतात परत आले पण पुन्हा लंडनला जाऊन बॅरिस्टर होण्याची मनिषा घेऊन परत आले. आपल्या समाजाच्या दारुण स्थितीमुळे त्यांच्या अंतःकरणाला अनंत वेदना होऊ लागल्या. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची त्यांना खात्री पटली. भारतात आल्यावर त्यांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न करण्याचे ठरविले. जागृती, संघटना आणि आंदोलन हे सूत्र घेऊन त्यांनी कार्य करण्याचा निर्धार केला. दलित-पददलित जनतेला नेता हवा होता, मार्गदर्शन हवे होते. भीमराव आंबेडकरांच्या रूपाने ते नेतृत्व निर्माण झाले. हजारो अस्पृश्य बांधवांची मने त्यांच्याकडे खेचली गेली. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानव वंश-शास्त्र, कायदा इत्यादी विविध शास्त्रांचा अभ्यास केलेला व त्या विषयात पारंगत असलेला, शिवाय सामाजिक बांधिलकी मानणारा नेता दुसरा कोणी नव्हता. ब्रिटिश सरकारची मोठ्या पदावरची नोकरी मिळविणे त्यांना कठीण नव्हते. पण नोकरींच्या खोड्यात आपण अडकून पडलो तर सामाजिक समतेचा लढा आपण लढवू शकणार नाही, म्हणून त्यांनी सरकारी नोकरी मिळविण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. आपले उभे आयुष्य त्यांनी सामाजिक आणि राजकीय कार्यासाठी अर्पण केले. भीमराव आंबेडकरांच्या रूपाने एक भीम-शक्ती दुर्बल समाजामध्ये पसरू लागली. नवे चैतन्य निर्माण झाले.

भीमराव आंबेडकर भावनावश होऊन कोणताही निर्णय घाईने घेत नसत. कोणताही प्रश्न समोर उभा ठाकला तर त्यच्या मुळाशी जाऊन ते त्याचा मागोवा घेत असत. भारतातील हिंदू धर्मात जाती कशा आल्या, त्या जाती कोणी टिकवून धरल्या, कोणाच्या हितासाठी जाती पाहिजेत याचा त्यांनी कसून अभ्यास केला. हायस्कूमध्ये असताना त्यांना संस्कृत शिकण्याची फार उमेद होती. पण त्या वेळच्या ब्राह्मण शिक्षकांनी आंबेडकर अस्पृश्य म्हणून त्यांना संस्कृत शिकविण्यास नकार दिला. त्यांना पर्शियन शिकावे लागले. पण नंतरच्या काळात ते स्वतः संस्कृत शिकले. फ्रेंच आणि जर्मन भाषेचेही त्यांना चांगले ज्ञान होते. ऋग्वेदातील पुरुष सूक्तात सांगितलेली मानव-निर्मितीची कहाणी त्यांना माहीत होती. ब्रह्मदेवाच्या डोक्यापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, जांघेपासून वैश्य आणि शूद्र हे ब्रह्मदेवाच्या पायापासून निर्माण

झाले. हा संस्कार वेदकाळापासून चालत आला आहे. वेद हे परमेश्वराने लिहिले आहेत. म्हणजे धर्माने घालून दिलेले वर्ण हे अपरिवर्तनीय आहेत. मागील जन्माच्या पाप-पुण्यानुसार माणसाला निरनिराळ्या वर्णात जन्म लाभतो. अशा भाकडकथा पेरण्यात आल्या होत्या व त्याचे भरघोस पीक हजारो वर्षे फोफावत होते. मनूने त्याला कायद्याचे स्वरूप दिले. नियम मोडणाऱ्यांना शिक्षा सांगितली. नरकाची भीती दाखविली. हिंदूधर्मात चातुर्वर्ण्य हा वज्रलेप ठरला. गीतेतल्या भगवंताने या वर्णाचे जनकत्व स्वतःकडे घेऊन जातीजातीतील भेदाभेदांवर शिक्कामोर्तब केले. हे सारे कोसळून घालून नवा धर्म सांगण्याचा प्रयत्न म. बुद्धाने केला, महावीराने केला. पण त्यांना पूर्ण यश मिळाले नाही. अस्पृश्यतेचे मूळ या वर्णभेदात आहे. याची जाणीव आंबेडकरांना झाली. त्यांना विचारांती असे आढळून आले की, जातीभेदाच्या बेड्या तोडणे तितके सोपे काम नाही. यासाठी फार मोठे बळ संघटित केले पाहिजे. फार मोठी जागृती निर्माण केली पाहिजे. फार मोठे संघर्ष केले पाहिजेत. अखंडपणे प्रवाहाच्या विरुद्ध पोहत राहिले पाहिजे. असे पोहण्याची, संघर्ष करण्याची महान शक्ती भीमराव आंबेडकर यांच्या ठायी होती. त्यांनी बंडाचा झेंडा उभा केला आणि सारा दलित समाज एकत्र आणला.

अशा प्रकारे भीमराव आंबेडकर घडत गेले. त्यांना आपल्या जीवनाचा अर्थ समजला. दलित समाजाचा शत्रू कोण आणि दलित समाजाचा मित्र कोण हे त्यांना समजले. त्याचबरोबर अस्पृश्य समाजाला एक नेता मिळाला, त्यांच्याच जातीत जन्माला आलेला, त्यांच्याच संस्कृतीत वाढलेला; पण नव्या जाणीवांनी पेटून उठलेला. समाजासमोरचा अंधःकारमय मार्ग आपल्या तेजाने उजळून सोडणारा नवा नेता ! नव्या समाज-परिवर्तनाचा अध्वर्यू !! आंबेडकरांच्या पूर्वी देखील अस्पृश्यता निवारण्याचे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. असे प्रयत्न झालेले आहेत. १८१४ ते १८६०च्या दरम्यान मुंबई येथे दादोबा पांडुरंग यांनी 'परमहंस सभा' नावाची संस्था स्थापन करून अस्पृश्यता घालविण्याचा प्रयत्न केला. ही सभा गुप्तपणे आपले कार्य करीत असे. या संस्थेचे सभासद अस्पृश्यांच्या पंगतीला बसून भोजन करीत. त्यांचा कोणत्याही प्रकारे ते विटाळ मानीत नसत. पण हा सारा व्यवहार उघडपणे करण्याचे त्यांचे धाडस होत नसे. आम्ही विटाळ मानीत नाही असे लोकांना समजले तर ते आमच्यावर बहिष्कार टाकतील आणि आपणास जीवन कठीण करून सोडतील अशी त्यांना सतत भीती वाटत असे. म्हणून ते गुप्तपणे आपले कार्य करीत असत. प्रचलित लोकमताविरुद्ध धैर्याने उभे राहणे त्यांना जमले नाही. शेवटी 'परमहंस' सभेची सर्व हकीकत लोकांना समजलीच आणि शेवटी समाजाच्या हेटाळणीस त्यांना तोंड द्यावे लागलेच. अशाही परिस्थितीत ज्यांनी समतेच्या बाजूने आणि अस्पृश्यतेच्या विरुद्ध आवाज उठविला, त्या परमहंस सभेच्या सदस्यांचे अभिनंदनच करायला हवे. आपल्या कुवतीनुसार त्यांनी सुधारणेचा मार्ग चोखाळला.

त्याच काळात कलकत्ता येथे ब्राह्मो समाजाची स्थापना झाली. बंगालमधील

सामाजिक सुधारणेचे लोण मुंबईपर्यंत येऊन पोहोचले. ब्राह्मो समाजाचे काम उघडपणे चालायचे आणि या कार्याला जनतेचा पाठिंबादेखील चांगलाच मिळाला.

१८६७ साली आत्माराम पांडुरंग यांनी मुंबई येथे 'प्रार्थना समाजा'ची स्थापना केली. दयानंद सरस्वती यांनी 'आर्य समाजा'ची स्थापना केली. दयानंदजी वेद मानणारे होते. पण त्यांना अस्पृश्यता मान्य नव्हती. मूर्तिपूजेला त्यांचा विरोध होता. सामाजिक सुधारणा त्यांना मान्य होत्या. जातीभेदाला थारा देऊ नये असा ते उघडपणे प्रचार करीत. विधवा-विवाह त्यांना मान्य होता. समाज सुधारणेच्या या गोष्टी आता तितक्याशा महत्त्वाच्या वाटणार नाहीत; पण शंभर वर्षापूर्वी अशा विचारांचा प्रचार करणे तसे अवघडच होते. समाजाकडून वाळीत टाकण्याची भीती असायची.

२४ सप्टेंबर १८७३ साली म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'शेतकऱ्याचा आसूड' 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचे कसब', 'शिवाजीचा पोवाडा', वगैरे अनेक पुस्तके म. फुले यांनी लिहिली आहेत. १८४८ साली त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा पुणे येथे काढली. त्यावेळी म. फुले केवळ २१ वर्षांचे होते. ब्राह्मणेत्तर आणि शूद्र-अतिशूद्र जाती यांच्यात प्रत्यक्ष जाऊन त्यांना जागृत करण्याचे, त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्याचे ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य म. फुले यांनी केले. माणसा-माणसांतील भेदाभेदांवर आधारलेल्या रुढींविरुद्ध आणि ब्राह्मणांच्या अंधश्रद्धा वाढविणाऱ्या प्रचाराविरुद्ध ते सतत झगडत राहिले. आपल्या घरासमोरचा पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला करून दिला. आपली पत्नी सावित्री हिला शिक्षण देऊन शिक्षिका बनविले व स्त्रियांच्या शाळेत ती काम करू लागली. अशा प्रकारे शेकडो-हजारो वर्षांची स्पृश्य आणि अस्पृश्य अशी भिंत त्यांनी फोडून टाकण्याचा प्रयत्न केला. रुढी विरुद्ध हे कार्य फुले यांनी चालविले आहे अशी कागाळी पुण्याच्या शास्त्रीमंडळींनी फुले यांच्या वडिलांकडे केली. त्यामुळे वडिलांच्या आज्ञेवरून त्यांना आपले रहाते घर सोडावे लागले. आंबेडकरांच्यासाठी महाराष्ट्रातल्या आणि देशाच्या अन्य प्रांतांतील विचारवंतांनी नवविचारांची पेरणी करून ठेविली होती. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी तर अस्पृश्यांच्या प्रश्नासाठी सारे आयुष्य खर्ची घातले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि न्यायमूर्ति नारायणराव चंदावरकर यांनी १८-१०-१९०६ रोजी मुंबई येथे सभा घेऊन 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना केली. भारतातील अस्पृश्यांच्या उद्धाराचे कंकण हाती बांधून या संस्थेने भारतात भरपूर कार्य केले. विशेषतः महर्षि शिंदे यांनी आयुष्यभर या प्रश्नासाठी परिश्रम घेतले. आणखीही काही उदाहरणे देता येतील. पण अस्पृश्योद्धारासाठी जीवाचे रान करणारी ही सारी मंडळी सवर्ण हिंदू होती.

१० मे १८१८ रोजी शनिवारवाड्यावरील मराठ्यांचे भगवे निशाण बाळाजी पंत नातू यांनी खाली आणले आणि त्या ठिकाणी इंग्रजांचा युनियन जॅक हा झेंडा फडकविला. तेव्हापासून आम्ही स्वराज्याला मुकलो आणि इंग्रजांची गुलामगिरी सुरू

झाली. इंग्रज आले आणि त्यांनी आपल्याबरोबर आपला धर्मही आणला. खूप वर्षांपूर्वी मुसलमान आले आणि त्यांनी 'इस्लाम' आणला. हे दोन्ही धर्म माणसा-माणसात भेद न मानणारे आहेत. त्यामुळे कधी सक्तीने तर कधी मोहास बळी बडून, कधी स्वार्थाने अनेकांनी हे धर्म स्वीकारले आहेत. इंग्रजी साम्राज्याबरोबर इंग्रजी सत्ता या देशात आली आणि सत्तेच्या सोबतीने धर्मप्रसार करण्यासाठी ख्रिस्ती धर्मोपदेशकही मोठ्या प्रमाणात आले. अडचणीत सापडलेल्या कोणत्याही व्यक्तीला ते आसरा देत. कुमारी-मातांची मुले सांभाळण्यासाठी ते स्वीकारीत. परित्यक्ता, निराधार महिलांना आसरा देत. या ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीदेखील अस्पृश्यतेच्याविरुद्ध फार मोठे कार्य केले आहे. आपल्यातले वरिष्ठ वर्गातले वैद्य अस्पृश्य रुग्णाची नाडी तपासण्यापुरतादेखील स्पर्श करीत नसत. फक्त त्याचे ऐकून घेऊन त्याला औषध देत. याउलट ख्रिस्ती डॉक्टर महारवाड्यात प्रत्यक्ष जाऊन, रोग्याला तपासून त्याची मनोभावे सेवा करीत. असे करण्यात त्यांचा धर्मप्रसाराचा हेतू असला तरी हिंदू धर्मातील विचारवंतांना अस्पृश्यांना जवळ करण्याची, त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्याची, त्यांना समाजाच्या अन्य जातीच्या बरोबरीने आणण्याची निकड वाटू लागली. भारतातला मुसलमान समाज-देखील असाच मागासलेला होता. कुराणात सांगितले आहे तेवढेच ज्ञान आणि मुल्ला-मौलवी शिकवतील तेवढेच शिक्षण अशी त्यांची भावना होती. इंग्रजी शाळेला ते आपली मुले पाठवीत नसत. अशा वेळी सर सय्यद अहमद पुढे आले आणि त्यांनी अलिगढ येथे मुस्लिमांसाठी एका विश्वविद्यालयाची स्थापना केली व त्या समाजात शिक्षणाचा प्रसार केला. इंग्रजी राज्याबरोबर येथे इंग्रजी शिक्षण आले. इंग्रजी साहित्याशी म्हणजे कथा, कादंबरी, नाटक, कविता इत्यादींशी तेथील विद्वानांचा संबंध आला. सर्वांचे विचार-विश्व विस्तारले ! सामाजिक सुधारणेचा नवा प्रकाश क्षितिजावर थोडासा दिसू लागला.

महात्मा गांधी यांनी देखील अस्पृश्यांची समस्या जाणली होती. त्यांनी अस्पृश्यांकरिता 'हरिजन' हा शब्द रूढ केला. पण अस्पृश्याला 'हरिजन' म्हणून संबोधले तर त्याच्या भौतिक जीवनावर काय परिणाम होणार? त्यांच्या 'शूद्र' या वर्णावर काय परिणाम होणार? तसा परिणाम घडवून आणण्याचा, सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न महात्मा गांधी यांनी जरूर केला आहे; पण राजकारणामुळे त्यांनी या प्रश्नाकडे म्हणावे तेवढे लक्ष दिले नाही. हिंदू धर्मातील सनातनी तत्त्वांना ते चिकटूनच राहिले. चातुर्वर्ण्यावर आधारलेली हिंदू धर्माची रचना आणि या रचनेला असलेला धर्मग्रंथांचा, पुराण-कथांचा आधार याचा त्याग करण्याची गांधीजींची तयारी नव्हती. अस्पृश्योद्धाराची त्यांची चळवळ मंदिर प्रवेशाएवढीच मर्यादित राहिली. अस्पृश्यांच्या समस्यांकडे ते केवळ भूतदयेने पहात असत. अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन रहाणे, भंगी कॉलनीत राहून प्रार्थना करणे, यामुळे त्यांनी अस्पृश्य समाजाच्या समस्यांकडे भारतीय जनतेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पण अस्पृश्यांना राजकीय अधिकार दिले पाहिजेत, त्यांना आपला प्रतिनिधी निवडण्याची सवलत हवी आहे. वेगळा मतदारसंघ हवा आहे, असे

प्रश्न निर्माण झाल्यावर त्यांनी प्राणपणाने त्याला विरोध केला. ही विसंगती निश्चितच खटकण्यासारखी नाही का?

म. गांधीजींनी राष्ट्रीय पातळीवर 'हरिजन सेवा संघा'ची स्थापना केली. देशभर संघटनेचे जाळे पसरविले. पण सेवा संघाचे कार्यकर्ते आणि नेते हे सवर्ण हिंदू धर्मातूनच जास्त आले. हरिजनांच्या सेवेसाठी हरिजन वर्गातून आलेले कार्यकर्ते तसे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच निघाले. त्यामुळे महात्मा गांधींची ही चळवळ तळागाळापर्यंत जाऊनच पोहोचली नाही. ब्रिटिश राजवटीत लंडनला गोलमेज परिषदा झाल्या. त्या वेळी गांधीजी आपणच हरिजनांचे प्रतिनिधी आहोत असे सांगत. काही मुस्लिम नेते - मौलाना आझाद, खान गफारखान यांच्यासारखे काँग्रेस पक्षात होते म्हणून गांधीजी आपण मुसलमानांचेही प्रतिनिधित्व करतो असा दावा करीत. ही गोष्ट खरी आहे की, गांधीजींच्या बाजूला काही मुस्लिम नेते आणि मुस्लिम समाजाचा काही भाग होता. तसेच गांधीजींच्या बाजूला काही हरिजन नेते आणि हरिजन समाजाचा काही भाग होता. याचा अर्थ मुस्लिम आणि हरिजन यांचे प्रतिनिधित्व करण्याएवढा मोठा पाठिंबा त्यांना होता असा नव्हे. वस्तुस्थिती अशी होती की, डॉ. भीमराव आंबेडकर यांना त्या काळी अस्पृश्यांचा-दलितांचा पाठिंबा होता.

महाराष्ट्रातील अस्पृश्योद्धारक चळवळीचा विचार करताना दोन थोर संस्थानिकांची नावे घ्यावीच लागतात. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज! हे दोन्ही राजे खऱ्या अर्थाने जनतेचे राजे होते. त्यांना एक सामाजिक दृष्टी होती. सामाजिक बांधिलकी होती. अस्पृश्य समाजातील तरुणांना शैक्षणिक कार्यात पुढे येण्यासाठी मदत करण्यात ते तत्पर असत. बहुजन समाजाचा उद्धार व्हावयाचा असेल तर शिक्षणाचा प्रसार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे म्हणून या दोन्ही संस्थानांत सर्व धर्मांच्या आणि जातींच्या विशेषतः अस्पृश्य विद्यार्थ्यांना मुक्त हस्ते मदत केली जाई. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात जेव्हा भीमराव आंबेडकर गेले, त्या वेळी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनीच शिष्यवृत्ती दिली होती. दुसऱ्यांदा लंडन येथे बॅरिस्टर पदवी घेण्यासाठी जेव्हा भीमराव आंबेडकर गेले, त्या वेळी त्यांना कोल्हापूरचे शाहू महाराज यांनी भरीव मदत केली. त्याचप्रमाणे १९२०च्या मार्च महिन्यात ज्या वेळी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांची पहिली परिषद माणगाव येथे भरली होती, त्या वेळी भीमराव आंबेडकर यांना बोलावून शाहू महाराजांनी त्यांचा परिचय अस्पृश्य समाजाला करून दिला. त्या वेळी केलेल्या भाषणात ते म्हणतात, "माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो! तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढलात याबद्दल मी सर्वांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय रहाणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की, आंबेडकर हे सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. माझी मनोदेवता मला असे सांगते." या परिषदेनंतर शाहू महाराज, सरदार,

मानकरी ह्यांच्यासोबत आंबेडकर आणि इतर अस्पृश्य कार्यकर्ते यांनी भोजन केले. (कीर), छत्रपती शाहू महाराज आणि आंबेडकर असे परस्परांच्या जवळ आले आणि त्याच वेळी आंबेडकर उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. शाहू महाराजांशी पत्राद्वारे त्यांनी संबंध ठेवला होता. पण १९२२ साली ज्या वेळी आंबेडकर परत भारतात यावयास निघाले त्यावेळी त्यांना दुःखद बातमी समजली की, शाहू महाराज यांचे कोल्हापूर येथे निधन झाले आहे! सुदैवाने जर शाहू महाराज आणखी काही वर्षे राहिले असते; तर शाहू-आंबेडकर यांनी महाराष्ट्राच्या समाजकारणाला आणि राजकारणाला एक वेगळीच दिशा दाखविली असती!

३१ जानेवारी १९२० रोजी शाहू महाराजांच्या सक्रीय सहकार्याने आंबेडकरांनी 'मूकनायक' या नावाचे पाक्षिक सुरू केले. अस्पृश्य वर्गाच्या दुःखांना वाचा फोडण्याचे महत्त्वाचे कार्य या पाक्षिकाने आरंभिले. 'मूकनायक'च्या पहिल्या अंकातच बाबासाहेबांनी लिहिले आहे, "हिंदुस्थानदेश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे. हिंदूसमाज हा एक मनोरा आहे. एक एक जात म्हणजे एक मजला आहे. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनोऱ्यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यावरील इसम कितीही लायक असो तो वरच्या मजल्यावर जाणार नाही. वरच्या मजल्यावरील माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यावर कोणी ढकलून देणार नाही!" आंबेडकरांच्या विचारात किती स्पष्टता आणि सुबोधता होती त्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

# २.

# महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह

अमेरिकेतील वास्तव्यात आंबेडकरांनी १९१५ साली कोलंबिया विश्वविद्यालयात 'प्राचीन भारतातील व्यापार' हा प्रबंध सादर केला आणि एम.ए. डिग्री मिळविली. 'दि इव्हॅल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शल फायनॅन्स इन ब्रिटिश इंडिया' या प्रबंधाबद्दल कोलंबिया विश्वविद्यालयाने 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही अत्युच्च पदवी दिली. १९२२ साली लंडन विश्वविद्यालयाने त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी दिल. त्यासाठी त्यांनी 'रुपयांचा प्रश्न' हा अर्थशास्त्रावरचा प्रबंध साकर केला होता. तसेच ग्रेजइन येथून त्यांनी बॅरिस्टरची पदवी देखील मिळविली होती. 'प्रॉव्हिन्शियल डिसेन्ट्रलायझेशन ऑफ इंपिरियल फायनॅन्स इन ब्रिटिश इंडिया' या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी लंडन विद्यापीठाची एम.एस्सी ही पदवी मिळविली. अशा प्रकारे अमेरिका आणि इंग्लंड या दोन देशात पाच-सहा वर्षांचे वास्तव्य करून, अतिशय परिश्रमपूर्वक आंबेडकरांनी विविध विद्यापीठांच्या पदव्या मिळविल्या आणि भारतातील पददलित समाजाचा हा नेता आपल्या समाजाचे आणि देशाचे नेतृत्व करण्यसाठी १४ एप्रिल १९२३ साली मुंबईस परतला !

नुसत्याच पदव्या घेऊन आंबेडकर भारतात परत आले नाहीत; तर नव्या विकसीत जगाचे संस्कार घेऊन भारतात परत आले. कायदा, अर्थशास्त्र आणि इतिहास हे त्यांना भावी आयुष्यात अत्यंत उपयोगी पडणारे महत्त्वाचे विषय होते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या घोषणेने त्यांना फार प्रभावित केले. १९१७ साली रशियात समाजवादी क्रांती झाली. त्यामुळे कार्ल मार्क्स आणि लेनिन यांच्या नव्या विचारांची पुस्तकेही त्यांनी वाचली होती. अमेरिकेतील निग्रो गुलामांची परिस्थिती आणि घटना दुरुस्तीनंतर त्यांना बहाल करण्यात आलेले स्वातंत्र्य, अमेरिकेतले यादवी युद्ध इत्यादी विषयांची माहिती आंबेडकरांनी चांगलीच मिळविली होती. लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले सरकार म्हणजे लोकशाही हे अब्राहम लिंकनचे घोषवाक्य आणि त्या तत्त्वाचा विश्वव्यापी अर्थ आंबेडकरांना समजला होता. अब्राहिम लिंकन यांनी आता हे सांगितले असले तरी महात्मा गौतम बुद्धांनी दोन हजार वर्षांपूर्वी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' सांगून ठेवलेले आहे. आणि लिंकनचे विचार त्यांच्या जवळचे आहेत. उगवत्या भांडवलशाहीचे आणि साम्राज्यशाहीचे अर्थशास्त्र आंबेडकरांना माहीत झाले. कायदा आणि समाज यांचा संबंध आणि कायदा आणि सत्ता यांचा

संबंध याबाबतीत त्यांचे चिंतन बरेच सखोल झाले होते. इंग्लंड आणि अमेरिका या दोन प्रगत राष्ट्रातील जनतेची आपल्या भारत देशाच्या जनतेशी तुलना करता आपणाला किती प्रचंड कार्य करावयाचे आहे आणि किती लांबचा पल्ला गाठावयाचा आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. भारतात परतल्यावर सुरू करावयाचे सामाजिक कार्य सोपे नव्हते. शतकानुशतकाची धर्माची आणि रुढीची बंधने त्यांना तोडायची होती. ज्या दलितांना दास्यातून मुक्त व्हावयाचे आहे, त्यांना प्रथम त्या दास्याची जाणीव करून देणे महत्त्वाचे आहे हे ओळखून सामाजिक संघटना बांधून लोकजागृती करण्याचा निर्धार आंबेडकरांनी केला होता. त्यांच्या अगोदर अस्पृश्यांच्या उद्धारासाठी सवर्ण हिंदूतील विचारवंतांनी केलेल्या कार्याची त्यांना जाणीव होती. थोडक्यात म्हणजे पूर्ण विचारांनी आणि सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रियपणे उतरायचे ठरवून त्यांनी आपली बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक तयारी जय्यत ठेवली होती. कोणत्याही अन्य राजकीय, सामाजिक कार्यातील नेत्यांच्या तुलनेत आंबेडकरांच्यापाशी असलेल्या विश्वविद्यालयीन पदव्या आणि व्यक्तिमत्व निश्चितच कमी नव्हते हे मान्यच करावे लागते !

व्यवसाय म्हणून आंबेडकरांनी वकीली सुरू केली. कायद्याचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. जात आड येत होती. परिस्थितीशी दोन हात करीत मार्ग काढणे याची त्यांना बालपणापासूनच सवय होती. सामाजिक आणि राजकीय कार्यासाठी पाय रोवून आंबेडकर उभे राहिले आणि दलित-पददलित जनतेला नवा नेता लाभला ! हा नवा नेता या जातीतच जन्माला आला होता. या समाजाची सुखदुःखे त्यांची स्वतःची होती. धर्मबांधव साधी माणुसकीची वागणूक द्यावयास तयार नव्हते. स्पर्श तर राहू द्या, साधी सावलीदेखील पडली तर विटाळ मानला जायचा. अक्षरओळख सोडा पण संस्कृतचे शब्द कानावर पडले तर त्यांच्या कानात शिसाचा रस ओता, अशा धर्मग्रंथांच्या आज्ञा होत्या. शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी सर्व मागासलेपणाचा वारसा घेऊन जन्माला आलेल्या बहिष्कृताची बाजू घेऊन, आंबेडकरांना उभे रहायचे होते. आंबेडकर ज्या महार जातीत जन्माला आले, त्या जातीत अनेक पोट-जाती होत्या. त्यांच्यात ऐक्य भावना निर्माण करायची होती. मांग, रामोशी, ढोर, चांभार इत्यादी जातीजातींत सलोखा घडवून आणायचा होता. सवर्णातले जे नेते तन-मन-धनाने अस्पृश्यांच्या उद्धारासाठी कार्य करीत आहेत, त्यांचे सहाय्य आंबेडकरांना घ्यावयाचे होते.

२० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे अस्पृश्य समाजाबद्दलची कळकळ असणारे नेते आणि कार्यकर्ते जमले. ब्रिटिश सरकारसमोर आपली गाऱ्हाणी मांडण्यासाठी त्यांना एक व्यासपीठ पाहिजे होते, एक संघटना पाहिजे होती. म्हणून त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. भीमराव आंबेडकर या सभेचे कार्यकारी अध्यक्ष झाले. सर चिमणलाल सेटलवाड अध्यक्षस्थानी निवडले गेले. इतर बरेच जण

कार्यकारी मंडळाचे सभासद झाले. आंबेडकरांना याची पूर्ण कल्पना होती की आपला समाज शिक्षणाकडे वळलां तरच सुधारणा झपाट्याने होईल. म्हणून बहिष्कृत हितकारिणी सभेचा कार्यक्रम ठरविताना शाळा सुरू करणे, वसतीगृहांची सोय करणे, वाचनालये उघडणे, वगैरेंना अग्रक्रम देण्यात आला. त्याचबरोबर शेती आणि उद्योगधंदे या विषयात मार्गदर्शन करण्याचे ठरविण्यात आले. वरील कार्यक्रम घेऊन, सभा भरवून जागृतीचा प्रयत्न सुरू झाला. प्रारंभी कोणी विशेष दखल घेतली नाही; पण हळूहळू आंबेडकरांची भाषणे हृदयाला भिडू लागली व सभांना लोकांची उपस्थिती वाढू लागली.

मुंबई विधिमंडळाने एका ठरावाद्वारे तळे, विहिरी, पाणवठे इत्यादी सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास अस्पृश्यांना कोणीही मनाई करू नये असे कायदे केले आणि इलाख्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तशा सूचना पाठविल्या. पण सरकारने केलेले कायदे बऱ्याच वेळा केवळ कागदावरच राहून जातात, त्या कायद्यांची अंमलबजावणी होत नसते असा सर्वांचाच अनुभव आहे. रावबहादूर सिताराम केशव बोले यांनीच अस्पृश्यांसाठी वरीलप्रमाणे ठराव विधिमंडळात मांडला होता. पण तो ठराव कृतीत येत नव्हता. महाडच्या नगरपालिकेनेही महाडचे तळे सर्व जातीधर्माच्या लोकांना खुले झाले आहे असे जाहीर केलेले असले तरी सवर्णांच्या दादागिरीमुळे तेथे पाणी भरण्यास कोणीही अस्पृश्य धजत नसत. अशा वेळी बॅ. आंबेडकरांचे लक्ष त्या महाडच्या तळ्याकडे वेधले गेले व तेथे बहिष्कृतांची एक मोठी परिषद घेऊन, तळ्याचे पाणी पिण्याचा सत्याग्रह आपण करावा असा निर्णय त्यांनी घेतला. झाडून सारे कार्यकर्ते कामाला लागले. नागपूर-नाशिकपासून बेळगावपर्यंत निरोपाची पत्रे गेली. हजारो कार्यकर्ते भाकऱ्या बांधून घेऊन दि. १९ मार्च १९२७ रोजीच म्हणजे एक दिवस अगोदरच महाडला पोहोचले. विशेष म्हणजे अस्पृश्य महिलादेखील मोठ्या संख्येने परिषदेला उपस्थित रहाण्यासाठी मिळेल त्या साधनांनी महाडला पोहोचल्या होत्या. अमाप उत्साहाने सत्याग्रहात भाग घेण्यासाठी लोक येतच होते. सुमारे २० हजारांचा प्रचंड जनसमुदाय महाडला जमला. कोणाच्या अंगावर वस्त्र आहे तर कोणाच्या नाही. पायात पायताण तर बहुतेकांच्या नव्हती. उन्हात अनवाणी सारे चालत असत. मुंबईहूनही खूप मोठ्या संख्येने मंडळी आली होती. खरे म्हणजे ही अस्पृश्य मंडळी मूळची कोकणातलीच पण उपजीविकेचे साधन शोधत ती मुंबईला पोहोचली होती. आंबेडकरांचे वडील कोकणातलेच पण ते नोकरीसाठी बडोद्यास गेले व आंबेडकरांची बहुतेक वर्षे कोकणाच्या बाहेरच गेली. पंचवीस वर्षांनंतर प्रथमच ते कोकणात आले होते. तेही महाडच्या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी आणि कृतीचा भाग म्हणून प्रत्यक्ष सत्याग्रह करण्यासाठी ते आले होते.

२० मार्च १९२७ रोजी परिषद सुरू झाली. बाबासाहेब आंबेडकर परिषदेचे अध्यक्ष होते. प्रचंड जनसमुदायापुढे अनेक स्पृश्य, अस्पृश्य नेत्यांची स्फूर्तिदायक

भाषणे झाली. अस्पृश्यांच्या समान हक्काचा सर्वांनी घोष केला. कुलाबा जिल्ह्यातील महाड हें एक गाव. म. ज्योतिबा फुलेंची सामाजिक समतेची चळवळ काही प्रमाणात या भागात येऊन पोहोचली होती. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी परिषद संघटित करण्यास हातभार लावला होताच. आंबेडकरांचे भाषण अत्यंत प्रभावी झाले. अस्पृश्य समाजात मेलेल्या जनावराचे मांस खाण्याची प्रथा होती. त्यावर आंबेडकरांनी टीका केली आणि असे मांस न खाण्याची प्रतिज्ञा करण्याचा त्यांना आदेश दिला. उष्टे-खरकटे-शिळे भाकरीचे मागून आणलेले तुकडे खावे लागत असत. यापुढे उपाशी राहू पण असले लाचारीचे अन्न खाणार नाही अशी प्रतिज्ञा, असा संकल्प करण्याचे त्यांनी आवाहन केले. आम्ही इतरांच्या इतकेच या देशाचे नागरिक आहोत, इतरांच्या इतक्याच स्वाभिमानाने जगण्याचा आमचा हक्क आहे असे त्यांनी ठासून सांगितले. हक्क भीक मागून मिळत नसतात, ते लढून मिळवावे लागतात. चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांनी वापरावे असा महाड नगरपालिकेने ठराव केला आहे. आम्ही सत्याग्रह करीत आहोत म्हणजे तो कायदेशीर ठरावच अमलात आणीत आहोत. सर्व अस्पृश्यांनी दारू पिणे सोडून द्यावे आणि मुलांना शिक्षण द्यावे असे कळकळीचे आवाहन आपल्या भाषणात आंबेडकरांनी केले. सत्याग्रहात भाग घेण्यासाठी जमलेल्या अस्पृश्य स्त्रियांना उद्देशून भाषण करताना बाबासाहेब म्हणाले, "तुम्हीच आम्हा पुरुषांना जन्म दिला आहे. आम्हाला इतर लोक कसे जनावरापेक्षाही कमी लेखतात हे तुम्हास ठाऊक आहे. काही ठिकाणी आमची सावलीसुद्धा घेत नाहीत. इतर लोकांना कोर्ट-कचेरीत मानसन्मानाच्या जागा मिळतात, परंतु तुमच्या पोटी जन्मलेल्या आम्हा मुलांना पोलिस खात्यातील साधी शिपायाची नोकरीदेखील मिळत नाही, इतका आमचा हीन दर्जा आहे. सर्व तुम्हास ठाऊक असताना तुम्ही आम्हास जन्मास का घातले असा प्रश्न तुम्हास कोणी केला तर त्याचे उत्तर काय देऊ शकाल?" त्यांच्या हृदयस्पर्शी भाषणाने सारा श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध झाला.

भाषण संपताच आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेले हजारो स्त्री-पुरुष पायऱ्या उतरून चवदार तळ्याच्या पाण्यापाशी पोहोचले. प्रथम आंबेडकरांनी आपल्या ओंजळीत पाणी घेऊन त्याचे प्राशन केले. ताबडतोब हजारो हात पुढे झाले आणि उपस्थितांपैकी सर्वांनी तळ्याचे पाणी आपल्या हातांनी प्राशन केले. आजच्या तरुण वाचकांना या घटनेचे गांभीर्य कदाचित विशेष जाणवणार नाही. कारण आता पूर्वीइतकी अस्पृश्यता राहिलेली नाही. पण त्या वेळी गावगाड्याच्या प्रथा आणि रुढी मोडण्याचे धैर्य कोणी करू शकत नसत! स्पृश्य समाजाने इशारा दिला असताना देखील अस्पृश्यांनी ते आव्हान स्वीकारून, राजरोसपणे, दिवसाढवळ्या, परिषद भरवून व मोचनि जाऊन तळ्याचे पाणी प्यावे ही या देशातील एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना आहे. गेल्या ५००० वर्षात असे कधी घडलेले नव्हते. समान हक्क मागण्यासाठी अस्पृश्याने जीभ उचलली असती तर ती छाटण्यात आली असती. पाप-पुण्याचे, स्वर्ग-नरकाचे थोतांड रचून वरिष्ठ वर्णाच्या धूर्त मंडळींनी अस्पृश्यांना

शतकानुशतके गावाच्या बाहेर ठेवले. सर्व प्रकारची घाण कामे त्यांच्याकडून सक्तीने करून घेतली. पुढील जन्मातील वाईट स्थितीचे भय दाखवून याच जन्मात नरकयातना भोगावयास लावल्या. अन्नाच्या दाण्याला आणि पाण्याच्या थेंबाला साऱ्यांना महाग करून टाकले. असला अमानुष धर्म आणि असली भयानक जातीभेदाची प्रथा जगाच्या पाठीवर कोठेही नाही !

बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ॥ हे तुकारामाने सांगूनच ठेवले आहे. बाबासाहेब केवळ बोलघेवडे पुढारी नव्हते तर प्रत्यक्ष कृती करणारे नेते होते, हे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने सिद्ध झाले आहे. सत्याग्रह शांततेच्या मार्गाने यशस्वी झाला हे पहाताच गावातील काही स्पृश्य हिंदूंच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली. हे अस्पृश्य माजले आहेत, आता यांनी चवदार तळे बाटवले आहे. आता हे सारे विरेश्वर मंदिरात घुसणार आणि देऊळ विटाळून टाकणार अशी अफवा पसरविण्यात आली. आणि थोड्याच अवधीत बाहेरून आलेल्या अस्पृश्यांवर तुफान दगडफेक करण्यात आली. त्यांच्यावर हल्ला करून त्यांना मारहाण करण्यात आली. परिषदेसाठी उभारण्यात आलेला मंडप कोसळून घालण्यात आला. हा सारा प्रकार आंबेडकर डाक बंगल्यावर पोहोचल्यानंतर घडला. त्यांना ही हकिकत समजताच त्यांनी जमावासमोर येऊन अफवांचे खंडन केले. मामलेदार आणि पोलिस यांनी जमावाला आटोक्यात आणले. बाबासाहेबांनी आपला अस्पृश्य समाज आपल्या काबूत ठेवला. महाड पोलिसांनी या प्रकारानंतर काही जणांवर खटला भरला आणि ६ जून रोजी सात जणांना चार महिन्यांच्या शिक्षेस जावे लागले. हे सर्वजण सवर्ण हिंदू होते.

भारताच्या समाज सुधारणेच्या आंदोलनात महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे. जातीयवादाची तटबंदी कोसळून घालण्यासाठी अस्पृश्यांनी केलेला पहिला उठाव असे याचे वर्णन केले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. या सत्याग्रहाचे वैशिष्ट्य हे की यात अक्षरशः हजारो अस्पृश्य स्त्री-पुरुष सामील झाले होते. हा वैयक्तिक सत्याग्रह नव्हता तर तो सामुदायिक सत्याग्रह होता. एक समुदाय आपल्यावर झालेल्या सामाजिक अन्यायाविरुद्ध येथे आवाज उठविताना दिसतो. हा खरा सामाजिक समतेसाठी चाललेला संघर्ष होता. सवर्ण हिंदू प्रतिकार करणार ही शक्यता होतीच. आणि तसेच घडले. महार समाज डोईजड होईल म्हणून त्याला आताच दाबून ठेवले पाहिजे अशी भावना या ठिकाणी दिसते. या सत्याग्रहाने काय साधले? सत्याग्रह झाल्यानंतर तळे अस्पृश्यांना खुले झाले असे घडले नाही. उलट तलावातील विटाळलेले पाणी शुद्ध करण्यासाठी ब्राह्मण सनातन्यांनी १०८ घागरी पाण्यात गाईचे शेण मिसळून ते तलावात फेकले आणि अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळलेला तलाव शुद्ध केला अशी घोषणा केली. बॅरिस्टर सावरकर त्या वेळी रत्नागिरीला होते. माणसाच्या स्पर्शाने पाणी बाटते आणि पशूंच्या शेणाने ते शुद्ध होते ही भावना तिरस्करणीय म्हणून त्याज्य आहे असे त्यांनी जाहीर करून आंबेडकरांच्या सत्याग्रहास मनःपूर्वक पाठिंबा दिला होता.

या सत्याग्रहाने महाराष्ट्रातीलच नव्हे तर साऱ्या भारतातील अस्पृश्य समाजात जागृतीची एक प्रचंड लाट निर्माण झाली. हजारो वर्षे दडपला गेलेला समाज आपल्या हक्कासाठी जागृत होऊन संघटितपणे संघर्ष करण्यासाठी तयार होऊ लागला हेच या सत्याग्रहाचे खरेखुरे फलित आहे असे मानावे लागते. या सत्याग्रहाने अस्पृश्य समाजातील आंबेडकरांचे नेतृत्व मान्य केले आणि हळूहळू आंबेडकर भारतातील समग्र दलित समाजाचे नेते ठरले. त्यांच्या नेतृत्वास जनमान्यता मिळाली आणि राजमान्यता देखील मिळाली. हिंदू धर्मातील अन्य नेत्यांना 'अस्पृश्यता' हा किती चिंताजनक प्रश्न आहे याची कल्पना आली. हा कलंक पुसून काढण्यासाठी मानवतेच्या भावनेने अनेक लहान-मोठे सेवाभावी कर्यकर्ते आंबेडकरांना पाठिंबा देण्यासाठी पुढे सरसावले. राष्ट्रीय आंदोलनात कार्य करणाऱ्या नेत्यांना याची जाणीव झाली की, स्वराज्य-प्राप्तीसाठी जशी हिंदू-मुसलमान ऐक्याची गरज आहे; तशीच हिंदूंतील विविध जातीच्या ऐक्याची गरज आहे ! त्यासाठी अस्पृश्यता नाहीशी केली पाहिजे. साऱ्या दलितांना वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने आणण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. महाराष्ट्रातल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अस्पृश्यांना समान दर्जाचे आमिष दाखवून धर्मांतर घडवून आणण्यासाठी प्रयत्न चालविले. अशा प्रकारे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने भारताच्या सामाजिक न्यायासाठी चाललेल्या चळवळीत एक प्रचंड स्फोट झाला खरा. ज़मीन हादरली पण भिंती कोसळल्या नाहीत की भेगा देखील पडल्या नाहीत.

आंबेडकरांचे अस्पृश्यतेबद्दलचे चिंतन मूलगामी होते. त्यांना हे माहीत होते की अस्पृश्यतेचे समर्थन करणारे ग्रंथ हिंदू धर्मात आहेत. त्या ग्रंथांना शिरोधार्य मानून जनता वागत आलेली आहे. रुढीची चौकट मोडण्याचा कोणी प्रयत्न केला नाही. शिवाय ही चौकट पोलादापेक्षा कठीण आहे. म्हणून तर ती इतकी शतके गेली तरी टिकून आहे. दलित जनतेच्या शक्तीचे वज्राघात होत राहिले तरच ही चौकट मोडणार आहे. म्हणून आंबेडकरांनी अत्यंत विचारपूर्वक आपला मोर्चा मनुस्मृती या ग्रंथाकडे वळविला आणि ज्या महाड गावात चवदार तळ्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह केला, त्याच गावी मनुस्मृती ग्रंथाचे दहन करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सामाजिक समतेच्या मार्गावरचे निर्धाराने टाकलेले हे अतिशय महत्त्वाचे पाऊल होते. धार्मिक गुलाम-गिरीविरुद्ध पुकारलेले हे बंड होते.

# ३.

# मनुस्मृतीचे दहन

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह होऊन आठ महिने होऊन गेले पण प्रत्यक्ष परिस्थितीत सुधारणा झाली नाही, सारे अस्पृश्य पाण्याला वंचितच राहिले. एका घावात दुभंगणारा हा दगड नव्हता. यावर अनेक प्रहार करणे आवश्यक होते. म्हणून पुन्हा २५ डिसेंबर रोजी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्याची घोषणा झाली. तुरुंगात जाण्याची तयारी असलेल्या सत्याग्रहींची नोंदणी करण्याचे कार्य सुरू झाले. हजारोंच्या संख्येने सत्याग्रही नाव नोंदवू लागले. अभूतपूर्व जागृती अस्पृश्य समाजात निर्माण झाली. अनेक स्त्रियांनीदेखील नावे नोंदवून आपण पुरुषांच्या बरोबरीने आहोत हे दाखवून दिले. महाड येथे परिषद घेण्याचे ठरले. पुन्हा हजारो लोक महाडला जमू लागले. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बरेच नेते आणि कार्यकर्ते महाडकडे निघाले. गावोगावी जनतेने उत्साहाने त्यांचे आणि सत्याग्रहींचे स्वागत केले. गगनाला भिडणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. अस्पृश्य समाजाचा निर्धार यातून व्यक्त होत होता.

२५ डिसेंबर १९२७ रोजी प्रचंड जनसमुदाय महाड येथे जमला. पण अस्पृश्य आणि सवर्ण हिंदू यांच्यात मार्च महिन्याच्या सत्याग्रहीप्रसंगी दंगल उसळली होती, त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कुलाबा जिल्हाधिकाऱ्यांनी महाडच्या तळ्याभोवतालच्या भागात १४४ कलम लागू करून जमावबंदी केली होती. हा बंदीहुकूम मोडून सत्याग्रह करावयाचा असा सर्वांचा निर्धार होता. परिषदेच्या ठिकाणी सत्याग्रहच काय आम्ही प्राणार्पणदेखील करण्यास तयार आहोत. अशा वज्र-निर्धाराने अनेक तरुण कार्यकर्ते आले होते. सारेजण आंबेडकरांच्या आदेशाची वाट पहात होते.

२५ तारखेच्या रात्री ९ वाजता 'मनुस्मृती' जाळण्याचा ठराव टाळ्यांच्या गजरात आणि घोषाणांच्या आवाजात पास करण्यात आला. त्या पूर्वी रस्ते, विहिरी, तलाव, पाणवठे इ. ठिकाणी पाणी भरण्यास इतरांइतकाच अस्पृश्यांना हक्क असावा. सर्वांना समान अधिकार असावा. देवालये दर्शनासाठी सर्वांना खुली करण्यात यावीत. अशा आशयाचे अनेक ठराव संमत करण्यात आले होते.

मनुस्मृतीच्या दहनाच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी परिषदेच्या मंडपासमोरील मोकळ्या जागेत एक खड्डा खणण्यात आला आणि एका अस्पृश्य

संन्याशाच्या हस्ते मनुस्मृतीला भडाग्नी देण्यात आला. उपस्थितांनी त्यावेळी टाळ्यांचा गजर करून घोषणा दिल्या. भारताच्या सामाजिक उत्थानाच्या इतिहासातले एक महत्त्वाचे पान या दिवशी लिहिले गेले. अस्पृश्य समाजाने आपली सामाजिक गुलामगिरीच जणू या मनुस्मृती दहनाच्या रूपाने जाळून टाकली. माणसा-माणसातल्या समतेच्या नव्या मनूचा उदय याच ज्वालेतून झाला. त्या वेळी केलेल्या भाषणात आंबेडकर म्हणाले, "चवदार तळ्याचे पाणी आम्हास प्यावयास मिळाले म्हणजे आम्ही अमर होतो असे काही नाही." शिवाय आमच्या स्पर्शाने तलावाचे पाणी वाफ होऊन जाते असे नाही. वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने आम्ही पाणी पिऊ लागणार हा विचार सवर्णांना सलतो आहे. सामाजिक समतेचा येथून प्रारंभ होईल म्हणून त्यांना भय वाटू लागले आहे. म्हणून त्यांचा आम्ही पाणी घेतो या घटनेला विरोध आहे."

त्या काळी "बहिष्कृत भारत" नावाचे पाक्षिक आंबेडकरांनी सुरू केले होते. त्यातील एका लेखात ते लिहितात. "आम्ही जे मनुस्मृतीचे वाचन केलेले आहे, त्यावरून आमची खात्री झाली आहे की त्या ग्रंथात शुद्र निंदा करणारी, त्यांचा उपमर्द करणारी, कुटाळ उत्पत्तीचा कलंक त्यांच्या माथी मारणारी व त्यांच्याविषयी समाजात अनादर वाढविणारी वचने ओतप्रोत भरलेली आहेत. त्यात धर्माची धारणा नसून असमानतेची मात्र धुळवड घातली आहे. हे दर्शविण्यासाठी आम्ही मनुस्मृतीची होळी करीत आहोत."

आंबेडकरांनी मनुस्मृतीची होळी करून एका अर्थाने आपल्या हिंदू धर्मात असलेल्या विषमता, निर्दयता आणि अन्याय यांची होळी केलेली आहे. महाडच्या परिषदेत ठराव करून मनुस्मृतीची होळी करण्यात आली हा भारतातला पहिलाच प्रसंग म्हणता येणार नाही. कारण यापूर्वी म्हणजे १९२६ साली मद्रास येथे तेथील ब्राह्मणेत्तर समाजाच्या नेत्यांनी होळी केली होती. यावेळी प्रत्यक्ष अस्पृश्यांनी मनुस्मृती ग्रंथाची होळी केली आहे. या दोन दहनातला हा फरक आहे. अस्पृश्यांनी मनुस्मृती जाळली आणि नव्याची मागणी केली हे उभ्या भारतात प्रथमच घडत होते.

दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकात मनुस्मृती लिहिली गेली असे मानले जाते. म्हणजे सुमारे १६०० वर्षांपूर्वी हा ग्रंथ लिहिला गेला. या ग्रंथात १२ अध्याय आणि २६८४ श्लोक आहेत. १९७४ मध्ये सर विल्यम जोन्स याने मनुस्मृतीचे इंग्रजी भाषांतर कलकत्ता येथून प्रकाशित केले. पंडित जगन्नाथ तर्क पंचानन यांच्याकडून वॉरन हेस्टिंगनी 'विवादार्णव' ग्रंथ लिहून घेतला. इस्ट इंडिया कंपनीच्या हातात सत्ता आल्यावर न्यायदान करताना कोणत्या पद्धतीने करावयाचे असा प्रश्न पडला असताना वरील पुस्तके इंग्रजांना उपयोगी पडली. कुळधर्म, जातीधर्म आणि प्रथा अगर रुढी यांना समाज जीवनात कायद्यापेक्षा जास्त महत्त्व असते हे ब्रिटिशांना माहीत होते. म्हणून मनूचे कायदे त्यांनी हिंदू कोड बिलासारखे त्यावेळी उपयोगात आणले. मुसलमान आणि ख्रिश्चन यांना वगळून उरलेल्या सर्वांना म्हणजे शिख, बुद्ध, जैन, लिंगायत वगैरेंना हे जातींचे कायदे लावले व धर्मात ढवळाढवळ करणार नाही असे आश्वासन

दिले. आणि येथील समाज जेवढा दुभंगलेला, अंधश्रद्धेत रुतलेला, मागासलेला, अशिक्षित राहील तेवढे त्यांना हवे होते. म्हणजे जेथे इंग्रजी राजवट स्थिर करण्यास त्यांना मनुस्मृती उपयोगी पडली असे दिसून येते !

१९२७ साली आंबेडकर हिंदू धर्माच्याविरुद्ध नव्हते. त्या उलट हिंदू धर्मातील जातीभेद नष्ट करून हिंदू धर्माचे ऐक्य बळकट केले पाहिजे अशी त्यांची भावना होती. चातुर्वर्ण्याचा मनुस्मृतीत असलेला पुरस्कार, शूद्राबद्दल त्या ग्रंथात लिहिलेले विचार, त्या विचारांचा समाजावर असणारा पगडा आणि वर्चस्व, ते वर्चस्व झुगारणे म्हणजे पाप आहे असे पसरविण्यात आलेली भावना, मनुस्मृतीला वेदांचा मिळालेला आधार, वेद परमेश्वराने निर्माण केले आहेत अशी बुद्धीपूर्वक निर्माण केलेली समजूत, तसेच सर्व मानवाची ब्रह्मदेवाने उत्पत्ती केली आणि त्यांचे कार्य ठरवून दिले यावर श्रद्धा, वर्णातला जन्म संचितामुळे प्राप्त होतो, म्हणजे पुण्य केल्यास ब्राह्मण जातीत जन्म मिळतो, पाप केल्यास शूद्र जातीत जन्म होतो. वगैरे भावनांचा प्रभाव, यामुळे मनुस्मृती म्हणजे माणसा-माणसातल्या दारुण विषमतेस आधार देणारा ग्रंथ असाच अर्थ होतो. म्हणून अन्य कोणते ग्रंथ जाळण्यासाठी न घेता, बाबासाहेबांनी मनुस्मृती निवडली हे लक्षात घेतले पाहिजे. राजा हा परमेश्वराचा अंश आहे आणि ब्राह्मण हा 'भूदेव' आहे अशी त्यांची थोरवी गाऊन शूद्र आणि स्त्रिया यांना अत्यंत हीन लेखणारा हा ग्रंथ आहे. दुर्दैव या देशाचे की हा ग्रंथ पालखीत घालून त्यांची सवाद्य मिरवणूक काढणारे महाभाग अजून आढळतात !

आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली आणि भारतातल्या साऱ्या दलितात एक नव-चैतन्य निर्माण झाले. त्यांची अस्मिता जागृत होऊ लागली. असे आम्ही करू शकतो ही जाणीव अस्पृश्यात येऊ लागली. आम्ही शिक्षण घेऊ शकतो, आमच्यातील तरुणात इंग्लंडला जाऊन अर्थशास्त्राच्या आणि कायद्याच्या पदव्या घेण्याइतकी प्रज्ञा आहे. मूलभूत मानवी हक्कासाठी अम्ही संघटना बांधू शकतो, आमचे नेते विधिमंडळात हक्कासाठी झगडू शकतात. कमरेला झाडू आणि तोंडाला मडके बांधून फिरावयास लावणारी शक्ती आता राहिली नाही. हे समतेचे स्वातंत्र्याचे, बंधुभावाचे नवे युग येत आहे ही जाणीव देशव्यापी बनली. "जुने जाऊ द्या मरणा लागुनी ! जाळून किंवा पुरून टाका.' अशी केशवसुतांची तुतारी महाडला वाजली. शतकानुशतकाचा काळोख नाहीसा होऊन आशेचे दिव्य किरण क्षितिजावर दिसू लागले. मार्टिन ल्यूथरने पंधराव्या शतकात जे केले, ते आता भारतात होऊ लागले. युरोपात सामाजिक-धार्मिक प्रश्नात विचार क्रांतीची लाट आली आणि सारा युरोप नव्या विचाराने, नव्या प्रेरणांनी जागृत झाला. तळागाळातला सामान्य माणूस विचार करू लागला. आमच्याच वाट्याला दुःख, दारिद्र्य, अज्ञान, अवहेलना का यावी याचा तो विचार करू लागला. जुने झालेले विचार फेकून देण्याची, नवे स्वीकारण्याची, इतकेच नव्हे तर नव्यासाठी झुंज देण्याची तयारी होऊ लागली. आंबेडकरांनी केलेले मनुस्मृतीचे दहन ही काही साधीसुधी घटना

नव्हती. ती चिरस्मरणीय आणि क्रांतिकारक घटना होती. परिणामांची तमा न बाळगता अस्पृश्यांनी उचललेले हे निर्धारयुक्त पाऊल होते. अमेरिकेतल्या निग्रोंनीदेखील आपल्या मुक्तीसाठी असाच लढा दिला होता. निग्रोंच्या गुलामगिरीला ख्रिश्चन धर्मगुरूंनी पाठिंबा दिला होता. इतकेच नव्हे तर, निग्रोंच्या गुलामगिरीच्या व्यापारात चर्चचा पुढाकार असायचा, हा चर्चवर आरोप नसून हे ऐतिहासिक सत्य आहे ! प्रथम इंग्रजांनी निग्रोंच्या गुलामीची कल्पना काढली. जॉन हॉकिन्स नावाच्या गुलामाच्या व्यापाऱ्याला 'सरदार'पदाचा हुद्दा दिला. राणीने व्यापाराच्या सोईसाठी एक जहाज दिले. त्या जहाजाचे नाव 'येसू' असे होते. म्हणजे मानवाने मानवाला गुलाम करवयाचे आणि त्यासाठी धर्माचा आधार घ्यावयाचा, हे अनेक ठिकाणी चालत असे. भारतामध्ये हे दास्यत्व पराकोटीला गेले होते. त्याला धर्माचा आणि धर्मग्रंथांचा आधार होता. तो आधारभूत ग्रंथच २५ मार्च रोजी महाड येथे जाळण्यात आला.

हे सत्य आहे की राष्ट्रीय काँग्रेसने आणि महात्मा गांधींनी आंबेडकरांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाकडे किंवा त्यांनी केलेल्या मनुस्मृतीच्या दहनाकडे काही लक्ष दिले नाही. सत्यशोधक मंडळींचा दोन्ही उपक्रमांना पाठिंबा होता तरी 'मनुस्मृती' दहनाचा कार्यक्रम काही जणांना अतिजहाल वाटला. पण आंबेडकरांनी निर्धाराने हे दोन्ही कार्यक्रम यशस्वी करून दाखविले. साऱ्या भारतवर्षात या घटनेची चर्चा झाली हे काही कमी महत्त्वाचे नाही !

महाड येथील परिषदेने चवदार तळ्यावर जाऊन १४४ कलमाचा भंग करून सत्याग्रह करावा असा निर्णय घेतला. पण स्वतः जिल्हाधिकारी परिषदस्थळी आले आणि त्यांनी सरकारची सहानुभूती व्यक्त केली आणि सत्याग्रह मागे घेण्याची विनंती केली. आंबेडकरांनी शांतपणे परिस्थितीचे निरीक्षण केले आणि विचारपूर्वक सत्याग्रह न करण्याचा निर्णय घेतला. सभेत भाषण करून तो निर्णय आपल्या अनुयायांना समजावून सांगितला. खवळलेल्या जनसमुदायाला हा निर्णय समजावून सांगणे त्यांना अवघड गेले. "आमचा सत्याग्रह सरकारविरुद्ध नाही तर हिंदू धर्मातल्या सनातनवादाविरुद्ध आहे. म्हणून एकाच वेळी दोन्ही आघाड्यावर न लढता, आपण सनातनवाद्यांविरुद्ध लढत राहूया" असे सांगून सत्याग्रहाच्या विचारांपासून आंबेडकरांनी जनसमुदायाला परावृत्त केले. तसेच परिषदेची सांगता म्हणून तलावाभोवती मिरवणूक काढण्यात आली आणि हे आंदोलनाचे दुसरे पर्व समाप्त झाले !

# ४.

# काळाराम मंदिर सत्याग्रह

मनुस्मृतीच्या दहनानंतर आंबेडकरांनी नाशिकच्या काळारामाच्या मंदिराकडे लक्ष दिले. अस्पृश्य बांधवांना हे मंदिर खुले पाहिजे आणि त्यासाठी जरूर पडली तर सत्याग्रह करण्याची त्यांनी मोहिम हाती घेतली. अस्पृश्य समाजावर अन्याय करणारी शक्ती-स्थळे शोधून काढून त्यावर प्रहार करण्याची कुशाग्र बुद्धी आंबेडकरांपाशी होती. अस्पृश्यांना सामाजिक गुलामगिरीत खितपत पाडण्यास कारणीभूत झालेला ग्रंथ म्हणजे मनुस्मृती. तो ग्रंथ जाळून टाकून परिवर्तनाच्या पथावर एक पाऊल रोवून आता काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहची घोषणा करून त्याच मार्गावरचे त्यांनी दुसरे पाऊल उचलले. राम म्हणजे हिंदूंचे उच्च दैवत ! म्हणून महाराष्ट्रात शेकडो देवळे असली तरी रामाचेच मंदिर निवडण्यामागे त्यांचा हेतू सवर्ण हिंदूंच्या हृदयातला राम जागृत करण्याचा होता. पण त्या हृदयात रुढीचा आणि परंपरेचा रावण ठाण मांडून बसलेला त्यांना दिसला. नाशिक भागातील मान्यवर नेते दादासाहेब गायकवाड यांच्या सहाय्याने त्यांनी नाशिक जिल्ह्यात सत्याग्रहाचे वातावरण तयार केले. सवर्णांतील जाणती मंडळी या उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी आलेली होती; पण मुख्यतः अस्पृश्य जातीतील मंडळींचाच सत्याग्रहात सहभाग होता.

या अगोदर १३ ऑक्टोबर १९२९ रोजी केशवराव जेधे आणि काकासाहेब गाडगीळ, विनायकराव भुस्कुटे, राजभोज, थोरात इ. मंडळींनी पुण्याच्या पर्वती देवालयात अस्पृश्यांना प्रवेश असावा म्हणून सत्याग्रह करण्याचे ठरविले व सत्याग्रहींचा एक मोर्चा मंदिर प्रवेश करण्यासाठी म्हणून पर्वतीच्या दिशेने निघाला. त्या वेळी त्यांच्यावर तुफान दगडफेक झाली. पोलिस आणि लष्कराला पाचारण करण्यात आल्यामुळे पुढचा संघर्ष टळला. यावेळी आंबेडकर मुंबई येथे अन्य कार्यात गुंतले होते, त्यामुळे ते सहभागी होण्यासाठी येऊ शकले नाहीत. मात्र मुंबई येथे जाहीर सभा घेऊन त्यांनी पर्वती मंदिर सत्याग्रहास पाठिंबा दिला. त्यावेळी झालेल्या सभेत प्रबोधनकार ठाकरे यांनीही भाषण करून पाठिंबा दिला होता. त्याचप्रमाणे मदतीसाठी फंड जमविण्याचे आवाहन करून मुंबईहून सत्याग्रही तुकड्या पाठविण्याची तयारीदेखील चालवली होती. तसेच रत्नागिरीतील विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून त्याच सुमारास बॅ. सावरकर यांनीही पुढाकार घेतला होता. अमरावतीच्या अंबादेवीच्या मंदिरात देखील सत्याग्रह झाला.

काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला पाहिजे म्हणून आम्ही सत्याग्रह करणार आहोत अशी नोटीस आंबेडकरांनी देवालयाच्या व्यवस्थापकांना दिली होती. मंदिर-प्रवेशामुळे अस्पृश्यांना मोक्ष मिळणार आहे अशी आंबेडकरांची भाबडी भावना नव्हती. मंदिर-प्रवेशाने दुःख, दारिद्र्य, अज्ञान, लाचारी, संपणार आहे असे मत त्यांचे नव्हते. तर इतरांच्या बरोबरीने हिंदू म्हणून आम्हालाही देवालयात प्रवेश करण्याचा हक्क आहे हे त्यांना खडसावून सांगायचे होते. तो समतेचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यांना मंदिर-प्रवेश हवा होता. २ मार्च १९३० रोजी दुपारी नाशिक येथे प्रचंड सत्याग्रही परिषद भरली. त्यांचे अध्यक्ष आंबेडकरच होते. पूर्वीदिखील अस्पृश्यता निर्मूलनाच्या उद्देशाने सभा, परिषदा, संमलेने होत. त्यावेळी श्रोते आणि वक्ते हे मुख्यतः सवर्णातलेच असायचे. यावेळी मात्र गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटक येथून हजारो दलित कार्यकर्ते नाशिकच्या मंदिर सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी आले होते. आंबेडकरांनी भाषण करून माणूसकीला कलंक असलेल्या जातीयवादाविरुद्ध आपणास लढा द्यावयाचा आहे, हे समजावून सांगितले. जागृत अस्पृश्यांना हे ठाऊक झाले होते की महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा आम्हाला जेवढा अधिकार आहे, तेवढाच अधिकार आम्हाला नाशिकच्या रामाच्या देवालयात जाण्याचा आहे. बारा-पंधरा हजार त्याग्रहींची एक मैल लांबीची मिरवणूक शिस्तबद्धपणे, बँडच्या आवाजात घोषणा देत काळारामाच्या मंदिराच्या दिशेने निघाली. पण मिरवणूक पोहोचण्याअगोदर व्यवस्थापकांनी राम मंदिराची सारी दारे आणि खिडक्या पूर्णपणे बंद केल्या होत्या आणि देवळाजवळ जिल्हा पोलिस प्रमुखाने तंबू ठोकून आपले कार्यालय तेथे सुरू केले होते. जिल्हाधिकारी आणि पोलिसांनी मिरवणूक अडवली. हत्त्यारी पोलिसांनी देवळाभोवती कडे करून चोख बंदोबस्त ठेवला होता. नंतर मिरवणूक गोदावरी नदीच्या घाटावर आली. तेथे जाहीर सभा घेण्यात आली.

३ मार्च १०३० रोजी म्हणजे दुसऱ्या दिवशी पुन्हा मिरवणुकीने सत्याग्रहींची पहिली तुकडी मंदिराजवळ पोहोचली. तुकडीत १२५ पुरुष आणि २५ महिला सत्याग्रही होत्या. देवालयाच्या चार दरवाज्याजवळ या सत्याग्रहींनी धरणे धरली. देवालयाची दारे मात्र सतत बंदच होती. ७ एप्रिलच्या रामनवमीपर्यंत सत्याग्रह असाच चालू होता. देऊळ बंदच होते. शेवटी रामनवमी रोजी स्पृश्य आणि अस्पृश्य दोघांनी मिळून रामाचा रथ ओढावा असे ठरले; पण अस्पृश्य तरुण येऊन पोहोचण्याअगोदरच स्पृश्यांनी रथ पळवून नेला. आणि ज्या वेळी हे तरुण येऊन पोहोचले त्या वेळी त्यांच्यावर तुफान दगडफेक करण्यात आली. त्या दगडफेकीच्या वेळी आंबेडकर स्वतः त्या मोर्चात होते. दगडांच्या वर्षावापासून त्यांचा बचाव करण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी त्यांच्यावर छत्री धरली होती. डॉ. मुंजे, कुर्तकोटी, बाळासाहेब खेर यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला; पण तो विफल ठरला. सनातनी सवर्ण हिंदूंचे हृदयपरिवर्तन कांही होऊ शकले नाही. आंबेडकरांनी काही काळ हा सत्याग्रह स्थगित केला आणि पुन्हा सुरू केला. ऑक्टोबर १९३५ पर्यंत सत्त्याग्रही आंदोलन चालून राहिले. शेवटी काळाराम मंदिर

अस्पृश्यांसाठी खुले करण्याचे औदार्य कोणीही दाखविले नाही ! एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती म्हणजे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या वेळी नाशिक जिल्हा काँग्रचे अध्यक्ष अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाच्या विरुद्ध भिक्षुकांच्या आघाडीचे अध्यक्ष होते. आंबेडकर या प्रकाराला हिडीस प्रकार म्हणून संबोधतात ! राष्ट्रीय चळवळीतील नेतेमंडळी अशी वागतात म्हणूनच आंबेडकर म्हणतात, "राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्य आम्हाला अधिक महत्त्वाचे आहे." चातुर्वर्ण्य आणि अस्पृश्यता देवानेच निर्माण केली आहे अशी भावना असल्यामुळे कोणा महात्म्याने अस्पृश्यता संपविण्याचा प्रयत्न केला नाही. तो प्रयत्न महात्मा फुल्यांनी मात्र केला.

महाराष्ट्रातला आणि देशातला अस्पृश्य आंबेडकरांच्या आंदोलनाने जागृत होत आहे. आंबेडकरांच्या जातीनिर्मूलनाच्या कार्याला वेग येत आहे हे ओळखून काँग्रेसने हरिजन सेवा संघाची स्थापना केली. या संस्थेत त्यांनी महारांना वगळून इतर अस्पृश्यांना जवळ केले. आंबेडकरांना शह देण्याचा त्यांचा हा डाव होता हे स्पष्ट आहे. मंदिर प्रवेशाचा हक्क मिळविण्याच्या चळवळीला किती प्राधान्य द्यावयाचे याची स्पष्ट कल्पना आंबेडकरांना होती. मोक्षप्राप्तीच्या हक्कापेक्षा राजकीय हक्काची आपल्या अस्पृश्य समाजाला नितांत गरज आहे हे त्यांना माहीत होते. हरिजन सेवा संघातर्फेही मंदिरात प्रवेशाचे कार्यक्रम झाले. काही ठिकाणची पडकी, मोडकळीस आलेली, भग्न झालेली देवालये त्यांच्यासाठी खुली झाल्याचे नाटकही करण्यात आले. अगोदरच अशा देवालयात कोणी जातच नव्हते. तेव्हा हवे तर हरिजनांनी तेथे जावे असे लटके औदार्य दाखविण्यात आले.

दीर्घकाळ चाललेल्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहामुळे सारा नाशिक जिल्हा ढवळून निघाला. तुम्हाला समता पाहिजे ना ? तर मग आमच्याकडे कामाला येऊ नका म्हणून अस्पृश्यांवर बहिष्कार घालण्यात येऊ लागला. त्यांना गावबंदी झाली, रस्ते बंदी झाली. विद्यार्थ्यांना शाळा बंद झाली. बाजारच्या दिवशी दुकानदार माल देईनासा झाला. काही ठिकाणी अस्पृश्यांवर हल्ले झाले. आंबेडकरांकडे कार्यकर्ते येत आणि आपआपली दुःखे कथन करीत. जेथे प्रेम नाही, बंधुत्व नाही, पाणी पिण्याचा साधा अधिकार नाही, जनावरांपेक्षाही वाईट वागणूक ज्या धर्मात मिळते त्या धर्मात राहण्यात अर्थ नाही, अशी तक्रार कार्यकर्ते करीत होते. पण आंबेडकरांना हिंदू धर्मात राहूनच त्यात सुधारणा घडवून आणायची होती. पण आतापर्यंतच्या समता आंदोलनाच्या अनुभवामुळे सनातन्यांचे हृदय परिवर्तन ही कल्पना अशक्य कोटीतील वाटू लागली. धर्मांतरचा विचार त्यांच्याही मनात याच वेळीरुजला असावा असे दिसते.

१९३० साली महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सामुदायिक कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. या चळवळीला प्रचंड प्रतिसाद मिळत होता हे खरे आहे. ११ डिसेंबर १९२९ रोजी मध्यरात्री रावी नदीच्या तीरावर पं. जवाहरलाल नेहरू यांनी झेंडा फडकविला आणि संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. २६ जानेवारीला देशव्यापी स्वातंत्र्य

124313

दिन पाळण्यात आला. स्वातंत्र्याच्या घोषणेला आंबेडकरांचाक विरोध असण्याचे कारण नव्हते. त्यांचे म्हणणे एवढेच होते की, जवाहरलाला नेहरू यांनी स्वातंत्र्याच्या घोषणेबरोबरच संपूर्ण समाजिक समानतेची घोषणा करावी, स्वराज्य हा जसा जन्मसिद्ध हक्क आहे तसाच सामाजिक समता हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाने आंबेडकर हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील अस्पृश्य जनतेचे निर्विवाद नेते आहेत ही गोष्ट स्पष्ट झाली. काँग्रेसला आणि ब्रिटिश सरकारला देखील या नव्या नेतृत्वाची नोंद घ्यावीच लागली. अस्पृश्यांचे म्हणून बरेच खास प्रश्न आहेत आणिं ते सोडवावे लागणार आहेत, याची तीव्र जाणीव आता सवर्ण हिंदू नेत्यांना होऊ लागली.

# ५.

# म. गांधी आणि आंबेडकर पुणे-करार

सामाजिक समतेच्या आंदोलनाबरोबरच देशाच्या राजकारणात भाग घेणे अपरिहार्य आहे असे आंबेडकरांना वाटू लागले. कारण सत्ता असल्याशिवाय धोरणे राबविता येत नाहीत हे त्यांना माहीत होते. महाडच्या सत्याग्रहाने, मनुस्मृतीच्या दहनाने, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाने आणि एकंदर सभा, परिषदा यांच्यामुळे महाराष्ट्रातील अस्पृश्य समाजात अभूतपूर्व अशी जागृती आणि संघटना निर्माण झाली. पण एवढ्याने समाधान मानण्यासारखे त्यात काही नव्हते. म्हणून नागपूर येथे अखिल भारतीय बहिष्कृत वर्गाची परिषद घेण्याचे ठरले. आठ आणि नऊ ऑगस्ट १९३० मधील तारखा निश्चित झाल्या. अर्थातच या पहिल्या अधिवेशनानचे अध्यक्ष आंबेडकरच होते. विदर्भातून आणि देशाच्या विविध भागातून मोठ्या संख्येने प्रतिनिधी परिषदेला आलेले होते. अस्पृश्यवर्गाचे राजकीय हक्क आणि इतर मागण्या यावर ठराव आणि चर्चा करण्यास अनेक नवे कार्यकर्ते हिरीरीने पुढे सरसावले होते. अध्यक्षपदावरून आंबेडकरांनी केलेले भाषण अतिशय मार्मिक आणि प्रभावी होते. ते म्हणाले : "स्वराज्य मिळेपर्यंत सामाजिक समतेचा तुमचा प्रश्न उपस्थित करू नका असे आम्हास सांगण्यास येत आहे. आम्हाला हे मत मुळीच मान्य नाही. आम्हाला राजकीय स्वातंत्र्यही पाहिजे आणि समताही पाहिजे. स्वतंत्र भारताची घटना बनवायची असेल तर त्या घटनेत आमच्या हक्कांची सनद नोंदविली गेली पाहिजे. अल्पसंख्य दुर्बल अशा घटकाकडे दुर्लक्ष झालेले आम्ही मान्य करणार नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात आम्हाला वेगळे प्रतिनिधित्व पाहिजेत. स्वतंत्र मतदारसंघ पाहिजे. आमचे प्रतिनिधी आम्ही निवडणार ! तशी तरतूद घटनेत पाहिजे. अनेक बाबतीत ब्रिटिश सरकार हतबल आहे आणि देशात सवर्ण हिंदू आम्हाला पाठिंबा देत नाहीत, अशा कैचीत आम्ही सापडलो आहोत. अशा कठीण प्रसंगी आम्ही स्वतंत्र अशी आमची संघटना उभी केली पाहिजे. भारताला आमच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाण आम्ही करून दिली पाहिजे. इंग्रज सरकारनेही आमचे स्वतंत्र अस्तित्व मानले पाहिजे !"

आणखी एक महत्त्वाचा विचार आंबेडकर यांनी या परिषदेत मांडला. तो म्हणजे : (१) अस्पृश्यांसाठी राखीव मतदार संघ पाहिजेत (२) तसेच अस्पृश्यांसाठी आपला प्रतिनिधी निवडून दिला पाहिजे. सर्वसाधारणपणे "राखीव मतदार संघ" असावा असे सर्वांचेच मत होते. पण काही जणांनी संयुक्त मतदार संघ असावा

असेही विचार मांडले. पण आंबेडकरांनी त्याला विरोध केला. संयुक्त मतदार संघातील सवर्ण हिंदू आपणाला हवा असा उमेदवार अस्पृश्यांचा उमेदवार म्हणून अस्पृश्यांवर लादतील ही भीती त्यांनी व्यक्त केली. 'राखीव मतदार संघ' हा आंबेडकरांनी अत्यंत विचारपूर्वक मांडलेला निर्धार होता. मुसलमानांसाठी वेगळे मतदार संघ तर अस्पृश्यांसाठी वेगळे मतदार संघ का नकोत, हा त्यांचा रोखठोक सवाल होता. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, मंदिर प्रवेशाचा प्रश्न अशा सामान्य सवलती देखील देण्याइतपत हिंदू सनातनी मन तयार होणार नसेल; तर अस्पृश्यांच्या हित-रक्षणासाठी वेगळा राखीव मतदार संघ मागू नये तर काय करावे ? समाजाला राजकीय शक्ती बनावायचे असेल, तर त्याचे प्रतिनिधी शासनात गेले पाहिजेत व ते त्यांनीच निवडलेले असले पाहिजेत हे आंबेडकरांचे मत होते. राजकीय हक्कांची मागणी करून अधिवेशन संपले.

१९३० सालातला ऑगस्ट महिना संपला आणि सप्टेंबर महिन्यात आंबेडकरांना सरकारने आमंत्रित केले. या आमंत्रणामुळे भारतातील अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी आंबेडकर आहेत हे सरकारने मान्य केले. बॅ. जिना, सप्रू, जयकर आणि अन्य नेते मंडळी यांच्याबरोबर आंबेडकरही समानतेच्या नात्याने गोलमेज परिषेदेत भाग घेणार ही राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती. भारताची नवी घटना बनविण्याबाबत विचार करण्यासाठी १२ नो. १९३० रोजी लंडन येथे ही परिषद भरणार होती. राजे ५वे जॉर्ज परिषदेचे उद्‌घाटन करणार होते !

नागपूर येथे झालेल्या परिषदेने आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व अधिक वाढले. आतापर्यंत ते महाराष्ट्रातील दलितांचे नेते होते, आता ते साऱ्या भारतातील दलितांचे नेते झाले याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. राजकीय हक्क प्राप्त झाले म्हणजे जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे बदल होणार नाही याची त्यांना कल्पना होती. महणून स्वतःच्या पुढाकाराने अस्पृश्य समाजाने आपली उन्नती साधली पाहिजे असे त्यांना वाटत होते. प्रथम शिक्षण सर्वत्र पसरले पाहिजे. राहणीत सुधारणा केली पाहिजे, अस्पृश्यांनी निर्भय बनले पाहिजे. अस्पृश्य समाज एक प्रबळ राजकीय शक्ती म्हणून भारताच्या राजकारणात आणि समाजकारणात उतरला पाहिजे. आंबेडकरांनी आपल्या विचारांची अशी मांडणी केली. जनसमुदायावर या विचारांचा खोलवर प्रभाव पडला. वास्तविक महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या ज्स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा विस्तार अधिक वाढविता येणे शक्य होते. अस्पृश्य समाजाच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब राष्ट्रीय चळवळीत उठविण्यासाठी आंबेडकरांच्या मागण्या मान्य करून त्यांनाही राष्ट्रीय मुक्ती आंदोलनात सहभागी करून घेता आले असते. त्याचप्रमाणे भारतातील कम्युनिस्ट विचारांची मंडळीदेखील काँग्रेस नेत्यांना हेच विचारीत होती की, स्वराज्य मिळाल्यानंतर त्या स्वराज्यात कामगारांचे, शेतकऱ्यांचे आणि एकंदरीत कष्टकऱ्यांचे स्थान काय ? या प्रश्नाचेदेखील महात्माजी नीट निरसन करू शकले नाहीत. अगोदर स्वराज्य मिळवूया मग अस्पृश्यांचे प्रश्न विचारात घेऊ, आधी स्वराज्य मिळवू मग

कष्टकऱ्यांचे प्रश्न विचारात घेऊ - अशीच भूमिका कॉंग्रेसने घेतली होती. याचे कारण म्हणजे कॉंग्रेसच्या नेर्तृत्वावर उच्चवर्णीय आणि उच्चवर्गीयांचाच प्रभाव होता असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

४ ऑक्टोबर १९३० रोजी आंबेडकरांनी मुंबई बंदरातून बोटीने इंग्लंडकडे प्रयाण केले. परदेशाचा प्रवास त्यांना काही नवीन नव्हता. अमेरिका आणि इंग्लंड येथे अनेक वर्षे राहून त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले होते. ख्यातनाम प्राध्यापकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले होते. नामवंत विद्यापीठांच्या पदव्या त्यांनी मिळविल्या होत्या. हळूहळू भारतातील नेते मंडळी लंडनला पोहोचू लागली. आंबेडकरांच्या बरोबर मद्रासचे रावबहाद्दूर श्रीनिवासनही होते. अगोदर ठरल्याप्रमाणे इंग्रलंडच्या राजाने १२ नोव्हेंबर १९३० रोजी परिषदेचे उद्‌घाटन केले आणि त्यानंतर गोलमेज परिषदेच्या कार्यास रीतसर सुरुवात झाली. या परिषेदत सप्रू, जयकर, बॅ. जीना, डॉ. मुंजे, बिकानेरचे महाराज, ना. म. जोशी., सी. पी. रामस्वामी अय्यर इत्यादींची भाषणे झाली. या गोलमेज परिषदेत भारताची घटना वगैरे काही तयार होणार नव्हती. ब्रिटिश मुत्सद्यांशी विचारविनिमय मात्र होणार होता. २० नो. रोजी आंबेडकरांचे गोलमेज परिषदेत अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रभावी असे भाषण झाले. भारतातल्या अस्पृश्यांची गाऱ्हाणी प्रथमच जगाच्या वेशीवर टांगण्याचे महत्त्वाचे कार्य त्या वेळी आंबेडकरांनी केले. सभागृहाला त्यांनी प्रथमच कल्पना दिली की भारतात ४ कोटी २० लक्ष अस्पृश्य रहात आहेत. ही संख्या इंग्लंड किंवा फ्रान्सच्या संख्येइतकी मोठी आहे. त्या पीडित आणि शोषित जनतेच्या वतीने आपण बोलत आहोत हे प्रथम आंबेडकरांनी स्पष्ट केले.

अस्पृश्यता काय असते हे जगातल्या अन्य देशांना माहीत नाही. कारण असला अमानुष प्रकार जगात कोठेही नाही. इंग्लंड आणि अमेरिकेत निग्रो गुलामांची खरेदी-विक्री पूर्वी चालत असे. नंतर कायद्याने ती गुलामगिरी संपली. तेथे गुलामगिरी होती पण अस्पृश्यता नव्हती. धार्मिकदृष्ट्या 'विटाळ' म्हणतात तो प्रकार तेथे नव्हता. गुलामाचा स्पर्श झाला अगर त्याची सावली पडली तर त्याचे कोणी काही मानीत नसत. पण भारतात वेगळेच आहे हे आंबेडकरांना समजावून सांगावे लागे. आपल्या भाषणात त्यांनी तक्रार केली की भारतातील लष्करात अस्पृश्यांना प्रवेश नाही. पोलिस दल आणि सरकारी नोकऱ्या त्यांना मिळत नाहीत. माणूसकीची वागणूक मिळावी म्हणून भारतातील १/५ जनतेला लढावे लागत आहे. सार्वजनिक ठिकाणी पाणी मिळत नाही. देवालयात प्रवेश नाही. सरकाराच्या दृष्टीने अस्पृश्य समाज Depressed झालेला आहे. या समाजाची अवहेलना आणि कुचंबणा होते आहे. शिक्षण, आरोग्य, नोकरी ह्याला तो वंचित झालेला आहे. आंबेडकरांनी आपल्या उत्कृष्ट इंग्रजी भाषणात अतिशय तर्कशुद्धपणे आपली कैफियत परिणामकारकपणे मांडली. माणूसकीच्या हक्कासाठी आपला समाज लढत आहे हे त्यांनी स्पष्टपणे मांडले. अस्पृश्यांच्या हक्काचे निवेदन त्यांनी तयार केले. त्याच्या प्रती छापून घेतल्या आणि अनेक ठिकाणी त्या

वाटल्या. मजूर पक्षाच्या पार्लमेंटच्या सदस्यांसमोर भारतातील, अस्पृश्य म्हणजे काय या विषयावर त्यांनी एक अभ्यासपूर्ण भाषणही केले.

सायमन कमिशनवर बहिष्कार आणि नंतर सविनय आज्ञाभंगाची चळवळ, मोर्चे, निदर्शने, अटक असे चालले होते. म. गांधीजींच्या आंदोलनास धार येत चालली होती. त्यामुळे स्वाभाविकपणे काँग्रेसने पहिल्या गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकून असहकार पुकारला होता. त्यांच्या वतीने कोणीही परिषदेत भाग घेतलेला नाही ! लंडनमधील महत्त्वाची वृत्तपत्रे, इंग्लंडच्या पार्लमेंटचे सदस्य आणि राजकराणाचे अभ्यासक यांनी आंबेडकरांच्या लंडन येथील परिषदेत केलेल्या भाषणाची योग्य अशी नोंद घेऊन त्यांनी आंबेडकरांच्या वर्क्तृत्वाची आणि कर्तृत्वाची बरीच तारफि केली. १० आठवडे चाललेली ही गोलमेज परिषद १९ जानेवारी १९३१ रोजी स्थगित झाली. आपले ऐतिहासिक महत्त्वाचे काम आटोपून आंबेडकर २७ फेब्रुवारी १९३१ रोजी मुंबईला परत आले. भारतातील त्यांच्या असंख्य चाहत्यांना आनंद झाला. त्यांनी आंबेडकरांचे मनःपूर्वक स्वागत केले.

मंदिर प्रवेशाची चळवळ-मनुस्मृतीचे दहन-पाण्यासाठी सत्याग्रह-शिक्षण आणि सामाजिक सुधारणा यासाठी अहोरात्र प्रयत्न, गोलमेज परिषदेत मांडलेली अस्पृश्यांची जोरदार बाजू इत्यादींमुळे आंबेडकरांचे नवे नेतृत्व उदयाला आले व त्याला अखिल भारतीय स्वरूपही आले. आतापर्यंत स्पृश्य समाजातील विचारवंतांनी आणि नेत्यांनी अस्पृश्यता निवारण्याचा प्रयत्न केला. पण आंबेडकरांच्या रूपाने त्याच जातीत जन्माला आलेला, त्या जातीच्या सुखदुःखाशी समरस झालेला, विद्याविभूषीत तरुण नेता पुढे आलेला पाहून, खरे म्हणजे सवर्ण हिंदू समाजानेही त्यांचे स्वागत करावयास पाहिजे होते. आंबेडकरांच्या मतांचा त्यांनी आदर करावयास हवा होता. आंबेडकरांच्या सूचनांचा गंभीरपणे विचार करावयास हवा होता. आंबेडकर कांही चंद्र-सूर्य मागत नव्हते. समानतेची मानवी वागणूक त्यांना अपेक्षित होती. धर्म आणि रुढी यांचा आदेश म्हणून जुन्या प्रथांचा त्याग करावयास कोणीच तयार नाही ! थांबा ! धीर धरा ! घाई करू नका असेच उपदेश देणारे जास्त निघाले. विशेष म्हणजे म. गांधींनी देखील आंबेडकरांना नीट समजावून घेण्याचा मुळी प्रयत्नच केला नाही.

हे ठीक आहे की महात्मा गांधींनी पूर्वीपासून अस्पृश्यांच्या समस्येकडे लक्ष दिले होते. पण त्यांचे प्रश्न हे समतेचे प्रश्न लढविण्यास ते तयार नव्हते. शिवाय आंबेडकरांच्या फार पूर्वीपासून आपण अस्पृश्योद्धाराचे कार्य करीत आहोत, तेव्हा त्यांच्या समस्या आंबेडकरांएवढ्याच आपणालाही समजतात हा गांधींजीचा दावा होता. इतकेच नव्हे तर, आपणच अस्पृश्यांचेदेखील प्रतिनिधी आहोत असे ते जाहीरपणे सांगत. आंबेडकरांच्या कोणत्याही आंदोलनाला त्यांनी कधीही कसलाही पाठिंबा दिला नाही. नैतिक पाठिंबादेखील दिला नाही. दुसऱ्या गोलमेज परिषदेत तर आपल्या भाषणातून आंबेडकरांचे मुद्दे खोडून काढण्याचा प्रयत्नही केलेला आढळतो. अर्थात

आंबेडकरदेखील स्वस्थ बसणारे नव्हते. त्यांची उत्तरेही तोडीस तोड अशी आणि तर्कशुद्ध पद्धतीने मांडलेली असायची. शेवटी मुख्य मुद्दा अस्पृश्य समाजासाठी राखीव जागांचा आणि स्वतंत्र मतदार संघ असावा की संमिश्र मतदार संघ असावा याबद्दलचा होता. या दोन महान नेत्यांतील मतभेदाने तीव्र स्वरूप धारण केले. त्यावेळचे ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनल्ड यांनी 'कम्युनल ॲवार्ड' जाहीर करून स्वतंत्र मतदार संघ अस्पृश्यांना दिले. हे वृत्त समजताच येरवडा येथील तुरुंगात स्थानबद्ध असलेल्या गांधीजींनी प्राणांतिक उपोषण आरंभले.

यामुळे पुन्हा भारतीय जनतेसमोर गांधीजी आणि आंबेडकर उभे राहिले. गांधीजींना त्यांच्यासमोर उभे राहून तुमचे विचार मला मान्य नाहीत , माझ्या समाजाच्या दृष्टीने ते हिताचे नाहीत असे स्पष्ट सांगण्याचे धैर्य केवळ आंबेडकरांमध्येच होते ! अस्पृश्य समाजाला गांधीजींचे विचार पटण्यासारखे नव्हते. हा वैचारिक संघर्ष विकोपाला गेला. गांधीजींनी तर या प्रश्नावर आपले प्राण पणाला लावले होते. 'गांधीना वाचवा' म्हणून आंबेडकरांवर दडपण येऊ लागले. उपोषणाचा एक एक दिवस वाढत चालला आणि गांधीजींची प्रकृती खालावत चालली. त्यामुळे साऱ्या देशात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. शेवटी आंबेडकर म. गांधींना भेटण्यासाठी गेले. परस्पर विचारविनिमय झाला आणि गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी राखीव मतदार संघाचा पर्याय आंबेडकरांनी मान्य केला आणि गांधीजींनी उपोषण सोडले. देशपातळीवर निर्माण झालेला एक मोठा तणाव संपला. "एका अस्पृश्याने महात्मा गांधींचे प्राण वाचविले आणि १९४८ साली शेवटी एका ब्राह्मणाने हातात पिस्तूल घेऊन महात्मा गांधींचा खून केला !" गांधीजी - आंबेडकर यांच्यात झालेला करार हा 'पुणे-करार' म्हणून ओळखला जातो. या करारावर म. गांधी आणि आंबेडकर यांच्या सह्या आहेत.

आंबेडकर कोणालाही गुरुस्थानी मानत नसत आणि आपले कोणी शिष्य असावेत अशी त्यांची मुळीच अपेक्षा नव्हती. चळवळीलतला अनुभव हाच त्यांचा गुरू होता. अनुभवाने त्यांच्या लक्षात आले की, आतापर्यंत आपण जेवढी आंदोलने केली ती सर्व आपण हिंदू धर्माचे घटक आहोत हे गृहित धरूनच केली. या धर्मातला सडलेला-किडलेला भाग काढून टाकावा असे आपले प्रयत्न होते. अस्पृश्यतेचा प्रश्न हा हिंदूधर्मातंर्गत आहे असेच आपण मानले. पण प्रत्यक्षात हिंदूंचे हृदयपरीवर्तन होत असतानाचे दिसत नाही. म्हणून त्यांचे विचार एका विशिष्ट वळणावर आले आणि ते मग धर्मांतरांचा विचार करू लागले. अनेक जाहीर सभांतून त्यांनी सांगितले की, हिंदू जर आम्हाला हिंदू मानून समानेतेची वागणूक देण्यास तयार नसतील, तर आमचा धर्म कोणता हे आम्हालाच ठरवावे लागेल ? आंबेडकरांच्या या वक्तव्याने सनातनी हादरले पण विशेष परिणाम झाल्याचे दिसले नाही !

१३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवले या गावी अस्पृश्यांची एक मोठी परिषद झाली. त्या वेळी जाहीरपणे आंबेडकरांनी धर्मांतरांचा विचार

परिषदेसमोर मांडला. हिंदू धर्म चातुर्वर्ण्यावर आधारलेला आहे तो सुधारण्याच्या पलीकडे गेला आहे. त्यामुळे धर्मांतर करण्याशिवाय आम्हा अस्पृश्यांना तरणोपाय नाही. त्या वेळच्या अत्यंत गाजलेल्या भाषणात ते म्हणतात, " मी हिंदू म्हणून जन्मलो त्यास माझा इलाज नव्हता; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही !" या घोषणेनंतर मंदिर प्रवेशाचा लढा त्यांनी मागे घेतला. अन्य सामाजिक सुधारणांवर शक्ती खर्च करणे थांबविले. सर्व शक्तीनिशी समाजाला बरोबर घेऊन राजकारणाच्या आखाड्यात उतरण्याचा निर्धार केला आणि स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करण्याच्या दिशेने त्यांची पावले पडू लागली. पुढच्या आयुष्यात त्यांच्यासमोर राजकारण आणि धर्मकारण हे दोनच प्रश्न होते.

# ६.

# स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना

१९३५ सालच्या राज्य सुधारणा कायद्यानुसार एक-दोन वर्षात भारतात निवडणुकी होणार हे अगदी स्पष्ट झाले होते. त्या निवडणुकीत भाग घ्यावयाचा झाला तर एका नव्या राजकीय पक्षाची गरज आहे हे आंबेडकरांना जाणवत होते. यापूर्वी त्यांनी स्थापन केलेली 'बहिष्कृत हितकरिणी सभा' होती. पण नव्या राजकीय संदर्भात ही सभा, तिचा कार्यक्रम उपयोगी पडणारा नव्हता. म्हणून त्यांनी पूर्ण विचाराअंती हितकारिणी सभेचे काम आवरते घेतले व नवा राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या प्रयत्नाला ते लागले. राजकीय पक्षाचे स्वागत करण्याइतकी जागृतता अस्पृश्य समाजात आलेली आहे असे त्यांना वाटत होते. शिवाय अस्पृश्य समाजाच्या सुख-दुःखाशी समरस झालेली सवर्ण हिंदू जातीतील अन्य काही मंडळी असतील; तर त्यांना देखील या नव्या पक्षाचे दरवाजे खुले असतील असेही त्यांनी जाहिर केले होते. १९३६च्या ऑगस्ट महिन्यात आंबेडकरांनी आपला नवा राजकीय पक्ष स्थापन केला आणि त्याचे नाव ठेवले 'स्वतंत्र मजूर पक्ष'. आंबेडकरांचा राजकीय पिंड इंग्लंड-अमेरिकेत तयार झाला होता. त्या देशातील प्रगल्भ लोकशाही, कायद्याच्या दृष्टीने सर्व जनतेत असलेली समानता, विचार-आचारांचे आणि संघटनेचे सर्वांना असलेले स्वातंत्र्य इत्यादी गोष्टी आंबेडकरांना माहीत होत्या. इंग्लंड मधील हुजूर आणि मजूर पक्षांची इंग्लंडच्या राजकारणात चालेली चढाओढ, त्या नव्या पुढारलेल्या साम्राज्यवादी देशात झालेले औद्योगिकरण व त्यामुळे निर्माण झालेला नवा कामगारवर्ग व त्या कामगारवर्गाचे राजकारण याबद्दल आंबेडकरांना पूर्ण कल्पना आली होती. म्हणून तर त्यांनी आपल्या पक्षाचे नाव 'स्वतंत्र मजूर पक्ष' असे ठेवले. त्यांच्या राजकीय विचारधारेवर पार्लमेंटरी पद्धतीचा जबरदस्त प्रभाव होता. म्हणून कोणतीही चळवळ, कोणतीही मागणी कायद्याच्या चौकटीत बसेल असे ते कटाक्षाने पहात. कायदेशीर आणि शांततेच्या मार्गाने परिवर्तन या पद्धतीवर त्यांचा विश्वास होता.

इंग्लंडमधील मजूर पक्षातून डावे, जहाल बाहेर पडले व त्यांनी नवा पक्ष 'स्वतंत्र मजूर पक्ष' या नावाने काढला. आंबेडकरांनाही तोच अर्थ येथे अभिप्रेत आहे असे मानावयास हरकत नाही. या पक्षाने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. अतिशय चांगला आणि त्या वेळच्या राजकीय परिस्थितीशी सुसंगत असा तो जाहीरनामा आहे. भारतातल्या श्रमिकांचा आणि दलितांचा हा पक्ष आहे. या पक्षाला (१) लोकशाही

(२) नागरीक हक्क (३) कामगारांना किमान वेतन (४) भूमीहीन आणि गरीब शेतकऱ्यांना जमिनीच वाटप असा त्यांनी आपला कार्यक्रम जाहीर केला. अस्पृश्य समाजाच्या व्यतिरिक्त कष्टकऱ्यांचे फार मोठे विभाग आहेत. त्या सर्वांना एका व्यापक अशा संघटनेत आणण्याचे ठरवून त्यांनी पक्षाची स्थापना केली. प्रथमच आंबेडकर आपल्या अस्पृश्य समाजाबाहेरील जनतेचेही प्रश्न आपले प्रश्न म्हणून घेऊ लागले. हा एक फार मोठा बदल आहे. १९२९ साली मुंबई येथे तेथील कापड गिरणी कामगारांनी सहा महिन्यांचा दीर्घकाळ असा संप पुकारला होता. त्या संघाचे नेतृत्व कम्युनिस्ट पक्षाकडे होते. या संघात कापड गिरणीतील कामगार त्यात फार मोठ्या संख्येने अस्पृश्य स्त्री-पुरुष सामील झालेले होते. हे खरे आहे की कामगार म्हणून एकाच उद्योगधंद्यात कामगार काम करीत असले तरी कामावर येताना ते आपल्या जाती घेऊनच येत. वर्ग म्हणून त्यांचे प्रश्न एकच असले तरी वर्ण म्हणून भेदाभेद होताच. तो दूर करण्याचा प्रयत्न झाला। पण त्याला म्हणावे तसे यश आले नाही. त्या वेळी अस्पृश्य कामगारांनी संपातून बाहेर पडावे आणि कामावर जावे अशी हाक आंबेडकरांनी दिली होती. पण आता त्यांनीच मजूर पक्षाची स्थापना केली व सर्वांना एकत्र येण्याचे आव्हान केले. अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते आंबेडकरांच्या मजूर पक्षात होते आणि अनेक अस्पृश्य समाजातून आलेले कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षातही मोठ्या पदावर असल्याचे आम्ही पाहातो. आंबेडकरांच्या जीवनात झालेला हा बदल खास उल्लेखनीय आहे. राजकराण सुरू होताच आपोआपच काळाराम मंदिर सत्याग्रहाची चळवळ मागे घेण्यात आली. आणि आंबेडकर नवा पक्ष - नवे धोरण घेऊन राजकराणात आले.

स्वतंत्र मजूर पक्षाला आंबेडकरांसारखा असामान्य नेता लाभलेला असला तरी, तो पक्ष मुंबईसारख्या प्रांताबाहेर काही जाऊ शकला नाही. मुंबई प्रांतातच याचा प्रभाव जाणवत होता. दुसरी गोष्ट म्हणजे जेवढ्या प्रमाणात अस्पृश्यांबाहेरचे लोक या पक्षाकडे आकर्षित व्हावयास पाहिजे होते, तेवढ्या प्रमाणात ते झाले नाहीत. निवडणुका १७ फेब्रुवारी १९३७ रोजी होणार होत्या. त्यासाठी आंबेडकरांनी तुफानी प्रचार केला. अविश्रांतपणे ते सर्वत्र फिरले. काँग्रेस पक्षाच्या मागे राष्ट्रीय चळवळीचे आणि त्यागाचे वलय होते. त्या पक्षाच्या विरोधात प्रचार करणे सोपे नव्हते. पण आंबेडकरांनी प्रचाराचे रान उठवले. निवडणुका आल्या म्हणजे युतीचे राजकारण सुरू होते. केळकर-भोपटकर ही पुण्यातील हिंदू महासभेची मंडळी, ही काँग्रेस विरोधात होती. तसेच आंबेडकरांचा पक्ष देखील काँग्रेसेच्या विरोधात होता. निवडणूक तोंडावर आली असताना आंबेडकरांनी भोपटकरांना निवडून द्यावे असे पत्रक काढण्यात आले. आंबेडकरांना निवडून द्या असे पत्रक भोटकरांनी काढले. काँग्रेसने आंबेडकरांविरुद्ध क्रिकेटपटू श्री. बाळू ऊर्फ बाळू बाबाजी पालवणकर याला उभे केले होते. त्यांचा दणदणीत पराभव करून आंबेडकर विजयी झाले. १५ राखीव जागेपैकी १३ जागा आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने जिंकल्या. काँग्रेसने फक्त दोन राखीव जागा

जिंकल्या. पुण्याच्या चुरशीच्या लढतीत भोपटकरांना मात्र पराभव स्वीकारावा लागला.

देशाच्या प्रांतोप्रांतात काँग्रेसचा नेत्रदीपक विजय झाला. पण राजनिष्ठेची शपथ घ्यावयाची नाही म्हणून काँग्रेसने मंत्रिमंडळ बनविण्यास नकार दिला. म्हणून सर धनजीशहा कूपर आणि जमनादास मेहता यांचे अल्प मतातले मंत्रिमंडळ आले. पण आंबेडकरांनी या मंत्रिमंडळात सामील होण्यास स्पष्ट नकार दिला; कारण त्यांना ठाऊक होते कीं, अल्पमतातले हे मंत्रिमंडळ केव्हाही गडगडू शकते. काँग्रेसचा बहिष्कार सुमारे तीन महिने चालला. शेवटी त्यांनी शपथ घेतली. बाळासाहेब खेर हे मुख्यमंत्री झाले आणि कन्हैयालाल मुनशी गृहमंत्री म्हणून विराजमान झाले. या प्रसंगी विधिमंडळाचा सभासद म्हणून शपथ घेताना आंबेडकरांनी हातात गीता घेऊन शपथ घेतली. जमनादास मेहता आणि आंबेडकर विरोधी पक्षात राहिले. आता काँग्रेसने हातात सत्ता घेतली. भारतातल्या बहुसंख्य प्रांतातले अनेक मुख्यमंत्री हे ब्राह्मणच होते हे आंबेडकरांनी निदर्शनास आणून दिले. ब्रिटिशांची सत्ता काही प्रमाणात पडद्याआड गेली आणि त्या ठिकाणी हिंदूपैकी वरिष्ठ वर्णाचेचे लोक अधिकारावर आले. आंबेडकर म्हणत की, अस्पृश्यांच्या दृष्टीने फक्त 'मालक' बदलले !

निवडणुकीतील घवघवीत यशामुळे अस्पृश्य समाजाचे नीतिधैर्य अधिक बळावले. आंबेडकरांच्या नेतृत्वाची उंची अधिक वाढली. त्याच सुमारास १६ मार्च १९३७ रोजी ठाणे जिल्हा न्यायालयात चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचा निकाल लागला आणि तळ्याचे पाणी पिण्याचा हक्क अस्पृश्यांना मिळाला. या दोन्ही विजयामुळे सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पसरले. आंबेडकरांनी कायद्याची अत्युच्च पदवी मिळविली होती. ते बॅरिस्टर होते. त्यामुळे विधिमंडळाच्या कामकाजावर त्यांचा नेहमी प्रभाव पडे. काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडून आलेल्या उमेदवारात गुणवत्तेचा तसा दुष्काळच होता. त्यामुळे आंबेडकरांच्या प्रश्नांना उत्तरे देणे शासनकर्ता पक्ष म्हणून काँग्रेसला सोपे जात नव्हते. पण प्रचंड बहुमत त्यांच्या बाजूला असल्यामुळे कारभार हाकणे त्यांना विशेष कठीण गेले नाही. १७ नोंव्हेबर १९३७ रोजी आंबेडकरांनी खोती पद्धत नष्ट करणारे विधेयक मुंबई राज्य विधिमंडळात मांडले. कुळांना मालक बनविणे हा या विधेयकाचा मुख्य हेतू होता. त्यासाठी १९३८च्या जानेवारी महिन्यात कुळांचा एक प्रचंड मोर्चा मुंबई विधिमंडळावर नेण्यात आला. या मोर्चात मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सातारा, नाशिक इत्यादी भागातून रेल्वेने आणि बोटीने अक्षरशः हजारो शेतकरी आले होते. आंबेडकरांच्या बरोबरच कॉ. शामराव परुळेकर, इंदुलाल याज्ञिक, सी. पी. जोशी, राऊत, चित्रे इत्यादींनी नेतृत्व केले. मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांना निवेदन दिले.

निवेदन देऊन नेतेमंडळी आझाद मैदानावर जमलेल्या मोर्चेकारी शेतकऱ्यांसमोर आली. मुख्यमंत्र्यांनी आपले सरकार तुमच्या मागण्यांबाबात सहानुभूतीपूर्वक विचार करील असे आश्वास दिले होते. आश्वासने वेळ मारून नेण्यासाठी असतात असा

अनुभव आजदेखील येतो ! आझाद मैदानात विविध नेत्यांची जोरदार भाषणे झाली. त्यानंतर आंबेडकर भाषणास उभे राहिले. त्यावेळी टाळ्या आणि घोषणा देऊन श्रोत्यांनी स्वागत केले. त्या वेळी आंबेडकरांचे भाषण अत्यंत प्रभावी आणि विचारप्रवर्तक असे झाले. ते म्हणाले, "आपण कम्युनिस्टांसंबंधी वाचलेल्या पुस्तकांची संख्या सर्व भारतातील कम्युनिस्टांनी त्यासंबंधी वाचलेल्या पुस्तकांपेक्षा जास्त भरेल. कम्युनिस्ट हा कोणत्याही प्रश्नाची व्यवहारी बाजू पहात नाही. आजच्या जगात दोनच वर्ग आहेत. गरीब आणि श्रीमंत. पिळले जाणारे आणि पिळणारे. तिसरा मध्यमवर्ग, परंतु तो वर्ग अगदी लहान आहे. म्हणून शेतकरी आणि कामगार यांनी आपल्या दैन्याची कारणे कोणती आहेत याचा विचार करवा. त्यांच्या दैन्याची कारणे त्यांना पिळणाऱ्या श्रीमंतीत आहेत हे दिसून येईल. त्याला उपाय एकच. तो म्हणजे त्यांनी जातिनिरपेक्षबुद्धिने मजुरांची आघाडी संघटित करून आपले खरे हित करतील असेच कार्यकर्ते विधिमंडळावर निवडून देणे. त्यांनी असे जर घडवून आणले तरच त्यांना आसरा आणि वस्त्र यांचा लाभ होऊ शकेल. राष्ट्रासाठी अन्न आणि इतर संपत्ती निर्माण करणारे जे तुम्ही, ते भुकेकंगाल होणार नाही." आंबेडकरांच्या या भाषणाचा आवेश तर्कशुद्धता व मोजकेपणा कुठल्याही कम्युनिस्ट नेत्याला लाजवील. त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना अशी भीती वाटली की, आंबेडकर हे शेतकरी-कामगार आणि भूमिहीनांचे एक प्रभावी पुढारी बनतील. (धनंजय कीर) या काळ्या कायद्याच्या निषेधार्थ कम्युनिस्ट आणि आंबेडकर यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली स्वराज्यातील कामगारांनी निषेध-संप यशस्वी करून दाखविला. कॉंग्रेस सरकारने संपाचा मुकाबला गोळीबाराने केला आणि दोन कामगार बळी गेले. कामगारवर्गातल्या या दोन हुतात्म्यात एक लाल बावटेवाला आणि एक आंबेडकरवाला असे दोन कामगार होते ! (आंबेडकर आणि त्यांचा धम्म).

खोती वतन नष्ट करून जमिनदारी पद्धत नाहीशी करावी आणि त्य ऐवजी रयतवारी पद्धत अंमलात आणावी असा त्यांचा हेतू हे विधेयक आणयामध्ये होता. या विधेयकाबरोबर महार वतने रद्द करावीत म्हणून आणखी एक विधेयक आंबेडकरांनी आणले. वरवर पाहाता असे वाटते की महारांना मिळालेले वतन त्यांनी का म्हणून गमवावे ? पण याबाबतीत आंबेडकरांचे विचार अत्यंत मूलगामी म्हणून अर्थपूर्ण होते. वतन म्हणून महारांना काय मिळत होते ? एक लहानसा जमिनीचा तुकडा ! एवढ्या तुकड्यातून येणारे उत्पन्न महिनाभर देखील पुरण्यासारखे नसायचे आणि या वतनाच्या मोबदल्यात वतनदार महाराने गावकीची कामे गाव सांगेल तेव्हा, वेळ-काळाचा विचार न करता मुकाट्याने ती करायची. म्हणजे 'वतनदार' महार चोवीस तास गावाच्या तैनातीला असे. त्या मोबदल्यात त्याला गावात शिळी भाकर मागण्याचा हक्क असे. शेतकऱ्याच्या खळ्यावरचे धान्य मागण्याचा हक्क असे. खरे पाहिले असता "हक्क", या शब्दाला काही अर्थ नाही. ती एक प्रकारची भीक असे. या लाचारीचा त्याग करायचा असेल तर महारांची वतने नष्ट केली पाहिजेत. ज्यांचे वतन जाते त्यांना हवे तर पगारावर सरकारी नोकर म्हणून सरकारने नेमून घ्यावे. वतनाचा त्याग हा

आत्मसन्मानाच्या भावनेतून केला पाहिजे, अशी आंबेडकरांची धारणा होती. खोती पद्धतीची जमिनदारी नष्ट व्हावी त्याचप्रमाणे महार वतने नष्ट व्हावीत या विधेयकाच्या समर्थनार्थ आंबेडकरांनी केलेले तर्कशुद्ध वक्तव्य विधिमंडळाच्या इतिहासात अविस्मरणीय ठरावे असे होते. विरोधी पक्षातील नेत्यांनी सत्ताधारी पक्षाच्या विरुद्ध सभागृहात कसे झगडावे याचा जणू पाठ म्हणजे आंबेडकरांचे भाषण होते. गांधींचा आम्हाला उद्देशून वापरला जाणारा 'हरिजन' हा शब्द आम्हाला मान्य नाही, हे आंबेडकरांनी सभागृहात खडसावून सांगितले. हा शब्द आवडत असेल तर तुमच्या जातींना तो का लावत नाही? असा परखड प्रश्न ते विचारीत.

विधिमंडळाच्या व्यासपीठावरून अभ्यासपूर्ण, मुद्देसूद, तर्कशुद्ध, तिखट, उपरोधिक भाषण करावे ते आंबेडकरांनीच. निवडून आल्यावर त्यांनी तो फड जिंकला. आणि आता ते कामगारवर्गाचा कैवार घेऊन लाल बावट्याच्या बरोबरीने परेळ येथील कामगार मैदानात उतरले. १९३८ साली सप्टेंबर महिन्यात 'औद्योगिक कलहाचे विधेयक' मुंबई विधिमंडळात मांडण्यात आले. या विधेयकाने कामगारांच्या संप करण्याच्या हक्कावर गदा येणार होती. 'कामगारांच्या नागरिक हक्काची गळचेपी करण्याचा कायदा' म्हणून विधिमंडळात आणि विधिमंडळाच्या बाहेर या विधेयकाला विरोध करण्याचा निर्णय आंबेडकर - जमनादास मेहता यांनी घेतला. त्याचप्रमाणे मुंबई येथील कापड कामगारांच्या संघटनेने, म्हणजे गिरणी कामगार युनियनमध्ये कार्य करणारे नेते आणि कार्यकर्ते यांनी या कामगारविरोधी विधेयकाविरुद्ध प्रचंड मोहिम उभारली होती. मोर्चे, निदर्शनि सभा चालूच होत्या. म्हणजे आंबेडकरांचा 'स्वतंत्र मजूर पक्ष' आणि कम्युनिस्टांची गिरणी कामगार युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने ७ नो. १९३८ रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप करून या विधेयकाला विरोध करण्याचे ठरले. या संपाला विरोध करून तो मोडून काढण्यासाठी सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या वतीने जंगजंग पछाडण्यात आले. याउलट विरोधकांतर्फे कामगार भागात प्रचाराची धमाल उडविण्यात आली. आंबेडकर, डांगे, परुळेकर, निमकर, मिरजकर इत्यादी नेते सभेत भाषणे करीत. हजारोंच्या संख्येने कामगार सभेला जमत.

संपाचा बंदोबस्त करण्यासाठी मुंबईचे पोलिस कमी पडतील म्हणून आसपासच्या जिल्ह्यातून हत्यारी पोलिसांच्या तुकड्या मुंबईस आणण्यात आल्या आणि कामगार वस्तीत त्यांची गस्त सुरू झाली. कामगार मैदानावर जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड सभा झाली. विविध संघटनांच्या नेत्यांची प्रभावी भाषणे झाली. सर्वांनी कामगारविरोधी काळ्या कायद्याचा मनःपूर्वक धिःकार केला. शेवटी कायद्याचे प्रतिक आणि गृहमंत्री मुन्शी यांचे प्रतिकात्मक प्रतळे करून ते मैदानात जाळण्यात आले. आंबेडकरांनी या विधेयकाला कडाडून विरोध केला. विधिमंडळाच्या व्यासपीठावरून केलेली त्यांची भाषणे गाजली. त्याचप्रमाणे कामगार मैदानावर कामगारांच्या सभेत केलेली त्याची भाषणेही गाजली. कामगारांचा प्रभावी नेता म्हणून

आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा आणखी एक पैलू कामगारक्षेत्रात दिसून आला. कम्युनिस्ट आणि आंबेडकर यांचे ऐक्य अगर आघाडी टिकली असती तर त्या काळातल्या घटनांना एक वेगळेच ऐतिहासिक महत्त्वाचे वळण लागले असते ! या वेळी स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्वयंसेवक दलानेही फार मोठी कामगिरी पार पाडली.

आंबेडकरांनी जग पाहिले होते. ब्रिटिश साम्राज्यशाहीचे गुणदोष त्यांना माहीत होते. त्यांची फोडा आणि झोडा ही नीती त्यांना माहीत होती. ज्या इंग्लंड देशात त्यांनी शिक्षण घेतले, कायद्याचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास केला, त्या देशात कामगार एक प्रभावी राजकीय शक्ती म्हणून उदयास येत आहे हे त्यांना माहीत होते. त्याचबरोबर त्यांना हे सुद्धा माहीत होते की, भारत म्हणजे काही इंग्लंड नव्हे. या देशात वसाहतीच्या मुक्ततेचा, इंग्रज साम्राज्यशाहीच्या विरुद्ध लढा उभा केला पाहिजे, हे त्यांना माहीत होते. पण हा लढा करणारे, बिनिची तुकडी म्हणून निर्णायकपणे या लढ्यात स्वतःला झोकून देणारे वर्ग कोणते, याबद्दल त्यांची खास वेगळी मते होती. भविष्यकाळात भारतात होणारे सत्ता-परिवर्तन हे कष्टकऱ्यांच्या, दलितांच्या बाजूने झाले पाहिजे ही त्यांच्या राजकारणाची मूळ धारणा होती. गोरे धनी गेले आणि काळे धनी आले तरी आपल्या समाजाची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक स्थिती सुधारणार नाही याची त्यांना कल्पना होती. अस्पृश्य समाजाचा नेता म्हणून समाजकारणात प्रवेश करताना, त्यांनी सामाजिक समतेच्या प्रश्नावर आंदोलन उभारले. मंदिरे खुली करण्याची मागणी केली. चवदार तळ्याची केस जिंकली. त्रावणकोरच्या महाराजाने आपल्या संस्थानातील १६०० देवालये अस्पृश्यांना खुली केली; तर म्हैसूरच्या महाराजाने आपल्या दरबारात दसऱ्याच्या दिवशी होणाऱ्या उत्सवात अस्पृश्यांना सहभागी करून घेण्यास मान्यता दिली.

पण आंबेडकरांनी हे ओळखले की एवढाच कार्यक्रम घेऊन व 'बहिष्कृत हितकारिणी सभा' संभाळत बसलो तर अंतिम ध्येय साध्य होणार नाही. म्हणून त्यांनी प्रत्यक्ष राजकीय आंदोलनात भाग घेण्यासाठी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली व कामगारांचे नेतृत्व केले. या घटनेचा सखोल विचार केला तर असे आढळून येते की हा मजूर पक्ष अखिल भारतीय स्वरूप धारण करू शकला नाही. आणि भारतातल्या विविध व्यवसायात पसरलेल्या लक्षावधी कामगारांचे प्रश्न घेऊन तो कामगारक्षेत्रात आपला ठसा उमटू शकला नाही. कारण कामगार क्षेत्र हे मोठे अवघड क्षेत्र आहे. येथे भावनात्मक प्रश्नांना प्राधान्य नसते, जातीचे व धर्माचे आवाहन हे तोकडे पडते. येथे रोख-ठोक आर्थिक आणि राजकीय प्रश्न घेऊन उभे रहावे लागते. डांगे-मिरजकरांच्यासारखे कामगार चळवळीला वाहून घ्यावे लागते. हे करताना अस्पृश्यांची, संघटना बांधत बांधत देशातील एकंदर श्रमजीवींची, कामगार-शेतमजूर, गरिब शेतकरी, एकंदरीत कष्टकरी समुदायाच्या संघटना बांधाव्या लागतात आणि पदोपदी वर्गसंघर्ष करावे लागतात. हे संघर्ष अनेक वेळा कायदा मोडूनदेखील करावे लागतात. आंबेडकरांची

बांधिलकी मूलतः अस्पृश्य समाजाशी निगडित असल्याने कामगारवर्गाच्या देशव्यापी संघटना बांधण्याकडे कदाचित त्यांनी लक्ष दिले नसावे !

१९३७ ते १९३९ असे विधिमंडळाचे पर्व संपले. राष्ट्रीय काँग्रेसने सत्तात्याग केला आणि युद्धकाळात संघर्षाची भूमिका घेतली. दुसरे जागतिक महायुद्ध ही एक वेगळीच अवस्था निर्माण झाली. बॅ. जिनांनी पाकिस्तानची मागणी केली. जातीय दंगे भडकू लागले. काँग्रेसने १९४१ साली सत्याग्रहाचे जन-आंदोलन उभारले. आंबेडकर ब्रिटिश व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात सामील झाले. मजूरमंत्री म्हणून ते ओळखले जाऊ लागले आणि स्वतंत्र मजूर पक्षाची घोषणा न करताच विसर्जन होऊन गेले.

# ७.

# शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन

भारताच्या इतिहासात १९४२ साल उजाडले. 'करू किंवा मरू' अशा निर्धाराने राष्ट्रीय मुक्ती आंदोलन काँग्रेसने सुरू केले. आंबेडकर त्यावेळी व्हॉइसरॉयच्या मंत्रिमंडळात होते. दुसरे महायुद्ध भडकत चालले होते. अशा वेळी इंग्रजी सत्तेचा अस्पृश्य समाजासाठी काय उपयोग होत असेल तर करून घ्यावा या उद्देशाने त्यांनी जोरदार प्रयत्न केले. पूर्वी अस्पृश्यांना लष्करात प्रवेश नसे. पण आता 'महार रेजिमेंट'ची स्थापना करण्यात आली आणि त्यांना लष्कारात प्रवेश मिळाला. हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मिळाल्या. अनेकांना सरकारी नोकरीत प्रवेश मिळाला. जे अगोदरच नोकरीत त्यांची पदोन्नती करण्यात आली. इतकेच नव्हे तर तंत्र-कौशल्य प्राप्त करून घेण्यासाठी अनेक अस्पृश्य विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली. पण आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष हा अखिल भारतीय नाही ही अडचण त्यांना पदोपदी हैराण करीत होती. म्हणून १९४२ सालातल्या मार्च महिन्यात आंबेडकरांनी सर्व प्रांतांतल्या अस्पृश्य नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची एक अखिल भारतीय परिषद नागपूर येथे घेतली. त्या बैठकीला बंगाल, उत्तर प्रदेश, मद्रास, मुंबई इत्यादी भागातून कार्यकर्ते, प्रतिनिधी आले होते. तेथे सर्वानुमते एक नवा अखिल भारतीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार १९४२च्या जुलै महिन्यात शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची रीतसर स्थापना केली. या फेडरेशनमध्ये भारतातल्या विविध भागातले अस्पृश्य पुढारी सामील झाले. त्याचबरोबर हा पक्ष म्हणजे केवळ अस्पृश्यांचा पक्ष असे त्याचे स्वरूप झाले. अस्पृश्य नसलेल्या पण मजूर कष्टकरी असलेल्या अन्य जनविभागांचा पाठिंबा जसा पूर्वी स्वतंत्र मजूर पक्षाला लाभला होता, तसा तो या नव्या पक्षाला लाभू शकला नाही. तसेच देशातील वातावरण स्वातंत्र्य चळवळीच्या घोषणांनी निनादत असताना, आंबेडकरांनी इंग्रजांच्या बाजूला रहावे हे पटले नाही आणि आवडलेही नाही. त्यामुळे सावरकर, भोपटकर यांची जशी अवस्था झाली, तशी आंबेडकरांची झाली. पण आपल्या अस्पृश्य समाजाला एकत्र ठेवण्यात त्यांना यश लाभले ! त्यांचे अल्पसे का होईना हीत साधण्यात यश आले ! स्वतंत्र मजूर पक्षाच्या वेळी सामाजिक समतेचा लढा आणि वर्गलढा एकत्रितपणे लढविला गेला. त्यामुळे त्याचे बळ वाढले. याउलट शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या स्थापनेमुळे या पक्षाच्या मर्यादा आपल्या जातीपुरत्या राहिल्या. हा पक्ष आपली व्यापकता गमावून बसला !

म्हणून पुढे आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्ष स्थापण्याचा विचार सुरू केला.

१९४५ साली अमेरिकेने जपानवर अणुबॉम्ब टाकला आणि दुसऱ्या भयानक महायुद्धाची समाप्ती झाली. इंग्रज आणि त्याच्या मित्रराष्ट्रांचा प्रचंड विजय झाला आणि वंशवादावर विश्वास ठेवणारा नाझी हुकुमशहा हिटलर याचाही पराभव झाला. १९४५च्या जुलै महिन्यात ब्रिटनमध्ये युद्धोत्तर निवडणूक झाली आणि हुजूर पक्षाचा धुव्वा उडवून मजूर पक्षाची सरशी झाली. ॲटली हे इंग्लंडचे पंतप्रधान झाले. इंग्लंडमधील या राजकीय बदलाचे चांगले परिणाम भारतावर होऊन भारत पूर्णपणे स्वतंत्र होण्याची प्रक्रिया तेथूनच सुरू झाली. आंबेडकरांच्यासमोरदेखील फार मोठ्या समस्या उभे राहिल्या. मुख्यतः जनतेपासून अलग पडणे आंबेडकरांना परवडण्यासारखे नव्हते! या काळात त्यांनी एक महत्त्वाचे शैक्षणिक कार्य केले. पिपल्स एज्युकेशन सोसायटी नावाची शैक्षणिक संस्था स्थापन केली आणि या संस्थेच्या वतीने २० जून १९४६ रोजी सिद्धार्थ कॉलेज सुरू केले. ही नामवंत संस्था आजदेखील शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाची जबाबदारी पार पाडीत आहे. औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन केले.

मुस्लिम लीगचे नेते महमदअली जिना यांनी पाकिस्तानची मागणी केली. आंबेडकरांनी या मागणीला पाठिंबा दिला. शिवाय पुढे होणारे दंगे आणि हत्या टाळावी यासाठी त्यांनी पाकिस्तानातून हिंदूंना भारतात स्थलांतरित करावे व भारतातील मुसलमानांची रवानगी पाकिस्तानाय करावी असा विचार मांडला. पण याकडे कोणी फार गंभीरपणे पाहिले नाही. पण १९४७ साली पाकिस्तान आणि भारत अशी फाळणी झाली, त्या वेळी लक्षावधीना निर्वासित म्हणून भारत आणि पाकिस्तानात जावे लागले. मद्रास काँग्रेसचे पुढारी राजगोपाळचारी आंबेडकरांच्याच मताचे होते. पाकिस्तानची लीगची मागणी मान्य करावी असे विचार ते उघडपणे मांडीत असत. थोडक्यात म्हणजे १९४२ ते १९४७ हा काळ संक्रमणावस्थेतला होता. या काळात आंबेडकरांना खूप धावपळ करावी लागली. धाडसीपणे काही निर्णय घ्यावे लागले. कधी यशाचे तर कधी अपयशाचे गोड-कडू अनुभव चाखावे लागले. आंतरराष्ट्रीय परिस्थिती तर युद्धाची होती. भारतात स्वातंत्र्य संग्रामाचे शेवटचे पर्व सुरू झाले होते. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया, चीन अशा मित्र राष्ट्रांच्या फौजांना विजयामागून विजय मिळत होता. रशियाची लाल फौज स्टॅलिनच्या नेतृत्वाखाली बर्लिनच्या रोखाने निघाली होती. सुभाषचंद्र बोस यांची आझाद सेना दिल्लीच्या रोखाने निघाली होती. तिने भारताच्या हद्दीवर शरणागती पत्करली होती. आझाद सेनेच्या नेत्यांना लाल किल्ल्यात स्थानबद्ध करण्यात आले होते. अरबी सागरातील आरमारात बंड झाले. आणि सैनिकांनी इंग्रजांचा झेंडा काढून आरमारी बोटीवर तिरंगा झेंडा - लाल बावटा आणि हिरवा झेंडा लावला होता. बिहारमध्ये पोलिसांनी इंग्रजाविरुद्ध संप पुकारला होता. इंग्रजांची सत्ता खिळखिळी होत होती. त्या काळात व्हॉइसरॉय होते लॉर्ड वेव्हेल !

१५ मार्च १९४५ रोजी इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांनी आपल्या पार्लमेंटमध्ये घेषणा करून भारताचा स्वातंत्र्य संपादन करण्याचा हक्क मान्य केला. या घोषणेचे जगभर स्वागत झाले !

नंतर इंग्लंडच्या ॲटली सरकारने भारतातील परिस्थितीचा अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी म्हणून १६ मे १९४६ साली मंत्र्यांची कमिटी जाहिर केली व हे मंत्री भारतात आले. त्यांनी भारतातील कॉंग्रेस, हिंदू महासभा, मुस्लिम लीग अशा राजकीय पक्षांच्या नेत्यांची; शिवाय भारतातील संस्थानिकांच्या प्रतिनिधींची भेट घेतली. विविध विषयांवर त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. अल्पसंख्य पक्ष नेते म्हणून आंबेडकर आणि शिखांचे नेते म्हणून मास्टर तारासिंग यांच्याही त्यांनी भेटी घेतल्या आणि ते परत लंडनला गेले. १९४२ साली स्थापन झालेले व्हॉइसरायचे कार्यकारी मंडळ वेव्हेल यांनी मे १९४६ साली बरखास्त केले. शिवाय निवडणूक होणार म्हणून आंबेडकरांना दिल्ली सोडून मुंबईला येणे भाग पडले. कारण व्हाइसरायच्या कार्यकारी मंडळात आंबेडकर मजूरमंत्री म्हणून काम पहात होते.

सप्टेंबर १९४५ साली वेव्हेल यांनी निवडणूक घेण्याची घोषणा केली होती. भारत छोडो आंदोलनाचे वलय घेऊन कॉंग्रेस निवडणुकीच्या आखाड्यात उतरली तर मुस्लिम लीगने पाकिस्तानची मागणी मतदारांसमोर ठेवली. हिंदू महासभेने अखंड भारताचा घोष लावला. आंबेडकरांची फेडरेशन अस्पृश्यांचे प्रश्न घेऊन निवडणुकीस सज्ज झाली. १९४६च्या प्रारंभी भारतात निवडणुका झाल्या. या निवडणुकीत कॉंग्रेसला भरघोस यशप्राप्ती झाली. मुस्लम लीगनेही बाजी मारली. पण आंबेडकरांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरशनने आणि हिंदू महासभेने फार कमी जागा मिळविल्या ! आंबेडकर पक्षाचा पराभव होण्याचे मुख्य कारण म्हणजे संयुक्त मतदार संघ ! राखीव मतदार संघातील अस्पृश्य आणि स्पृश्य या दोघांनाही मतदानाचा अधिकार होता. त्यामुळे अस्पृश्यांतील बहुतेकांनी आंबेडकर पक्षाला मते दिली असली तरी त्या संघातील स्पृश्य मतदारांचा कल कॉंग्रेसने उभ्या केलेल्या अस्पृश्य उमेदवारांकडेच असल्याने कॉंग्रेसचा राखीव अस्पृश्य आंबेडकरांच्या राखीव अस्पृश्यांचा पराभव करून निवडून आला. अगदी असेच मुसलमान उमेदवाराबाबत घडले. कॉंग्रेसचा उमेदवार मुसलमान असला तरी बहुतेक ठिकाणी लीगच्या उमेदवाराने कॉंग्रेसच्या मुसलमान उमेदवाराचा पराभव केला, याचे कारण मुस्लिम जागा राखीव होती आणि मतदार संघ देखील केवळ मुसलमानांचा होता. निवडणुकीनंतरच्या थोड्याच काळात क्रिप्स कमिटीचा अहवाल (१६ मे १९४६) जाहीर झाला. या अहवालात (१) भारताचे एक व्यापक असे संघराज्य असावे. (२) एक घटना समिती निर्माण करावी. (३) हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन करावे. हा अहवाल जाहीर झाल्यावर भारतातील एकंदरीत राजकीय धोरणांना एक वेगळेच वळण लागले.

१९४५ ते ५० हा युद्धोत्तर काळ आंबेडकरांच्या जीवनात अतिशय महत्त्वाचा

होता. १९४६ सालच्या निवडणुकीत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला अपेक्षित यश लाभले नाही. तरी नाउमेद न होता आंबेडकर राजकारणात क्रियाशील होते. आपली बांधिलकी अस्पृश्य समाजाशी आहे हे ब्रिद ते क्षणभरदेखील विसरत नसत. आम्हालादेखील स्वातंत्र्य पाहिजे. देश स्वतंत्र झाला पाहिजे त्याचबरोबर अस्पृश्य समाजदेखील हजारों वर्षांच्या सामाजिक गुलामगिरीतूनही मुक्त झाला पाहिजे - हे त्यांच्या जीवनाचे धृपद होते. परिस्थिती अतिशय गोंधळाची होती. हा सत्तांतराचा काळ होता. तसाच तो देशाच्या फाळणीचा काळ होता. देशभर हिंदू-मुसलमान दंगली होत होत्या. हंगामी सरकारात आंबेडकर कायदामंत्री म्हणून सामील होणार होते. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनाही पंडित नेहरूंनी सामाहून घेतले. त्याच वेळी घटना समितीची निवडणूक आली. आंबेडकर बंगालमधून मुस्लिम लीगच्या पाठिंब्यावर निवडून आले. पं. नेहरूंसारखी जाणती मंडळी स्वराज्यात सर्वांना सामावून घेण्याच्या विचारांची होती; तर सरदार पटेलांसारखे नेते आंवेडकरांना प्रतिस्पर्धी असे अस्पृश्य नेतृत्व घडविण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनी बाबू जगजीवनराम यांना हरिजनांचे नेते म्हणून पुढे आणले.

इंग्रज भारतातून जाणार हे नक्की झाले. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये १५ जुलै १९४७ रोजी हिंदी स्वातंत्र्याचा ठराव पास झाला. नव्याने स्वतंत्र होणाऱ्या देशाला राष्ट्रध्वज पाहिजे होता. तो ठरविण्यासाठी जी कमिटी नेमण्यात आली, त्या कमिटीवर आंबेडकर होते. त्यांनी तिरंगी राष्ट्रध्वजावर मध्यभागी धर्मचक्र प्रवर्तनातील अशोक चक्र सामील केले. २२ जुलै ४७ साली या ध्वजाला कमिटीची मान्यता मिळाली. भारताचा राष्ट्रध्वज तयार झाला. १५ ऑगस्ट १९४७ साली दिल्लीच्या व्हॉइसरायच्या कार्यालयावरून युनियन जॅक हे ब्रिटिश निशाण खाली आले आणि तेथे स्वतंत्र राष्ट्राचा तिरंगा झेंडा फडकविण्यात आला. भारताचे स्वराज्य फाळणीचे गालबोट लागून आले. लाखो निर्वासित भारतात आले. लाखो निर्वासित भारतातून पाकिस्तानात गेले. पाकिस्तानातल्या अस्पृश्यांना पाकिस्तान सरकार सोडायला तयार नाही. त्यांचे सक्तीने धर्मांतर करण्याचे चालले होते. कारण हलकी कामे करण्यासाठी त्यांना लोक हवे होते. याबाबत आंबेडकरांनी तीव्र निषेध केला आणि पाकिस्तानातल्या अस्पृश्यांनी मिळेल त्या मार्गाने भारतात यावे असे आवाहन केले.

फाळणीनंतर पूर्व बंगाल हा भाग पूर्व पाकिस्तान झाला. आंबेडकर त्या भागातून निवडून आले होते. त्यामुळे त्यांचे घटना समितीवरचे सदस्यत्व रद्द झाले. नंतर मुंबई विधिमंडळातील कॉंग्रेस पक्षाने आंबेडकरांना निवडून दिले. कारण जयकरांच्या राजीनाम्यामुळे एक जागा रिकामी झाली होती. अशा प्रकारे आंबेडकर पुन्हा घटना समितीत सदस्य म्हणून सामील झाले. २९ ऑगस्ट १९४७ साली घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली एक सात सदस्यांची मसुदा समिती (ड्रॉफ्टिंग कमिटी) स्थापन करण्यात आली. ज्या आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९२७ रोजी महाड येथे जाहीरपणे मनुस्मृती जाळली ,त्याच आंबेडकरांवर स्वतंत्र भारताची घटना

लिहिण्याची जबाबदारी घटना समितीने सोपवली. ही घटना देशाच्या इतिहासात अपूर्वच म्हटली पाहिजे. या घटनेने भारतात हजारों वर्षे चालत आलेली अस्पृश्यता कायद्याने रद्द केली. आंबेडकरांच्या जीवनाचे सार्थक झाले ! त्यांनी अंगिकारलेले एक कार्य पूर्ण झाले. अस्पृश्यता नष्ट करणे एवढेच कार्य घटनेचे नव्हते; त्याशिवायही अनेक गोष्टी करावयाच्या होत्या. अतिशय परिश्रम घेऊन आंबेडकरांनी ३१५ कलमे आणि १८ परिशिष्टें असलेला घटनेचा मसुदा तयार केला. घटनेचा सरनामा म्हणजे मानवी हक्काची सनद मानावा इतका तो पक्व आहे. आंबेडकरांनी आपले राज्यशास्त्राचे ज्ञान आणि समाजशास्त्राचा अभ्यास पणाला लावून अत्यंत चिकाटीने हे अवघड कार्य तडीला नेले. फेब्रुवारी १९४८ साली घटनेचा मसुदा तयार झाला. आणि कलमावर चर्चा होऊन २६ नो. १९४९ साली घटना मंजूर झाली.

आंबेडकरांनी जेव्हापासून समाजकारणात आणि राजकारणात प्रवेश केला, तेव्हापासून ते एक वादग्रस्त व्यक्ती मानले गेले आहेत. प्रारंभी सनातनी व जातीयवादी हिंदूंनी त्यांना धर्मद्रोही अशी शिवी हासडली. कारण हिंदू धर्मातल्या चातुर्वर्ण्यावर आंबेडकरांनी कडाडून हल्ला चढविला होता. आंबेडकरांचा उल्लेख करताना ती मंडळी भीमासूर आणि ब्रह्मद्वेष्टा असाही करीत. काँग्रेस पक्षातील नेत्यांनी त्यांना ब्रिटिशांचे हस्तक आणि राष्ट्रद्रोही म्हणण्यापर्यंत देखील मजल मारली. १९२९ साली झालेल्या गिरणी कामगारांच्या संपात अस्पृश्य कामगारांचे अतोनात हाल झाले म्हणून त्यांनी कामगारांनी संपापासून दूर होऊन कामावर जावे असा प्रचार केला. त्यावेळी त्यांना कामगारद्रोही आणि मालकधार्जिणे ठरविण्यात आले. महारवतनाचा त्याग महारांनी करावा असा आग्रहपूर्वक विचार आंबेडकर मांडीत, त्यावेळी काही जणांनी त्यांना समाजविरोधी ठरविण्यासदेखील कमी केले नाही.

पण नेहरूजींच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदामंत्री म्हणून केलेले कार्य, घटना समिती आणि ड्राफ्टिंग कमिटीतील आंबेडकरांचे प्रचंड कार्य, त्यांनी दाखविलेले कायद्याचे ज्ञान आणि अनुभव, त्याचप्रमाणे चिकाटीने कार्य करण्याची त्यांची बौद्धिक क्षमता या गुणावर पुन्हा भारतातील जनतेचा आणि विविध पक्षातील नेत्यांचा आदर प्राप्त करून घेण्यात यश मिळविले यात मुळीच संशय नाही ! पण हे सारे करीत असताना अखिल भारतात अस्पृश्यांची अभेद्य अशी बलशाली संघटना बांधण्यात आंबेडकरांना फार मोठे यश लाभले असे मानता येत नाही. त्यांचा शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष हळूहळू गलितगात्र झाला आणि त्याचे अस्तित्व केवळ कागदोपत्रीच तेवढे शिल्लक उरले. शिवाय या पुढच्या काळात 'जात' घेऊन राजकारणात उतरणे योग्य नाही असा विचार करून 'रिपब्लिकन' या नावाने सर्व भारतीयांसाठी खुला असणारा अखिल भारतीय स्तरावचा पक्ष स्थापावा या दिशेने त्यांचे विचारचक्र सुरू झाले.

८.

# पुन्हा नवा पक्ष - रिपब्लिकन पक्ष !

राजकारणी माणसाचे जीवन खरे म्हणजे सुळावरच्या पोळीसारखे असते. मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य म्हणून त्याला लाभणे कठीण ! आंबेडकरांच्या बाबतीत तसेच झाले. रात्रंदिवस प्रवास, भाषणे, संघर्ष यामुळे त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होऊ लागला. वयाचे अर्धशतक ओलांडल्यावर त्यांना जाणवू लागले की यापुढच्या काळात आपली प्रकृती साथ देईल याची हमी नाही. मधुमेह आणि रक्तदाबाने ते हैराण होत असत. पण त्यांची इच्छाशक्ती अतिशय प्रबळ असल्याने ते मोठ्या चिकाटीने संघर्षात भाग घेत. त्यांची सहचारिणी निधन पावून खूप वर्षे झाली; पण त्यांनी पुनर्विवाहाचा विचार केला नव्हता. आपले उरलेले आयुष्य केवळ राजकारणाला आणि समाजसेवेला वाहून घ्यावे असेच त्यांनी ठरविले होते. पण वारंवार येणाऱ्या आजारीपणात आपली काळजी घेणारी पत्नी असावी हा विचार त्यांच्या मनात येऊ लागला. एखादी नर्स सेवेसाठी ठेवता आली असती पण अशा वेळी विरोधकांना चारित्र्याबद्दल अकारण कंड्या पिकवण्याची संधी मिळू शकते; म्हणून तो विचार त्यांनी मनातून काढून टाकला. शक्य झाले तर डॉक्टर व्यवसायातील महिलेशी लग्न करावे असा त्यांनी संकल्प केला. आणि १५ एप्रिल १९४८ साली कु. डॉ. शारदा कबीर यांच्याशी ते विवाहबद्ध झाले. या विवाहाबद्दल त्यांनी आपल्या सहकारी मित्रांना आणि हितचिंतकांना कल्पना देऊन ठेवली होती. हा एक आंतरजातीय विवाह होता. आंबेडकरांच्या पत्नी सारस्वत होत्या. आंबेडकरांच्या मते जातीभेदांना कायमची मूठमाती द्यावयाची असेल तर असे आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत. मोठ्या संख्येने झाले पाहिजेत.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे झुंझार नेते, पत्रकार प्र. के. अत्रे यांची आणि आंबेडकरांची अतिशय जवळीक होती. आचार्य अत्रे यांनीदेखील आंतरजातीय विवाह केला होता. अत्रे ब्राह्मण होते तर त्यांच्या पत्नी सुधाताई या वैश्य होत्या. आंबेडकरांनी आचार्य अत्रे यांच्या या विवाहाबद्दल खास कौतुक करून अभिनंदन केले होते. इंदोरचे महाराज तुकोजीराव होळकर यांनी आपल्या अमेरिकेतील वास्तव्यात एका सुविद्य अमेरिकन युवतीशी विवाह केला. त्या वेळी हे प्रकरण साऱ्या भारतात गाजले. आंबेडकरांनी मात्र या विवाहाला जाहीरपणे आपला पाठिंबा व्यक्त केला. हा तर आंतरजातीय विवाह होताच; शिवाय तो दोन भिन्न देशातील नागरिकांचा विवाह

देखील होता. शिवाय दोन वेगवेगळ्या धर्मातला विवाह होता. राजे तुकोजीराव होळकर हे हिंदू होते तर त्यांची अमेरिकन पत्नी ही ख्रिश्चन होती. नुसत्या रोटी-व्यवहाराने जातीच्या भिंती कोसळणार नाहीतर तर त्याची पुढची पायरी म्हणून विविध जातीय आणि वर्णात लग्ने झाली पाहिजेत. तसेच विविध धर्मांतर्गत लग्नेही झाली पाहिजेत असे त्यांचे मत होते. विविध देशांतर्गत लग्ने झाली तर ती अधिक स्वागतार्ह घटना झाली असे त्यांचे मत होते.

२६ जानेवारी १९५० साली भारताताला नवी घटना मिळाली. देश स्वतंत्र, सार्वभौम झाला. १९५२च्या जानेवारीत सार्वत्रिक निवडणुका झाल्या. सर्व देशात काँग्रेस प्रंचड मताधिक्क्याने निवडून आली. पण आंबेडकरांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला फार मोठा पराभव स्वीकारावा लागला. संयुक्त मतदार संघाने फेडरेशनचा पुरा नाश केला होता. राखीव मतदार संघातील आंबेडकरवादी उमेदवारांना हरिजनांची बहुसंख्येने मते मिळत. पण अन्य हिंदूंची मते त्यांना फारच कमी मिळत. ही सारी मते काँग्रेसच्या राखीव उमेदवाराला मिळत. त्यामुळे निवडणुकीत या पुढच्या काळातदेखील आपल्या फेडरेशनचा निभाव लागणार नाही याची कल्पना आंबेडकरांना आली. त्यामुळे या भावी काळात राजकारणासाठी काँग्रेस-विरोधकांशी मैत्री-युती केली पाहिजे अशा निर्णयावर ते आले.

याच काळात संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य जोरात चालले होते. एस. एम. जोशी, आचार्य प्र. के. अत्रे आंबेडकरांशी संपर्क ठेवून होते. दादासाहेब गायकवाड, नाना पाटील, भाई डांगे, भाई चितळे, दत्ता देशमुख, उद्धवराव पाटील, भाऊराव राऊत, नी. सी. कांबळे इत्यादी विविध पक्षांची नेते मंडळी संयुक्त महाराष्ट्र समितीत होती. आंबेडकरांनी विचारांती संयुक्त महाराष्ट्र समितीला पूर्ण सहकार्य देण्याचा निर्णय घेतला व आपल्या सहकाऱ्यांना समितीत सामिल होण्याचे आदेश दिले. त्यामुळे समितीची शक्ती आणि रिपब्लीक पक्षाची भीम-शक्ती एकत्र आल्याने काँग्रेसला तोडीस तोड अशी शक्ती महाराष्ट्रात संघटित झाली. मुंबई कोणाची याबाबत आंबेडकरांची स्पष्ट भूमिका होती. कलकत्ता शहर जेवढे बंगालचे आहे, तेवढेच मुंबई शहर महाराष्ट्राचे आहे असा विचार त्यांनी मांडला होता. शेवटच्या काळात त्यांनी आपली सारी शक्ती धर्मांतराच्या विषयावर केंद्रित केली होती. त्यामुळे नव्या रिपब्लिकन पक्षाच्या जुळणीसाठी त्यांना वेळ मिळाला नाही. एवढे मात्र त्यांनी सांगून ठेवले की स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही महान तत्त्वप्रणाली घेऊन आपण नवा पक्ष बांधणार आहोत. फ्रेंच क्रांतीने जगाला ही तीन महान तत्त्वे दिली असली तरी फार पूर्वी महात्मा गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानात या तत्त्वत्रयींचा अंतर्भाव आहे असे त्यांचे म्हणणे होते. हा रिपब्लिकन पक्ष केवळ अस्पृश्य जातीचा म्हणून न ठेवता, तो सर्वांसाठी खुला राहील असे त्यांनी जाहीर केले. पण वास्तवात अस्पृश्यांशवाय या पक्षात कोणी पदार्पण केले नाही. आंबेडकरांना अनुभवाने हे माहीत झाले होते की,

आपल्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे लोक आपली मते दुसऱ्यांना देत नाहीत. त्याचप्रमाणे इतर लोक आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मते देत नाहीत. अशा परिस्थितीत निवडणुका लढविणार कशा आणि त्या जिंकणार कशा हा यक्षप्रश्न आंबेडकरांना पडलेला असे. याचे उत्तर म्हणून त्यांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे कार्य थांबविले आणि रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचा संकल्प केला. नाव बदलले पण व्यवहारात काही फरक पडला नाही. पूर्वी जे नेते, कार्यकर्ते फेडरेशनमध्ये होते तीच मंडळी रिपब्लिकन पक्षात आली. असे असले तरी पक्षाचे राजकीय कार्यक्षेत्र अधिक विस्तृत केले पाहिजे अशी निकड त्यांना वाटू लागली. सत्तेवर येण्यासाठी अन्य पर्याय राहिला नाही.

त्यावेळी महाराष्ट्राच्या नेतेपदी यशवंतराव चव्हाण होते. त्यांना बेरजेचे राजकारण माहीत होते. युती करून सत्ता थानापर्यंत पोहोचावयाचे असेल तर काँग्रेस बरोबर या किंवा काँग्रेस पक्षातच सामील व्हा. आम्ही आपले येथे स्वागत करतो अशी त्यांनी भूमिका घेतली. त्याच वेळी समितीनेदेखील एकीचे आवाहन केले. त्यामुळे पुढच्या काळात रिपब्लिकन पक्ष दुभंगला आणि काही मंडळी काँग्रेस पक्षात तर काही मंडळी विरोधी पक्षात विभागली गेली. अशा परिस्थितीत आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या बांधणीसाठी हवे असलेले आंबेडकरांचे भरभक्कम छत्र नाहीसे झाले. खरोखरच ही न भरून येणारी हानी होती. !

आंबेडकरांच्या राजकीय कार्याचा आढावा घेताना आणखी एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करणे आवश्यक आहे. ती गोष्ट म्हणजे हिंदू कोड बिल! खूप वर्षापासून या बिलावर चर्चा चालू होती. उलट-सुलट असे विचार या विषयावर मांडले जात होते. शेवटी पं. जवाहरलाल नेहरू यांनी आंबेडकरांना बोलावून त्यांच्यावर हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी सोपविली. आंबेडकरांनी आनंदाने ती जबाबदारी स्वीकारली. दीड-दोन वर्षे अत्यंत परिश्रम घेऊन त्यांनी बिल तयार केले. आपणास असलेले कायद्याचे ज्ञान, त्याचप्रमाणे विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तक इत्यादी आवश्यक गोष्टींचा समावेश असलेली संहिता त्यांनी तयार केली. हिंदूंच्या परंपरा, रुढी, धर्माज्ञा वगैरे बराच मोठा तपशील त्यांना माहीत होता. त्याचा सूक्ष्मपणे अभ्यास करून त्यांनी बिल तयार केले. अशा तऱ्हेचे कार्य आंबेडकरच चांगल्या प्रकारे करू शकतील असा पं. नेहरूंना विश्वास होता. म्हणूनच त्यांनी ही जबाबदारी आंबेडकरांवर सोपविली होती. आंबेडकरांनादेखील हिंदू कोड बील लौकर पास व्हावे आणि या ऐतिहासिक जबाबदारीतून आपण मुक्त व्हावे अशी इच्छा होती. पण शासनात प्रमुख पदावर असलेले राजेंद्र प्रसाद, सरदार पटेल इत्यादि काही नेत्यांनी हिंदू कोड बिलाला आपला विरोध दर्शविला. त्यांना हे बिल इतक्या लौकर पास होणे अगर चर्चेस येणे नको होते. कारण १९५२ सालच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका अगदी तोंडावर आल्या होत्या. तेव्हा निवडणुका झाल्यानंतर नव्या लोकसभेत हे बिल मांडले जावे व ते पास करावे का फेटाळावे का दुरुस्त करावे हे त्यांनी ठरवावे असाही एक मतप्रवाह

काँग्रेस-नेतृत्वात होता. एकंदरीत नेहरूंचा पाठिंबा असला तरी हे बिल पास करण्यासाठी त्यांनी आपले वजन, प्रतिष्ठा काही पणाला लावली नाही. शेवटी हे बिल लोकसभेसमोर आले आणि चार दिवसानंतर चर्चा तहकूब झाली. पुढील दहा वर्षात तुकड्या-तुकड्यांनी ते आले आणि थोडे थोडे पास झाले. बिल मांडले जाण्यात अडथळे येत आहेत हे माहीत होताच आंबेडकरांनी मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आणि ११ ऑक्टोबर १९५१ रोजी आंबेडकरांनी राजीनामा पं. नेहरूंकडे सादर केला. शिवाय त्यांच्याकडे नियोजन खाते देण्याचे आश्वासन नेहरूंनी पाळले नाही हेही राजीनाम्याचे एक कारण होते.

# १.

# बौद्ध धर्माचा स्वीकार

१३ ऑक्टोबर १९३५ साली आंबेडकरांनी येवले येथे जाहीर सभेत भाषण करताना सांगितले होते की 'मी हिंदू म्हणून जन्मलो पण हिंदू म्हणून मरणार नाही.' याचा सरळ अर्थ असा की, कितीही प्रयत्न केले तरी सनातनवादी प्रवृत्तीच्या वरिष्ठ वर्णाचे मतपरिवर्तन होणार नाही. चातुर्वर्ण्य हे परमेश्वरानेच निर्माण केले आहेत अशी खोटी समजूत त्यांनी बहुजन समाजाची करून ठेवली आहे. त्याचाच परिणाम म्हणून अनेक शतके ही भयानक सामाजिक विषमता वंशपरंपरेने चालत आली आहे. ही मोडून सर्व हिंदूंना एकत्र आणावे, सामाजिक न्याय सर्वांना सारखा असावा, एकाच धर्मात राहून माणसामाणसात भेद नसावेत असा प्रयत्न अनेकविध मार्गांनी आंबेडकरांनी करून पाहिला. कधी सत्याग्रह केला, कधी ग्रंथ जाळले, कधी प्रचाराचे रान उठविले, कधी ब्रिटिश सरकारकडे न्याय मागितला, कधी गोलमेज परिषदेत बाजू मांडली, कधी वर्तमानपत्रात लिहिले, कधी आपण स्वतः ग्रंथ लिहिले, विधिमंडळात भाषणे केली. महात्मा गांधींशी आपली मतभिन्नता आहे हे सांगण्याचे धाडसही त्यांनी दाखविले. पण धार्मिकदृष्टीने परिवर्तन घडविण्यास कोणीच पुढे येईनात. देवालये खुली करा म्हटले तरी ते शक्य होईना. कोणी तळ्याचे पाणी देईना, शाळेत कोणी प्रवेश देईना. याबाबतीत १८५६चे एक उदाहरण अतिशय बोलके आहे. धारवाड जिल्ह्यातील एका अस्पृश्य मुलाच्या पालकाने आपल्या मुलाला शाळेत प्रवेश मिळावा म्हणून मुख्याध्यापकाकडे अर्ज केला. त्यावेळी काय करावे असा प्रश्न पडला. तेव्हा तो अर्ज धारवाडहून मुंबईला गेला, तेथून लंडनला डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांच्याकडे गेला व तेथे विचारविनिमय होऊन उत्तर आले की त्या मुलाला शाळेत प्रवेश देऊ नये. असा प्रवेश दिला तर अन्य मुलांच्या पालकांवर त्याचा अनिष्ट परिणाम होईल आणि ते पालक आपल्या मुलांना शाळेत पाठविणे बंद करतील. अशा प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आंबेडकरांना सांगावे लागले की, 'आम्हाला असेच वागविणार असाल तर आम्ही का म्हणून हिंदू धर्मात राहावे?'

आंबेडकर हे थोर विचारवंत होते. अनुभवाने त्यांना या निष्कर्षाप्रत यावे लागले की हा धर्म सुधारणार नाही. हितसंबंधी लोक प्रतिकार चालूच ठेवणार. नजिकच्या भविष्यकाळात अस्पृश्यांच्या हातात सत्ता येणेही कठीण, तेव्हा हा धर्म सुधारेल अशी वाट पहात बसण्यापेक्षा या धर्माला कायमचा रामराम ठोकणेच चांगले!

आंबेडकरांची धर्मांतर करण्याची भीम गर्जना होताच साऱ्या भारताला हादरा बसला. त्यानंतर सहभोजनाच्या चळवळीस जोर आला. आम्ही शीवाशीव मानीत नाही, अस्पृश्यांच्या मांडीला मांडी लावून आम्ही जेवण करतो असे सांगणारे सुधारकही पुढे आले. अनेक मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली झाली. साने गुरुजींच्या उपोषणाचा परिणाम म्हणून पंढरीच्या विठोबाचे देऊळ सर्वांना खुले झाले. आळंदीच्या ज्ञानेश्वराच्या देवळात अस्पृश्यांना जाता येऊ लागले. शाळेत प्रवेश मिळणे सहज शक्य झाले. नोकऱ्या मिळू लागल्या. थोडीफार आर्थिक सुधारणा झाली. घटनेतील राखीव जागांचा लाभ बऱ्याच प्रमाणात मिळू लागला. तरीही ही प्रगती कासवाच्या चालीप्रमाणे अतिशय मंद होती. आंबेडकरांचे याबाबत चिंतन चालूच होते.

धर्मांतराची घोषणा होताच ख्रिश्चन चर्चची मंडळी आंबेडकरांना भेटण्यास आली. ख्रिस्ती धर्मात आपले आम्ही स्वागत करू असे त्यांनी आश्वासन दिले होते. शिवाय इंग्रजी राजवटीच्या सहाय्याने खेडोपाडी आदिवासी भागातदेखील ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला होता. पंडिता रमाबाई आणि इतर ज्ञानी ब्राह्मण पंडितांनी स्वेच्छेने ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता आणि बायबलचे संस्कृत भाषेत भाषांतरही केले होते. त्याचप्रमाणे काही शिख धर्माचे नेते आंबेडकरांनी शिख धर्माची पताका खांद्यावर घ्यावी अशी विनवणी करू लागले. तर काही मुल्ला-मौलवी आंबेडकरांनी इस्लाम धर्मात प्रवेश करावा अशा प्रयत्नाला लागले. पण आंबेडकरांनी भावनावश न होता पूर्ण विचारांती निर्णय घेण्याचे ठरविले. त्यांनी आपल्या हिंतचिंतकांना सांगून ठेवले होते की माझा धर्म या भारत भूमितलाच असेल आणि तो मानवातल्या समानतेवर आधारलेला असेल.

जेव्हा जेव्हा आंबेडकर धर्मांतराचा विचार मांडीत, त्या त्या वेळी त्यांच्या मनात बुद्ध धर्मापेक्षा वेगळा कोणताही धर्म नव्हता, हे अगदी सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. आंबेडकर यांनी आयुष्यात कोणाचे शिष्यत्व पत्करले नाही. पण ते जाहीरपणे सांगत की मी तीन महात्म्यांना गुरुस्थानी मानतो. पहिले गुरू म्हणजे महात्मा गौतम बुद्ध ! महात्मा बुद्धाने ज्ञान, प्रज्ञा, शील, करुणा आणि मैत्री हे पंचशील आम्हाला दिले. त्याच प्रमाणे या महात्म्याने तीन शरण सांगितले आहेत. (१) बुद्धाला शरण (२) धर्माला शरण (३) संघाला शरण. पंचशील आणि तीन शरण हे बुद्धाने दिले त्याला आंबेडकर गुरुस्थानी मानीत. महात्मा कबीर याने हिंदू तत्त्वज्ञान आणि इस्लामचे तत्त्वज्ञान याची योग्य सांगड घालून माणसा-माणसात बंधुभाव वाढविण्याचा प्रयत्न केला. उघडपणे सामाजिक समतेचा पुकारा केला. त्या कबीराला आंबेडकर गुरु मानत असत. त्यांचे तिसरे गुरु म्हणजे महात्मा फुले हे होत. १८४८ साली. म. जोतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली. अस्पृश्य मुलांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांना प्रवेश असलेली शाळा काढली. उघडपणे जातीभेदाविरूद्ध त्यांनी बंडाचे निशाण उभे केले. सामाजिक समतेचा ध्वज उंच उभारणारे म. फुले यांना आंबेडकर आपले गुरू मानत

म्हणजे आंबेडकरांचे लौकिक अर्थाने कोणी गुरू नसले तरी ज्या महात्म्यांच्या जीवनापासून आणि शिकवणीपासून आंबेडकरांना प्रेरणा मिळाली, नैतिक बळ प्राप्त झाले, त्यांचे ऋण ते मानीत असत आणि आपल्या भाषणातून त्याचा ते उल्लेख करीत असत. म. बुद्धांना गुरुस्थानी मानून आंबेडकर थांबले नाहीत. त्यांनी बौद्ध धर्माचा सखोल अभ्यास केला. माणसाची ऐहिक आणि अध्यात्मिक उन्नती करणारा, मेल्यानंतर प्राप्त होणाऱ्या खोट्या स्वर्गाचे आमिष न दाखवता याच जन्मी याच पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्यासाठी माणसाने कसे वागावे हे सांगणारा धर्म म्हणजे बुद्ध धर्म हे त्यांना माहीत होते. बुद्ध धर्म चातुर्वर्ण्य मानीत नाही. हिंदू धर्माने माणसामाणसात पाडलेले भेदाभेद या धर्माला मान्य नाहीत. अपरिग्रह, सत्य, अहिंसा, सदाचार इत्यादि थोर तत्त्वांचे आचरण सांगणारा बुद्ध धर्म आपल्या समाजबांधवांना अतिशय योग्य आहे असे त्यांना मनापासून वाटे. धर्मांतराने सारे प्रश्न क्षणात सुटतील असा भ्रमही त्यांच्या ठायी नव्हता. सामाजिक समता युगाचा हा शुभारंभ आहे असे त्यांनी सांगितले आहे. तेव्हा आपण स्वतः धर्म स्वीकारायचा तर तो बौद्ध धर्म स्वीकारावा आणि आपल्या लाखो अनुयायांना धर्म स्वीकारण्यास सांगावा तोही बौद्ध धर्मच सांगावा असे त्यांनी फार पूर्वीपासून ठरवून ठेवले होते.

आंबेडकर कोणता धर्म विकीरू इच्छितात हे त्यांच्या सहवासात असणाऱ्यांना माहीत असल्यासारखेच होते. जेव्हा आंबेडकरांनी मुंबई येथे पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि या संस्थेतर्फे पहिले महाविद्यालय काढले त्याचे नाव त्यांनी 'सिद्धार्थ महाविद्यालय' असे ठेवले होते. घटना समितीच्या ध्वज कमिटीत सभासद म्हणून काम करताना त्यांनी सर्वांना पटवून देऊन राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी चरखा न घालता अशोक चक्र घातले. मराठवाड्यात औरंगाबाद येथे नवे कॉलेज स्थापन करून त्याचे नाव मिलिंद कॉलेज ठेवले. यावरून आंबेडकरांचे धर्मांतराचे विचार कोणत्या दिशेने चालले आहेत याची सहज कल्पना करता येते. म. बुद्धाचे चरित्र आणि कार्य यावर त्यांनी प्रचंड वाचन केले. अनेक विद्वानांशी त्यांनी चर्चा केली. या विषयावर त्यांनी लिखाणही भरपूर केले. आपल्या लक्षावधी अनुयायांना या नव्या धर्माची कल्पना त्यांनी हळूहळू दिली. ज्यां धर्मात आपण जावयाचे त्या धर्माची तत्त्वे माहीत असणे आवश्यक आहे म्हणून त्यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म यासारखे ग्रंथ लिहिले. हिंदू धर्माचा आम्ही त्याग का करीत आहोत आणि बुद्ध धर्माचा स्वीकार आम्ही का करतो याबद्दलची माहिती सर्वांना असावी असे आंबेडकरांना मनापासून वाटे. म्हणून बुद्ध विचार आपल्या दलित बांधवांपर्यंत नेण्याचा त्यंनी खूप प्रयत्न केला. याहून जास्त प्रयत्न त्यांनी केला असता पण खालावत जाणारी त्यांची प्रकृती त्यांना साथ द्यावयास तयार नव्हती.

आंबेडकरांनी बुद्ध धर्माची दीक्षा घेण्याचे जाहीर करताच महाराष्ट्रातील आणि देशातील लाखो दलितांनी या घोषणेचे स्वागत केले. हे एक नवे धर्मचक्र प्रवर्तन घडत

होते. आंबेडकर बुद्ध व्हायला निघाले आणि भारतातले सारे सनातनी हतबद्ध झाले. त्यांनी आंबेडकरांवर टीकेची झोड उठविली. पण त्याचा यत्किंचितही परिणाम झाला नाही. आश्चर्य म्हणजे आंबेडकरांच्या आवतीभोवती असणाऱ्या मंडळींच्यात मात्र चलबिचल झाली. विशेषत जे सुशिक्षित अस्पृश्य समाजातून पुढे आले होते, त्यांना पेच पडला की आपण बौद्ध धर्म स्वीकारला तर आपण अस्पृश्य राहणार नाही, दलित राहणार नाही. अर्थात दलित नाही म्हणून दलितासाठी मिळणाऱ्या सवलतींना आम्हाला मुकावे लागेल. त्यामुळे धर्म बदलण्याने समाज हित साधणार नाही. यासाठी धर्मांतराचा विचार पुढे ढकलावा. त्याचप्रमाणे सार्वत्रिक निवडणूक तोंडावर आलेली आहे. सवर्णांच्या मताशिवाय आपण निवडून येणार नाही. म्हणून या येत्या निवडणुका संपेपर्यंत तरी धर्मांतराचा प्रश्न घेऊ नये असा विचार मांडला जाऊ लागला. पण आंबेडकरांनी हे मान्य केले नाही. धर्मांतराच्या निश्चयाविरुद्ध कोणतीच तडजोड करावयास त्यांनी तयारी दर्शविली नाही. काय वाटेल ते होवो, ठरलेल्या निर्णयाप्रमाणे धर्मांतर करावयाचे हे त्यांनी ठरवून टाकले.

धर्मांतरासाठी जागा कोणती निवडावी हा प्रश्न आला असताना त्यांनी नागपूर शहराची निवड केली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या शुभ दिनी नागपूरच्या दीक्षा भूमिवर सकाळी ९ ते ११ बौद्ध धर्माची दीक्षा घेण्याचा कार्यक्रम व्यवस्थितपणे आणि यशस्वीपणे पार पडला. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या कानाकोपरातून लक्षावधी दलित बांधव आंबेडकरांच्या आज्ञेप्रमाणे पांढरेशुभ्र कपडे परिधान करून दीक्षा स्थानावर उपस्थित राहिले. महिला देखील मोठ्या संख्येने आल्या होत्या. हा एक ऐतिहासिक महत्त्वाचा समारंभ होता. शेकडो वर्षानंतर या भारतभूमीत गौतम बुद्धाचा जयजयकार होत होता.

आंबेडकर बौद्ध धर्म स्वीकारणार म्हणजे त्या धर्मातला कोणता पंथ स्वीकारणार असा प्रश्न उपस्थित झाला. कारण बुद्धाच्या मृत्यूनंतर त्या धर्मांत हीनयान आणि महायान असे दोन पंथ निर्माण झाले होते. आंबेडकरांनी स्पष्ट केले की हे भेद आपणाला मान्य नाहीत. म. बुद्धाने जो बौद्ध धर्म सांगितला तोच आम्ही स्वीकारणार आहोत. हवे तर या धर्माला नवबौद्ध धर्म म्हणावे ! पौरोहित्यपद महास्थविर श्री चिंतामणी यांना देण्यात आले. कारण भारतातील सर्व बौद्धभिख्खूत ते वयोवृद्ध होते. तसेच समारंभाला शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी भारतातल्या विविध भागातल्या प्रमुख भिक्षूंनाही आमंत्रित करण्यात आले होते. सर्व प्रथम महास्थविर श्री चिंतामणी यांनी पाली भाषेतून आंबेडकर आणि त्यांच्या पत्नी यांच्याकडून तीन शरण म्हणजे, बुद्धं, धम्मं आणि संघं असे शरण म्हणवून घेतले. त्याचप्रमाणे जीवहत्या, चोरी, असत्य भाषण, अनाचार आणि मद्य यापासून दूर रहाण्याची प्रतिज्ञा करवून घेतली. पाली भाषेतील मंत्रांचा मराठी अनुवाद करून सांगण्यात आला. त्यानंतर आंबेडकर यांनी "आपण विषमता आणि छळवणूक यावर आधारलेल्या हिंदू धर्माचा त्याग करीत

आहोत आणि ज्ञान, सुमार्ग, करुणा या तीन तत्त्वावर आधारलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार करीत आहोत आणि यापुढचे माझे सारे आयुष्य मी या धर्माच्या प्रसारासाठी खर्ची घालणार आहे.'' असे आपल्या भाषणात सांगितले आणि आपण तयार केलेल्या बावीस शपथांचा गंभीरपणे उच्चार केला. यात हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती, रुढी-रिवाज, देवदेवता, अंधश्रद्धा, भोळसट समजुती इत्यादिंचा निषेध करण्यात आला होता. बौद्ध धर्मातील मानवी मूल्यांचा पुरस्कार करण्यात आला होता. अशा प्रकारे आपला दीक्षाविधी पूर्ण झाल्यावर आंबेडकर यांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना उभे राहावयास सांगितले आणि तीन शरण सांगितले आणि बावीस शपथा म्हणावयास लावल्या आणि त्यांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली! इतक्या प्रचंड संख्येने स्वेच्छेने झालेले असे धर्मांतर जगाच्या इतिहासात पहिलेच असेल! त्यानंतर आंबेडकरांनी भाषण करून उपस्थितांना सविस्तर माहिती सांगितली. हिंदू धर्मातल्या स्पृश्यास्पृश्य भेदभावावर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. शतकानुशतके धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीत डांबून ठेवल्याबद्दल त्यांनी धर्ममार्तंडांची चांगलीच हजेरी घेतली. २० वर्षांपूर्वी येवले या गावी त्यांनी धर्मांतर करण्याची मनीषा जाहीर केली होती त्याची परिपूर्ती यावेळी त्यांनी करून दाखविली.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी ही घटना घडली. नागपूर शहर बुद्धाच्या आणि आंबेडकरांच्या नावाच्या घोषणेने निनादून गेले. आठवडाभर साऱ्या वृत्तपत्रांतून हे धर्मांतर गाजत राहिले. काही महाभागांनी बौद्धधर्म म्हणजे हिंदू धर्माचीच शाखा आहे म्हणून या धर्मांतराने विशेष काही घडलेच नाही असा सूर लावला. काही विद्वानांनी तांत्रिक गोष्टी उपस्थित करून आंबेडकर हे भिख्खू नसल्याने त्यांना दीक्षा देण्याचा अधिकारच नाही असे अकलेचे तारे तोडले. पण याचा काहीही परिणाम झाला नाही. दुर्दैवाने ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे निधन झाले. म्हणजे त्यांचा बुद्ध विचार तळागाळापर्यंत नेण्यासाठी त्यांना दोन महिनेदेखील मिळाले नाहीत. काळानेच त्यांना समाजकारण, राजकारण आणि धर्मप्रसार यापासून दूर नेले. आंबेडकरांच्या रूपाने उठलेले एक वादळी व्यक्तिमत्त्व पंचत्वात विलीन झाले. २५०० वर्षानंतर बुद्धविचारांना चालना देणारा विचारवंत नेता नाहीसा झाला. खऱ्या अर्थाने देशातला सारा दलित समाज त्या दिवशीच पोरका झाला. आंबेडकरांचे विचार कोणाला पटोत अगर न पटोत, त्यांनी आयुष्यभर जे जे केले ते पूर्ण विचारांती आणि आपल्या दलित जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून केले यात तिळमात्र शंका नाही! आता साऱ्या भारत देशात आंबेडकरांचे जन्मशताब्दी वर्ष उत्साहाने साजरे होत आहे. आंबेडकरांचे जेवढे पुतळे उभारण्यात आले आहेत तेवढे अन्य कोणाचे क्वचितच असतील. आजही त्यांची स्मृती दलितांच्याच नव्हे तर सर्वांच्याच मनात ताजी आहे.

# १०.

# डॉ. बाबासाहेबानंतर पुढे काय?

महाराष्ट्राला बुद्ध धर्म काही अपरिचित नाही. औरंगाबादजवळ असलेली येथील लेणी याची साक्ष आहेत. तेथील प्रचंड शिल्प आणि कलात्मक चित्रे पाहिली म्हणजे मती गुंग होऊन जाते. पहिल्या गुहेत म. बुद्धाचा पद्मासन घालून बसलेला प्रचंड पुतळा आहे. या पुतळ्याचे वैशिष्ट्य असे की, या पुतळ्यावर उजव्या बाजूने प्रकाश टाकला तर बुद्ध चिंताक्रांत-दु:खी वाटतो. समोरून प्रकाश टाकला तर बुद्ध ध्यानमग्न अवस्थेत बसल्यासारखा दिसतो. डाव्या बाजूने प्रकाश टाकला तर बुद्ध हसल्यासारखा दिसतो. त्या अज्ञात थोर शिल्पकाराने या शिल्पाद्वारे बुद्धाच्या जीवनाचे सार अतिशय उत्तम प्रकारे मांडले आहे. जगातील दु:खे पाहून बुद्ध दु:खी झाला. या दु:खांचा शोध घेण्यासाठी दीर्घकाळ चिंतन केले आणि शेवटी दु:खाचे मूळ बुद्धाला सापडले. तोच बुद्ध धर्म! आंबेडकरांनीदेखील आपल्या अस्पृश्य समाजाची दु:खे अनुभवली. स्वत: पाहिली आणि तब्बल २० वर्षे त्यावर विचार केला. चिंतन, मनन केले आणि शेवटी त्यांनी ठरविले की आपण स्वत: बौद्ध धर्म स्वीकारावयाचा आणि आपल्या असंख्य दलित बांधवांना तो धर्म स्वीकारावयास लावायचा. या साठी त्यांनी अपार परिश्रम घेतले. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हे पुस्तक लिहिले. आंधळेपणाने धर्मांतर नको तर जाणीवपूर्वक ते झाले पाहिजे. जुने आम्ही काय टाकून देत आहोत आणि नवे आम्ही काय स्वीकारणार आहोत याचे प्रबोधन योग्य प्रकारे व्हावे यासाठी त्यांचा अट्टाहास होता. त्याकरिता जेवढे करता येण्यासारखे होते तेवढे त्यांनी जरूर केले. सामाजिक समतेवर, न्यायावर, माणसातल्या प्रामाणिकपणावर, करुणेवर, तर्कशास्त्र आणि बुद्धीवादावर, तत्त्वज्ञानाच्या कार्य-कारणभावावर, विज्ञाननिष्ठ विचारांवर आधारलेला बुद्ध-विचार त्यांनी दलितांना दिला. समाजात मान ताठ ठेवून जगण्याचा धर्म त्यांनी दिला. यासाठी पडेल तो त्याग करण्यासाठी देखील तयार व्हा असे त्यांनी आवाहन केले!

पण धर्मांतरानंतर पुढचे कार्य फार महत्त्वाचे होते. ते कार्य करण्यासाठी आंबेडकर मात्र हयात नव्हते. सारा भार अनुयायांवर येऊन पडला. ताबडतोबीचे म्हणून दोन प्रश्न होते. सार्वत्रिक निवडणुका आल्या होत्या आणि त्याच बरोबर धर्मप्रसाराचे कार्य संघटीत करावयाचे होते. या दोन्ही आघाड्या सांभाळणे अनुयायांना कठीण गेले. आंबेडकरांनी सामाजिकदृष्ट्या बौद्ध धर्म दिला आणि राजकीयदृष्ट्या 'रिपब्लिकन' पक्ष दिला. हा पक्ष केवळ दलितांचा नसावा

तर भारतातील सर्वांना तो मोकळा असावा अशी त्यांची धारणा होती. बौद्ध झाल्याबद्दल सवलती जाणार असतील तर त्याचीही पर्वा करू नये असे त्यांचे मत होते. शेवटी हा प्रश्न काही चार सवलती मिळविण्यापुरता मर्यादित प्रश्न नव्हता, तर सामाजिक समतेचा व माणसा-माणसांतील संबंधाचा हा प्रश्न होता. सवलती की धर्म असा प्रश्न आला तर धर्म महत्त्वाचा अशी ते मांडणी करीत असत!

बुद्धानंतर अनुयायात फूट पडली हे एक सत्य आहे. महमद पैगंबरानंतरदेखील इस्लाम धर्मात फूट पडून शिया आणि सुन्नी झाले. ख्रिस्ती धर्मात फूट पडून कॅथलिक आणि प्रोटेस्टंट असे दोन भाग झाले. जैन धर्मात श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन पंथ आहेतच. तेव्हा आंबेडकरानंतर रिपब्लिकन पक्षात फूट पडली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. मात्र या फुटीमुळे रिपब्लिकन पक्ष कमजोर झाला. बौद्ध धर्माचा प्रसार कोण करणार? ज्याला शरण जावे म्हणतो तो बुद्ध कोण, त्याचा धर्म कसा आणि त्याचा भिख्खू संघ आहे कोठे या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. भारतात तरी अधिक भारतीय स्वरूपाचा भिख्खू संघ नाही. ब्रह्मदेश, थायलंड, जपान वगैरे देशातले भिख्खू संघ आहेत. पण बुद्धाचे चरित्र, बुद्धाचे विचार, बुद्धाची शिकवण याबद्दल त्यांचे आपापसात मतभेद आहेत. त्यामुळे धर्मप्रसाराच्या आघाडीवरच्या कामाने गती घेतली नाही आणि भारतीय राजकारणात रिपब्लिकन पक्ष आपली छाप पाडू शकला नाही!

जगातला सर्वात मोठा देश चीन. चीनमधील शंभर कोटी लोकांचा धर्म म्हणजे बौद्ध धर्म. पण त्या देशात धार्मिक कार्यक्रमांना प्रोत्साहन कमी. धर्माचा आणि राजकारणाचा त्या देशात संबंध ठेवण्यात आला नाही. १९४९ साली क्रांती होऊन चीन देशात कम्युनिस्टांनी सत्ता हातात घेतली आहे. तेथे त्यांनी कार्ल मार्क्स आणि म. बुद्धाची सांगड घातली आहे. सामाजिक समतेबरोबरच आर्थिक विषमता आणि पिळवणूक याविरुद्ध चीन झगडतो आहे. तिबेटमध्ये असा प्रयोग होत असताना दलाई लामाने विरोध केला. तेथे शासन विरुद्ध धर्म असा संघर्ष निर्माण झाला आणि दलाई लामाला तिबेट सोडून भारतात आश्रयाला यावे लागले. अजूनही दलाई लामा भारतातच आहेत. ते पुन्हा तिबेटला जातील ही शक्यता थोडी कमीच आहे. जरी ते तिबेटला गेले तरी पूर्वीप्रमाणे धर्मगुरुचे कार्य ते करू शकतील किंवा नाही हे सांगणे कठीण आहे. कारण शिक्षणाचा व विज्ञानाचा विस्तार जसा वाढत जातो त्या प्रमाणात धर्मातील कर्मकांड अर्थहीन वाटू लागते. जनतेचा प्रतिसाद पूर्वीसारखा मिळत नाही.

या संदर्भात आंबेडकरांनी दलितांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. आता पुढे काय हा खरा प्रश्न आहे. आता धर्मप्रसाराचे काम जवळ जवळ थंडावले आहे. बुद्धकाळातल्या भिख्खूंप्रमाणे आता भिख्खू होण्यास आणि भिख्खूंचा संघ स्थापन करण्यास कोणी पुढे येत नाही आणि खोल विचार करून पाहिला तर समाजाला तशा जुन्या भिख्खूंची आणि संघटनेची आवश्यकता

देखील नाही. कारण तो काळ वेगळा होता. त्या काळाचे म्हणून काही खास प्रश्न होते. आजचा काळ वेगळा आहे व प्रश्नही वेगळे आहेत. वास्तविक आंबेडकरांचा हा विचार अतिशय मौलिक आहे की नवबौद्ध म्हणजे अस्पृश्य दलित असा मर्यादित अर्थ असू नये. शिवाय रिपब्लिकन म्हणजे केवळ दलित असाही अर्थ होता कामा नये. पण प्रत्यक्षात घडले मात्र वेगळे. धर्म आणि पक्ष दोघेही आपली विशालता आणि भव्यता घालवून बसले ही वस्तुस्थिती आहे.

या पेचातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखविणारा कोणी नेता नाही. अंध:कारमय झालेला मार्ग आपल्या बुद्धिकौशल्याने उजळून टाकणारा कोणी प्रति-आंबेडकर आता तरी दिसत नाही. जेव्हा असामान्य नेता निघून जातो, त्या वेळी उरलेल्यांनी शोक करीत न बसता ती पोकळी भरून काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. नेतृत्व करण्याइतकी वजनदार व्यक्ती नसेल, तर समाजाने सामुदायिक नेतृत्व तयार केले पाहिजे आणि ते प्रभावी बनविले पाहिजे. पण आज तसे होताना दिसत नाही. धर्म ही संकल्पना मागे पडत चालली आहे. काही निष्ठावानांनी नव्या परंपरा, नव्या श्रद्धा निर्माण केल्या आहेत हे खरे असले तरी खेडोपाडी पसरलेला व संख्येने मोठा असलेला दलित समाज विचारात घेतला तर बुद्ध तत्त्वज्ञानाची छाप त्याच्या दैनंदिन जीवनावर अगदीच अस्पष्ट अशी पडल्याचे दिसते. १९५६ साली दीक्षा-विधीच्यावेळी उठलेली लाट आता पूर्णपणे ओसरली आहे. समुद्र शांत झाला आहे!

आंबेडकरांचे विचार हे सामाजिकदृष्ट्या जहाल आणि क्रांतिकारक होते यात मुळीच शंका नाही. धर्मांतराने त्यांनी समाजरचनेला एक जबरदस्त धक्का दिला यात वाद नाही. पण आंबेडकरांच्या निर्वाणानंतर कार्य थांबलेले आहे. दहा वर्षांत भारत बुद्धमय करून टाकू ही आंबेडकरांची भीमवाणी होती; पण ही मशाल पेटती ठेवण्यासाठी झगडणारे कार्यकर्ते कोणी पुढे आले नाहीत ही सत्यस्थिती नाकारून चालत नाही. मग धर्मांतराने काहीच साधले नाही का? या प्रश्नाचे उत्तर समाजाने बरेच साधले असेच द्यावे लागेल. आंबेडकरांची वैचारिक क्रांती अनेक लेखकांना, कवींना, नाटककारांना प्रोत्साहन देऊन राहिली. दलित पँथर संघटना, दलित साहित्यातले नवे लेखक, कार्यकर्ते इ. सर्वांना प्रेरणा देणारी ठरली. आता आंबेडकरांचे सामाजिक समतेचे विचार समाजाच्या अन्य घटकांकडे नेण्याचे महत्त्वाचे कार्य अजून व्हायचे आहे. दलित समाज आणि अन्य समाज घटकातील श्रमजीवींना बरोबर घेऊन चळवळीची व्यापक बांधणी झाली पाहिजे आणि समानतेसाठी, न्यायासाठी, माणुसकीसाठी, शोषणा विरुद्ध चालू असलेल्या लढ्यात एकजुटीने सर्वांनी उडी घेतली पाहिजे.

दलित समाजातील सुशिक्षितांना आंबेडकरांच्या कार्याचा यथायोग्य लाभझालेला आहे. ग्रामपंचायतीपासून ते दिल्लीतील केंद्र शासनापर्यंत सर्व ठिकाणी प्रमुखपदी विखुरलेले दलित आपण पाहतो ते आंबेडकरांच्या कतृत्वाचे फळ आहे. आमदार, खासदार, मंत्री इत्यादी सत्तास्थानावर पूर्वी वरिष्ठ वर्णातील व्यक्तींचीच निवड झालेली असायची.

पण आता तशी स्थिती राहिलेली नाही. नगरपालिका, सहकारी सोसायट्या, सहकारी बँका, सरकारी कचेऱ्या, रेल्वे, पोष्ट, बँका इत्यादि ठिकाणी राखीव जागा निर्माण केलेल्या असल्याने त्याचा फायदा सुशिक्षित दलितांना होत असलेला आज आपण स्पष्टपणे पाहू शकतो. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीतदेखील बदल झालेला आहे. राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. अनेक डॉक्टर, इंजिनियर या समाजातून निर्माण होत आहेत. कारण तशा संधी त्यांना उपलब्ध आहेत. पण हे नमूद केले पाहिजे की काही जण या सवलतीकडे गांभीर्याने पहात नाहीत आणि मिळालेल्या संधीचा फायदा आपली गुणवत्ता वाढविण्याकडे करून घेत नाहीत. अनेक जण व्यवसनाधीन होऊन पूर्वीच्याच कंगाल अवस्थेकडे जात आहेत.

आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळीचा फायदा शहरातील सुशिक्षित दलितवर्गाला मिळत असला तरी त्या मानाने ग्रामीण भागातील दलित जनतेची स्थिती सुधारली आहे, असे मात्र मानता येण्यासारखी परिस्थिती नाही. अजूनही अनेक ठिकाणी त्याना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. जेथे नळ आले आहेत तेथे हरिजनासाठी म्हणून वेगळे नळ आहेत. घरे बांधली जात आहेत तीही वेगळी हरिजनांसाठी म्हणून बांधली जात आहेत. स्पष्ट सांगायचे तर गावातील 'महारवाडा' अजूनही गाववाड्यात विलीन होऊन एकरूप झालेला नाही आणि असे होण्याची प्रक्रिया जोरात सुरू झालेली आहे असे समजण्यासारखी परिस्थितीही नाही.

राखीव मतदार संघ आणि नोकरीत राखीव जागा या दोन गोष्टीमुळे दलित समाजाचा फार मोठा विकास होऊ लागला आहे. हे स्पृश्य समाजातील मागासलेल्या जातीनी पाहिले. उदाहरणार्थ कुंभार घ्या. मडकी भाजणे आणि कौले तयार करणे हा यांचा मूळ धंदा. मडकी आणि कौले ह्या नेहमी लागणाऱ्या वस्तू. पण प्लॅस्टिकचे तांबे (पॉट) आले, घागरी आल्या, स्टेनलेस् स्टील आले. चुली जाऊन तेथे शेगड्या आणि गॅस आले. रॉकेलचे स्टोव्ह आले. काही ठिकाणी लाल मंगळूरी कौले आली, स्लॅबची घरे आली, पत्रे आले. त्यामुळे कुंभाराची मडकी आणि कौले यांना मागणी कमी झाली. परिणामी ग्रामीण भागातील कुंभार कुटुंबे देशोधडीला लागण्याची वेळ आली. सामाजिकदृष्ट्या ही मंडळी स्पृश्य असली तरी बऱ्याच वेळा यांची स्थिती अस्पृश्यांपेक्षा वाईट होऊ लागली. यांचे उपजीविकेचे साधनच गेले. बाटा, कारोनासारख्या बूट आणि चप्पल करणाऱ्या प्रचंड भांडवली कंपन्या निघाल्या तसेच प्लॅस्टिकचे देखील चप्पल आले त्यामुळे ग्रामीण भागातला चांभार रसातळाला गेला. नव्या औद्योगिकरणाने परंपरागत चालू असलेले धंदे बसले व अनेक जाती आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या झाल्या. त्यांनी शहराकडे धाव घेतली. आंबेडकरांच्या चळवळीने या इतर मागासलेल्या जातीदेखील सावध झाल्या आणि आम्हालादेखील सवलती हव्या आहेत म्हणून त्यांनी मागणी केली. परंपरेने परिशिष्ट जाती आणि त्याच्या जोडीने परिशिष्टात नसलेल्या पण आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या जातींचे प्रश्न चळवळ म्हणून उभे राहिले.

या आंदोलनाची प्रेरणादेखील आंबेडकरच आहेत हे विसरून चालणार नाही. हरिजनांना त्यांचे मागासलेपण घालविण्यासाठी जर सवलती देता तर आम्हालादेखील सवलती हव्यात. कारण आम्हीदेखील मागासलेले आहोत असा त्यांनी आवाज उठविला. प्रारंभी काही समाज-नेत्यांना आपली जात मागासलेली आहे असे सांगणे कमीपणाचे वाटत असे; पण परिस्थितीच्या दडपणामुळे त्यांना आपण मागासलेले आहोत हे मान्य करावे लागले. इतकेच नव्हे तर आपली जात मागासलेल्यांच्या यादीत घाला अशी त्यांना मागणी करावी लागली. त्यासाठी त्यांनी आंदोलनदेखील केले. मंडल कमिशनचा उगम यातच आहे. मंडल कमिशनच्या शिफारशी अमलात आणा म्हणणारे आणि अमलात आणू नका म्हणणारे यांच्यातला संघर्ष हा या शतकाच्या शेवटच्या दशकाच्या प्रारंभीचा अतिमहत्त्वाचा संघर्ष होता. सारा भारत या प्रश्नाने ढवळून निघाला. आंबेडकर विचारधारेला नवा वेग प्राप्त झाला!

आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा मागोवा घेताना एक गोष्ट जाणवते की आंबेडकरांनी डोंगरकपारीत राहणाऱ्या आदिवासी जनतेबद्दल विशेष विचार केला नाही. आदिवासी जनतेची लोकसंख्या दोन कोटींच्यावर आहे. नागरी संस्कृतीने आक्रमण करून या देशाच्या मूळच्या भूमिपुत्राला घनदाट जंगलात पिटाळून लावले आहे. ते लोक म्हणजे आदिवासी लोक! या आदिवासींचा धर्म कोणता, त्यांची जात कोणती, त्यांचा पक्ष कोणता, त्यांचा झेंडा कोणता, त्यांचा देश कोणता? याबद्दल अगदी अलीकडेपर्यंत विचारच झाला नव्हता. या देशात ख्रिस्ती मिशनरी आले आणि त्यांनी प्रथम आम्हाला या आदिवासींची ओळख करून दिली. पूर्व भारतातल्या आदिवासी टोळ्या ब्रिटिश काळातदेखील स्वतंत्रच होत्या. मुंबई जवळच्या ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वारली जनतेची दखल अगदी अलीकडेपर्यंत कोणी घेतली नव्हती. कम्युनिस्ट पक्षाच्या गोदूताई परुळेकर आणि श्यामराव परुळेकर या दांपत्याने प्रथम त्यांची संघटना बांधली आणि त्यांच्यातला 'माणूस' जागा केला.

दलित अस्पृश्यांबद्दलचे प्रश्न घेऊन आंदोलनात उतरलेल्या आंबेडकरांना आदिवासींच्या समस्याची जाण नव्हती असे नव्हे. त्यांनी आदिवासी समस्येवर लक्ष दिले नाही इतके खरे! आदिवासी मतदान करण्याइतके जागृत झालेले नाहीत. म्हणून त्यांना मतदानाचा हक्क असू नये असे विचार एका ठिकाणी त्यांनी मांडले आहेत. पण अलीकडे आदिवासी जनतेने अभूतपूर्व जागृती दाखविली आहे. मिझोराम राज्याची निर्मिती म्हणजे एका आदिवासी राज्याची निर्मिती आहे. शिवाय बिहार, मध्यप्रदेश, प. बंगाल, ओरिसा राज्यातील आदिवासी झारखंड राज्याची मागणी करीत आहेत. कदाचित ही मागणी मान्यदेखील होईल. आदिवासी जमातीसाठी महाराष्ट्रात अगर देशात आंबेडकरांनी खास परिश्रम घेतले नसले तरी अस्पृश्यांना हक्क मिळाले किंवा त्यांनी लढून मिळविले मग आपणसुद्धा असे हक्क का मिळवू नयेत. अशा विचारांची प्रेरणा आदिवासी जनतेत निर्माण होण्यास आंबेडकरांचेच विचार प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष

कारणीभूत आहेत. शेड्यूल्ड कास्टच्या (एस. सी) जोडीने शेडूल्ड ट्राइब्ज (एस. टी) चा प्रश्न देखील येतो. आता प्रश्न आदिवासीनी किरकोळ मागण्यांच्या पातळीवर ठेवला नाही तर त्यांनी एका राज्याची मागणी केली आहे आणि असे आदिवासी राज्य भारतात निर्माण झाले तर त्यात काही गैर आहे असे मानण्याचे कारण नाही.

आज आंबेडकर आपल्यात नाहीत. पण त्यांनी सामाजिक आणि आर्थिक समतेचा फार मोठा वैचारिक वारसा मागे ठेवला आहे. पण खरे सांगायचे म्हणजे त्याच्या मार्गाने चालण्याची शक्तीच अनुयायात आणि हितचिंतकात राहिली नाही. अजून फार मोठे मार्गक्रमण करावयाचे आहे. पूर्वग्रहदूषित विचारांना बाजूला सारून एक जागृत, व्यापक अशी राजकीय शक्ती या देशात निर्माण केली पाहिजे. पुढच्या काळात एकांगीपणाला वाव नाही. दलित समाजाच्या बरोबरीने येणारे वर्ग कोण आहेत हे हेरून त्यांना बरोबर घेऊन जावयाचे आहे हे विसरून चालणार नाही. आज देखील मराठवाडा विद्यापीठाला आंबेडकरांचे नाव द्यावे यावर एकमत होत नाही. या प्रश्नावरून मागे उसळलेला संघर्ष लक्षात घेता अजून किती जागृती व्हावयाहची आहे याची सहज कल्पना येऊ शकते. दोन वर्षांपूर्वी मंडल कमिशनच्या शिफारशी लागू करण्याचा प्रश्न भारताच्या लोकसभेत आला, त्या वेळी त्याला विरोध करून 'आत्मदहन' करून घेणाऱ्या शक्ती कोण होत्या याचे नीट आकलन केले पाहिजे. या प्रश्नावरून लोकांचे लक्ष दुसरीकडे खेचण्यासाठी रामजन्मभूमी आणि बाबरी मस्जिदचा प्रश्न कसा पुढे करण्यात आला याबद्दलचा इतिहास अगदी ताजा आणि अतिशय बोलका आहे. मंडल कमिशनला विरोध करणारे कोणकोणत्या मार्गांचा अवलंब करतात हे आता स्पष्ट झाले आहे.

उत्तर भारतातील परिस्थिती आजही चिंताजनक आहे. राजस्थान, बिहारमध्ये अजूनही दलितांच्या झोपड्यांना दिवसाढवळ्या आगी लावल्या जातात. स्त्रियांची अवहेलना आणि बलात्कार यासारखे प्रकारही वाढलेले आहेत. बऱ्याच ठिकाणी दलितांना सन्मानाचे जिणे अशक्य करून ठेवले आहे. जाती-धर्माच्या राजकारणाला ऊत आणण्याचा प्रयत्न चालू झाला आहे. डोक्यावरून मैला वाहून नेण्याची अमानुष आणि अमानवी पद्धत अजूनही चालू आहे. स्वराज्य मिळून ४५ वर्षे झाली, भारताने अंतराळात यान सोडले, अणुशक्तीचा स्फोट केला, स्वतः पाणबुडी तयार केली, हरित क्रांतीचे डांगोरे पिटले; पण डोक्यावरून मैला वाहून नेण्याची पद्धत या देशात अजून चालू आहे. पंतप्रधान नरसिंहराव यांनी ही पद्धत नाहीशी करण्यासाठी आणखी पाच वर्षांचा अवधी मागून घेतला आहे. 'भंगी पद्धत बंद केली तर निर्माण होणारी बेकारी कशी निवारता येईल याबद्दल सरकार विचार करीत आहे.' असे ढोंगीपणाचे निवेदन त्यांनी नुकतेच केले आहे. पोट भरण्याचे साधन म्हणून माणसाला हा व्यवसाय आजही करावा लागतो याबद्दल यांना ना खंत ना खेद !

हे सर्व पाहिले म्हणजे अजून आंबेडकरांच्या शिकवणुकीची किती गरज आहे

याची कल्पना येते. आज देशात अनेक जातीयवादी शक्ती डोके वर काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. पंजाबमध्ये धर्माच्या नावावर शिख तरुणांना भडकवून खलिस्तानची मागणी पुढे येत आहे. धर्माच्या नावावर काश्मीरमध्ये जातीयवादी फुटीर कारवाया करीत आहेत. अतिदक्षिणेला तमिळ टायगर्स अलगाववादी भूमिका घेऊन हिंसक कृत्ये करीत आहेत. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येत त्यांचाच हात असल्याचा पुरावा पुढे येत आहे. मंदिर-मस्जिद प्रश्नावरून अनेक ठिकाणी जातीय दंगली भडकत आहेत. पाण्याच्या प्रश्नावरून तामिळ-कन्नडीय असा संघर्ष बेंगळूरच्या परिसरात उद्भवला आणि भारत-पाक फाळणीची आठवण देणारी दृश्ये बेंगळूर परिसरात दिसू लागली. अशा प्रसंगी देशाचे ऐक्य, देशाची अखंडता यासाठी निधर्मी तत्त्वावर विश्वास असणाऱ्या शक्तींनी एकत्र येऊन फळी उभारली पाहिजे. अशा ऐक्याच्या आघाडीत समग्र आंबेडकरवादी जनतेला सहभागी करून घेतले पाहिजे. असे झाले तर समताधिष्ठित नवभारत निर्माण करण्याचा तो शुभारंभ ठरेल!

INSTITUTE OF ADVANC
124323
31-3-08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

# आमची इतर प्रकाशने

- **जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार**
  डॉ. गेल ऑम्व्हेट — २० रु.
- **महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य**
  प्रा. तानाजी ठोंबरे — २० रु.
- **महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ**
  डॉ. अशोक चौसाळकर — २० रु.
- **जोतीरावांची समता-संकल्पना**
  भास्कर लक्ष्मण भोळे — २० रु.
- **महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष**
  भारत पाटणकर — २० रु.
- **महात्मा फुले आणि धर्म**
  प्रा. आ. ह. साळुंखे — २० रु.
- **डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार**
  प्रा. म. द. देशपांडे — ३० रु.
- **डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी**
  कृष्णा मेणसे — ३० रु.
- **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आर्थिक आणि सांस्कृतिक विचार** / पी. डी. दिघे — ३० रु.
- **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच... राजकीय व सामाजिक चळव...**
  तानाजी ठोंबरे
- **विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुज...**
  भा. ल. भोळे — ५० रु.
- **आगरकरांचे राजकीय विचार** / डॉ. अशोक चौसाळकर — ४० रु.
- **आगरकरांचे धर्मचिंतन** / भा. ल. भोळे — ४० रु.
- **आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार**
  प्रा. तानाजी ठोंबरे — ४० रु.

Library IIAS, Shimla
MR 891.468 Am 16 M
00124313

---

मूल्य : ३० रुपये

ISBN 81-86995-94-3